सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. १० नोव्हेंबर २०२५ | वर्ष - तिसरे | अंक २१४ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | ınbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### महाराष्ट्र हे भारताचे खरे 'स्टार्टअप कॅपिटल' - मुख्यमंत्री

मुंबई, ९ नोव्हेंबर - भारतातील सर्वाधिक नोंदणीकृत स्टार्टअप्स महाराष्ट्रात असून यातील ४५ टक्के स्टार्टअप्स महिलांच्या नेतृत्वाखाली आहेत, ही अभिमानाची बाब आहे. महाराष्ट्र हे देशाचे खरे 'स्टार्टअप कॅपिटल' असल्याचे सांगून भारताच्या पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनण्याच्या उद्दिष्टात महाराष्ट्राचा आणि त्यातही महिला उद्योजकांचा मोठा वाटा असेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. त्याचबरोबर तरुणांच्या मनातील प्रत्येक कल्पना ही नाविन्यता असून स्टार्टअप्सच्या या काळात प्रत्येक व्यक्तीला नवउद्योजक बनण्याची संधी असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या 'इनोव्हेशन महाकुंभ २०२५' चे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जुहू येथील विद्यापीठ परिसरात झाले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. महिला शिक्षणाचे महत्त्व जाणून महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठ सुरू करणाऱ्या भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या पुण्यतिथीनिमित्त विद्यापीठामार्फत केंद्रीय शिक्षण मंत्रालय आणि राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या सहकाऱ्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, कौशल्य विकास विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचे संयुक्त सचिव आर्मस्ट्राँग पामे, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा.डॉ.उज्वला चक्रदेव, 'नॅक'चे अध्यक्ष प्रा.अनिल सहस्त्रबुद्धे आदी यावेळी उपस्थित होते.

### आयसिसच्या तीन अतिरेक्यांना अटक, गुजरात ATS ची धडक कारवाई

अहमदाबाद : गुजरात एटीएसने 'आयसिस'शी संबंधित तीन अतिरेक्यांना अटक केली आहे. हे अतिरेकी देशात मोठा घातपात करण्याची योजना आखत होते, असे गुजरात एटीएसने सांगितले. अटक केलेल अतिरेकी वर्षभरापासून भारतात तळ ठोकून होते, त्यांच्यातील दोघे पश्चिम उत्तर प्रदेशचे आणि एक हैदराबादचा आहे. तिघेही ३० ते ३५ या वयोगटातील आहेत. ते प्रशिक्षित अतिरेकी आहेत. अटक केलेल्या अतिरेक्यांची चौकशी सुरू आहे. या चौकशीतून धक्कादायक माहिती हाती येण्याची शक्यता आहे.

### एनडीएच श्रद्धा, विकास आणि गरिबांच्या कल्याणाचा आदर करू शकतो - योगी आदित्यनाथ

पाटणा, ९ नोव्हेंबर - केवळ एनडीएच श्रद्धा, विकास आणि गरिबांच्या कल्याणाचा आदर करू शकते. असे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आपल्या भाषणात सांगितले. ११ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील प्रचाराच्या शेवटच्या दिवशी, योगी आदित्यनाथ यांनी बिहारमधील अररिया जिल्ह्यातील सिक्ती येथील धर्मगंज मेळा मैदान आणि नरपतगंज हायस्कूल मैदानावर भाजप उमेदवाराच्या समर्थनार्थ निवडणूक रॅली काढल्या. योगी आदित्यनाथ यांनी आपल्या भाषणात सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जे वचन दिले होते ते त्यांनी पूर्ण केले. अयोध्येत राम मंदिराची लढाई सुरू असताना, बिहारमधील रामभक्त राम लल्ला मंदिराच्या बांधकामासाठी घोषणा देत पोहोचले होते. ते म्हणाले की, काँग्रेस सदस्यांनी राम मंदिर बांधू दिले जाणार नाही असे म्हटले होते आणि त्यासाठी त्यांनी सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्रही दाखल केले होते. बिहारमध्ये राम मंदिर रथयात्रा आरजेडीने थांबवली होती आणि त्यांचा भागीदार समाजवादी पक्ष उत्तर प्रदेशात रामभक्तांवर क्रूर लाठीमार करत होता.

### मोदी-नीतीश यांची जोडीच बिहारला विकसित करेल - अमित शाह

पाटणा, ९ नोव्हेंबर : बिहारचा विकास फक्त मोदी-नितीश जोडीच करू शकेल. ही जोडी बिहारला देशातील नंबर वन राज्य बनवेल. जेव्हा मनमोहन सिंग, सोनिया गांधी आणि लालू प्रसाद यादव केंद्रात सत्तेत होते तेव्हा दहशतवाद्यांनी आपल्या मातीवर मर्जीने हल्ला केला. उलट आता आपण दहशतवाद्यांना त्यांच्या घरातच मारत आहोत. असे विधान केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले. रविवारी, केंद्रीय गृहमंत्री एनडीए उमेदवाराच्या प्रचाराच्या शेवटच्या दिवशी सासाराम येथील न्यू स्टेडियममध्ये निवडणूक सभांना संबोधित करत होते. केंद्रीय गृहमंत्र्यांनी ठामपणे सांगितले की, जर भविष्यात पाकिस्तानी दहशतवाद्यांनी पुन्हा हल्ला करण्याचे धाडस केले तर त्यांच्या गोळ्यांना मोर्टार शेल्सने तोंड द्यावे लागेल. तुम्हाला माहिती आहे का हे मोर्टार शेल्स कुठे बनवले जातील? बिहारमध्ये, सासाराममध्ये, कारण मोदी तिथे संरक्षण कॉरिडॉर बांधणार आहेत. अयोध्येत राम मंदिराचे बांधकाम थांबवण्याचा प्रयत्न केल्याबद्दल अमित शाह यांनी काँग्रेस आणि राजदवरही निशाणा साधला. ते म्हणाले की, ५५० वर्षांपूर्वी मुघल सम्राट बाबरने एक प्राचीन हिंदू मंदिर पाडल्याचा आरोप आहे. आज, मोदी सत्तेत असल्याने, त्या ठिकाणी एक गगनाला भिडणारे मंदिर बांधण्यात आले आहे. मी तुम्हाला चालू निवडणुकीचे निकाल आधीच सांगू शकतो.

# शाळेची बस दरीत कोसळली, एकाचा मृत्यू आणि अनेक जखमी

नंदुरबार : शाळेच्या मुलांना घेऊन चाललेली बस अक्कलकुवा तालुक्यातील देवगोई घाट परिसरात शे-दिडशे फूट खोल दरीत कोसळली. या दुर्घटनेत एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाला आणि २० ते ३० विद्यार्थी जखमी झाल्याचे प्राथमिक वृत्त आहे. जखमींपैकी काहींची प्रकृती चिंताजनक आहे.

मोलगी गावातील विद्यार्थी बसने अक्कलकुवाच्या दिशेने निघाले होते. देवगोई घाटातील आमलिबारी परिसरातून जात असताना चालकाचे नियंत्रण सुटले आणि बस दरीत कोसळली. अपघातात बसचे नुकसान झाले. एक विद्यार्थी दरीत कोसळलेल्या बसमध्ये दबल्यामुळे एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाला. बसमधील अनेक विद्यार्थी जखमी आहेत.



स्थानिकांनी मदतकार्य सुरू केले आहे. पोलीस आणि अग्निशमन दलाचे पथकही घटनास्थळी पोहोचले असून मदतकार्यात गुंतले आहेत.

# भारताच्या मुलीची ऐतिहासिक कामगिरी! तिरंदाजी स्पर्धेत भारतीय एबल-बॉडी ज्युनियर संघात निवड



मुंबई: देणाऱ्याने देताना काहीतरी विचार केलाच असेल, असं आपण नेहमीच म्हणतो. मग ते सुख असो किंवा दु:ख... आणि याचा अनुभव आपल्याला जगताना येतोच... अशीच गोष्ट आहे एका जिद्दी स्त्रीची... पायाच्या अंगठ्याने धनुष्य उचलला... तोंडातून बाण सोडला... आणि तिचा निशाणा अचूक लागताच भारताचा शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला. या १८ वर्षाच्या मुलीने दाखवून दिले की, प्रतिभेला शरीराची, परिस्थितीची किंवा मर्यादांची गरज नसून तुमच्यामध्ये धैर्य आणि जिद्ध असेल तर काहीही करु शकता येते.

ही गोष्ट आहे शीतल देवीची... जेद्दाह येथे होणाऱ्या आगामी आशिया कप स्टेज ३ साठी शीतल देवीची भारतीय एबल- बॉडी ज्युनियर संघात निवड झाली आहे. एबल-बॉडी ज्युनियर संघात समावेश होणारी ती पहिली भारतीय पॅरा तिरंदाज बनली आहे. विविध आव्हानांवर मात करत स्वत:ची स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या खेळाडूंपैकी एक असणाऱ्या शीतलने जागतिक पॅरा तिरंदाजी स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. यानंतर आता तिची स्पर्धा सक्षम तिरंदाजांशी होणार आहे. हि भारतीय क्रिडा क्षेत्रातील ऐतिहासिक घटना आहे. तिच्या या यशाने तिच्यातील अपंगत्वाचे सगळे दोष पुसून टाकले आहेत. शितलने याबाबत सोशल मीडियावर पोस्ट टाकत आनंद व्यक्त केला आहे. या पोस्टमध्ये शीतलने सांगितले आहे, जेव्हा मी स्पर्धा करायला सुरुवात केली, तेव्हा माझे एक छोटेसे स्वप्न होते - एक दिवस सक्षम लोकांसोबत स्पर्धा करण्याचे. सुरुवातीला मी यशस्वी झाले नाही, पण प्रत्येक अपयशातून शिकत राहिले. आज, ते स्वप्न एक पाऊल जवळ आले आहे. आशिया कप ट्रायल्समध्ये, मी तिसऱ्या क्रमांकावर पोहोचले आणि आता आशिया कपमध्ये सक्षम वर्गात भारताचे प्रतिनिधित्व करेन. स्वप्नांना वेळ लागतो. काम करा. विश्वास ठेवा. तसेच या यशाचे श्रेय तिने तिचे प्रशिक्षक गौरव शर्मा यांना दिले आहे.

# भारतीय हवाई दलाच्या रोमांचक हवाई प्रात्यक्षिकांनी गुवाहाटी स्तिमित

गुवाहाटी, ९ नोव्हेंबर - भारतीय हवाई दलाने ९३ व्या वर्धापन दिनानिमित्त,आज (९ नोव्हेंबर) गुवाहाटी येथे भव्य ब्रह्मपुत्रा नदीपात्रावर नेत्रदीपक हवाई प्रात्यक्षिके सादर केली. आसामचे राज्यपाल लक्ष्मण प्रसाद आचार्य या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. आसामचे मुख्यमंत्री डॉ. हिमंता बिस्वा शर्मा, उ-ड एअर चीफ मार्शल एपी सिंग, पूर्व एअर कमांडचे -जउ-ळप-उ एअर मार्शल सुरत सिंग आणि भारतीय हवाई दल आणि राज्य सरकारचे वरिष्ठ अधिकारीदेखील या कार्यक्रमाला उपस्थित होते. या वर्षीच्या उत्सवाची संकल्पना Infallible Impervious and Precise- अमोघ, अभेद्य व अचूक हवाई प्रात्यक्षिकांमध्ये समाविष्ट होती. राफेल, सुखोई आणि तेजससह ७५ हून अधिक विमाने आणि हेलिकॉप्टरने उड्डाणाचे प्रदर्शन केले. हवाई दलाच्या फायटर्सनी गुवाहाटी, तेजपूर, जोरहाट, चाबुआ, हसीमारा, बागडोगरा आणि पानागढ येथून उड्डाण प्रदर्शनासाठी उड्डाण केले. लढाऊ विमानांमध्ये राफेल, सुखोई-३०, अपाचे, मिग-२९, आयएल-७८ रिफ्युलर, मिराज, जग्वार, सी-१७ ग्लोबमास्टर, एमआय-१७, डव्हान्स्ड लाइट हेलिकॉप्टर-एमके१, सी-१३० हर्क्युलस, अँटोनोव्ह एन-३२ आणि सूर्य किरण विमानांचा समावेश होता.

# शहर वाहतूक शाखेची फटाका सायलेंसरविरोधात मोहिम - १८ बुलेटवर कारवाई, २० हजार दंड वसूल

अहिल्यानगर : शहर वाहतूक शाखेच्या वतीने शहरातील बुलेट मोटारसायकलींवर लावण्यात येणाऱ्या मॉडिफाईड फटाका सायलेंसर विरुद्ध विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत आजपर्यंत १८ बुलेट वाहनांवर कारवाई करून २०,००० दंड वसूल करण्यात आला आहे.

आजच्या कारवाईत ८ बुलेट जप्त करून, त्यावरील मॉडिफाईड सायलेंसर काढण्यात आले असून संबंधित चालकांविरुद्ध मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईत एकूण ८,००० दंड वसूल करण्यात आला आहे.



तसेच वाहतूक शाखेने अवैध प्रवासी वाहतूक प्रकरणात ४ तर दारू पिऊन वाहन चालविण्याच्या २ कारवाया करून त्यांचे खटले मा. न्यायालयात दाखल केले आहेत. एकूण ८७ प्रकरणांमध्ये कारवाई करून १,०१,९५० दंड वसूल करण्यात आला आहे.

शहर वाहतूक शाखेकडून वाहनचालकांना मॉडिफाईड सायलेंसर तत्काळ काढून टाकण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. कारवाईत पीरास आय अण्णासाहेब परदेशी, संजय गवळी, शामूवेल गायकवाड, कैलास बोटे, मन्सूर सय्यद, एएस आय रामराव शिरसाठ, गणेश आरणे, हे कॉ सोपान गिऱ्हे, जहीर शेख, पोकॉ मधुकर ससे यांनी सहभाग घेतला.

# पाथर्डी नगरपरिषद निवडणूकीत २३ हजार २४२ मतदारांसाठी २७ केंद्रांवर मतदान

### सर्व प्रक्रिया नवीन इमारतीत पार पडणार

अहिल्यानगर, दि. ८ :-* राज्य निवडणूक आयोगाच्या ४ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या निर्देशानुसार पाथर्डी नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ चा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. या निवडणुकीत एकूण २३ हजार २४२ मतदारांसाठी २७ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली असून, अर्ज स्वीकारण्यापासून ते मतमोजणीपर्यंतची सर्व प्रक्रिया वीर सावरकर मैदान परिसरातील नव्या नगरपरिषद इमारतीत पार पडणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी प्रसाद मते यांनी दिली.

या निवडणुकीत प्रथमच सर्व प्रक्रिया तहसील कार्यालयाऐवजी नगरपरिषदेच्या नवीन इमारतीत होणार आहे. या ठिकाणी १० नोव्हेंबरपासून एक खिडकी योजना अंतर्गत निवडणूक प्रक्रियेशी संबंधित सर्व परवानग्या मिळणार आहेत. या खिडकीत पोलीस, वाहतूक तसेच नगरपालिका प्रशासनाचे अधिकारी उपस्थित राहून मेळावे, सभा, प्रचारफेरी, वाहन वापर, ध्वनिक्षेपक, फ्लेक्स-बोर्ड, प्रचारपत्रके आदींसाठी आवश्यक परवानग्या देतील. या बैठकीस सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार उद्धव नाईक, मुख्याधिकारी सपना वसावा आणि पोलीस निरीक्षक विलास पुजारी उपस्थित होते.

प्रांताधिकारी मते यांनी दिलेल्या माहितीनुसार, नामनिर्देशन पत्रे दाखल करण्याची प्रक्रिया १० नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत होणार असून रविवार व सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशन स्वीकारले जाणार नाहीत. नामनिर्देशन स्वीकारण्याची वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० अशी राहील.

प्राप्त अर्जांची छाननी १८ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता करण्यात येईल. वैध अर्जदारांची यादी याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. उमेदवारी मागे घेण्याची अंतिम मुदत १९ ते २१ नोव्हेंबर दुपारी ३.०० वाजेपर्यंत राहील. माघारीनंतर उमेदवारांना २६ नोव्हेंबर रोजी निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात येईल.

मतदान दिनांक २ डिसेंबर २०२५ रोजी असून मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० अशी राहील. त्यानंतर ३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजल्यापासून मतमोजणी प्रक्रिया होणार असून तीही नगरपरिषदेच्या नव्या इमारतीतच पार पडेल.

उमेदवारांना अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरावा लागणार आहे. सर्वसाधारण व ओबीसी उमेदवारांसाठी अर्ज फी रू. १००० तर अनुसूचित जाती उमेदवारांसाठी रू.५०० इतकी अनामत रक्कम निश्चित करण्यात आली आहे. मान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवाराला एक सूचक, तर अपक्ष उमेदवाराला पाच सूचक आवश्यक असतील.

अर्जदार व सूचक यांच्यावर कोणताही करथकबाकी नसावी. नगराध्यक्ष पदासाठी खर्च मर्यादा रू.७ लाख ५० हजार तर नगरसेवक पदासाठी रू.२ लाख ५० हजार निश्चित आहे. उमेदवारांना मालमत्ता व गुन्हेगारी संदर्भातील दोन स्वतंत्र हमीपत्र सादर करावे लागतील.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पाथर्डी नगरपरिषद क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली असून मतमोजणी पूर्ण होईपर्यंत ती प्रभावी राहील. प्रशासनाने सर्व राजकीय पक्ष व उमेदवारांना आचारसंहितेचे पालन करून निवडणूक शांततेत व पारदर्शकतेने पार पाडण्यासाठी सहकार्याचे आवाहन केले आहे.

### पश्चिम महाराष्ट्र ते मराठवाडा - विकासाचा नवा महामार्ग

पुणे - छत्रपती संभाजीनगर प्रवास केवळ ३ तासांत पूर्ण होणार

छत्रपती संभाजीनगर - पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा या दोन प्रांतांतील अंतर वेगाने मिटवण्यासाठी राज्य सरकारकडून पुणे-छत्रपती संभाजीनगर ग्रीनफिल्ड द्रुतगती मार्ग उभारण्याचे काम सुरू आहे. सुमारे २२,००० कोटी रुपयांचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प व महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ (चडखऊ) मार्फत राबवला जात आहे. या मार्गामुळे सध्या ८ ते १० तासांचा प्रवास केवळ ३ तासांत पूर्ण होणार आहे.

हा द्रुतगती मार्ग केवळ वेगासाठीच नव्हे, तर प्रादेशिक संतुलन आणि औद्योगिक विकासासाठीही 'गेम चेंजर' ठरणार आहे. पुणे, बीड, आणि मराठवाडा या भागांमधील संपर्क अधिक सुलभ होणार असून, व्यापार, पर्यटन, शेतीपूरक उद्योग आणि रोजगाराच्या संधींना मोठी चालना मिळणार आहे.

कामाचे टप्पे : पहिल्या टप्प्यात पुणे-शिरूर दरम्यानचे काम सुरू असून, त्यामुळे पुणे-अहमदनगर महामार्गावरील वाहतूक कोंडी कमी होईल. दुसरा आणि तिसरा टप्पा शिरूर-संभाजीनगर भागात उभारला जाणार आहे. या मार्गात औद्योगिक क्षेत्रांना जोडणारे रस्ते आणि शहरांभोवती बायपास तयार केले जाणार आहेत.

सध्या दुसऱ्या टप्प्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू असून, बोली पुढील वर्षाच्या सुरुवातीला उघडली जाण्याची शक्यता आहे. पूर्ण प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर पुणे आणि मराठवाडा यांच्यातील प्रवास सुलभ, वेगवान आणि सुरक्षित होणार असून, महाराष्ट्राच्या विकासाचा नवा अध्याय या महामार्गामुळे लिहिला जाईल.

# सतीश कदम आत्महत्या प्रकरण : डोंगरे पिता-पुत्रावरील खटला उच्च न्यायालयात रद्द

छत्रपती संभाजीनगर - सतीश कदम आत्महत्या प्रकरणी तुळजापूर पोलिसांनी तुळजापुरातील किसन डोंगरे व त्यांचे पुत्र गुरुराज व नागेश डोंगरे यांच्या विरुद्ध भरलेला खटला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती श्रीमती विभा कंकणवाडी आणि न्यायमूर्ती संजय देशमुख यांच्या खंडपीठाने रद्द केला.

या खटल्याची हकीकत अशी की, सतीश कदम आणि किसन डोंगरे हे पूर्वी एकत्र कामात होते. त्यांनी समयकात सन १९८९ मध्ये तुळजापूर- नळदुर्ग रस्त्यावर जमीन खरेदी केली होती व त्या जमिनीत २६ प्लॉट पाडण्यात आले होते. त्यातील २५ प्लॉट विकण्यात आले होते. एक प्लॉट विकायचा राहिला होता. सतीश कदम यांच्या मुलाला पुणे येथे चष्म्याचे दुकान काढावयाचे होते व त्यांनी राहिलेला प्लॉट विकणे बाबत किसन डोंगरे यांचे मागे तगादा लावलेला होता परंतु किसान डोंगरे व त्यांच्या मुलांनी यापूर्वी विकलेले प्लॉट सहमतीने विकले आहेत असे लिहून देणे बाबत सतीश कदम यांना सांगितले होते व त्याबद्दल किसन डोंगरे व त्यांची मुले गुरुराज व नागेश हे सतीश कदम यांना त्रास देत होते आणि त्या त्रासाला कंटाळून सतीश कदम यांनी दिनांक २५.११.२०२३ रोजी झोपेच्या गोळ्या खाऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. त्यांना ताबडतोप उपचारासाठी इस्पितळात दाखल करण्यात आले परंतु उपचारादरम्यान दिनांक २९.११.२०२३ रोजी त्यांचा मृत्यू झाला. याबाबत सतीश कदम यांचा मुलगा प्रसाद सतीश कदम याने तुळजापूर पोलीस स्टेशनला डोंगरे पिता पुत्रांविरुद्ध फिर्याद दाखल केली होती.



सदरची फिर्याद रद्द करणे बाबत डोंगरे पिता-पुत्रांनी ॲड. जयदीप माने (सोलापूर) यांचे मार्फत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती. सदरच्या याचिकेची सुनावणी दरम्यान तुळजापूर पोलिसांनी न्यायालया दोषारोप पत्र चार्जशीट दाखल केले. त्यानंतर दोषारोप पत्र चार्जशीट खटला रद्द करण्यात यावा असा अर्ज उच्च न्यायालयात प्रलंबित याचिकेत दाखल करण्यात आला.

सदर याचिकेच्या सुनावणी दरम्यान आरोपीचे वकील ॲड. जयदीप माने यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, सदर प्लॉट विक्रीचे पैसे मयत सतीश कदम यांनी चेकने स्वीकारले आहेत आणि सदरची रक्कम त्यांच्या बँक खाते मध्ये जमा झाली आहे, सतीश कदम हे उच्च रक्तदाब व मधुमेहाबद्दल त्रस्त होते त्याचबरोबर ते व्यसनी होते दवाखान्यात दाखल झाल्यानंतर मयताच्या पोटातील द्रव्य तपासणीकडे रासायनिक तज्ञाकडे पाठवण्यात आले नाही, सतीश कदम यांनी आत्महत्या केली असे गृहीत धरूनच पूर्ण तपास करण्यात आला व दोष दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे ते रद्द होण्यास पात्र आहे. खंडपीठाचे न्यायमूर्ती विभा कंकणवाडी आणि न्यायमूर्ती संजय देशमुख यांनी डोंगरे पिता पुत्रांवरील खटला रद्द करण्याचे आदेश दिले.

या खटल्यात आरोपी डोंगरे पिता-पुत्रांतर्फे ॲड. जयदीप माने (सोलापूर), ॲड. आर. एस.उर्फ रामचंद्र पाटील(धाराशिव) यांनी तर सरकारतर्फे ॲड. वि. के कोटेचा आणि मूळ फिर्यादीतर्फे ॲड. बी. आय. महाजन यांनी काम पाहिले.

हा निर्णय महत्वाचा असल्याने या निर्णयाला ऑल महाराष्ट्र लॉ रिपोर्टर क्रिमिनल या कायद्याच्या पुस्तकात पान नंबर २३६७ वर स्थान मिळाले आहे.





## तुम्हाला माहिती आहे का?

• गुरू नानक जयंती हा शीखांचा सर्वात मोठा सण आहे. प्रकाश पर्व, गुरू पर्व, गुरू पुरब अशा नावांनी ओळखली जाणारी गुरु नानक जयंती दरवर्षी कार्तिक महिन्यातील पौर्णिमेच्या दिवशी साजरी केली जाते. श्री गुरु नानक देव आणि भारताचा आत्मा असलेल्या प्रभू श्रीराम यांच्यात अगाध भक्तीचे एक अनोखे नाते होते. जाणकार अयोध्यापुरीतील दोन ऐतिहासिक गुरुद्वारांकडे श्री राम जन्मभूमीच्या मुक्तीसाठी शिखांनी केलेल्या अथक प्रयत्नांचे प्रतिक म्हणून पाहतात. प्रत्यक्ष जीवनानुभव आणि शस्त्रसज्जतेला महत्त्व देऊन भक्ती आणि शक्तीचा खराखुरा संगम घडवून आणला.

## देशोदेशीच्या लोककथा

**प्रीती वडनेरकर/** ९८२३९९४७९२

# सोन्याची सफरचंदे

### भाग १८



**बालमित्रांनो,** आज आपण जाणार आहोत, भारताच्या दक्षिणेला असलेल्या श्रीलंका या बेटावर! पूर्वी हे बेट सिलोन नावाने ओळखले जायचे. सुवर्णनगरी म्हणूनही लंकेची कीर्ती होती. पूर्वी प्रत्येक देशात, छोटी-छोटी अनेक राज्यं असत. तिथे राजा राज्य करीत असे, प्रजेची देखभाल, त्यांचं रक्षण, चरितार्थ अशी सारी जबाबदारी राजावर असे.

एका छोट्या नगरीत कनिश्क नावाचा राजा राज्य करीत होता. त्याला तीन मुलगे इमेश, हिमेश आणि हेमंथा होते. भला मोठा राजमहाल, आकर्षक बगिचे होते. सारी नगरी ऐश्वर्यात, दिमाखात आणि वैभवात लखलखत होती. बगिच्यात जागोजागी सप्तरंगी कारंजी थुईथुई नाचत होती. बगिच्यात तऱ्हेतऱ्हेच्या फुलाफळांची झाडं होती. त्यातच एक छोटंसं सफरचंदाचं झाड होतं.

'महाराज, आपल्या बगिच्यातलं सफरचंदाचं झाड आता मोठं झालंय आणि आश्चर्य म्हणजे त्याला सोन्याची सफरचंदं लागली आहेत,' सेवकानं राजाच्या कानावर ही बातमी घातली. महाराणी आणि तिन्ही राजपुत्रांच्या समवेत, राजा सोन्याची सफरचंदं पहायला बगिच्यात पोहोचला.

'खरोखर, याला सोन्याची सफरचंदं लागली आहेत. खरोखर मोठं आश्चर्यच आहे. प्रधानजी, आपल्या राज्यातल्या आम जनतेला हे आश्चर्य पाहण्यासाठी प्रवेश द्या,' राजानं आज्ञा केली. सोन्याची सफरचंदं पहायला, दुरून दुरून प्रजाजन येऊ लागले. कनिष्क राजाची कीर्ती सर्वदूर पसरली. मात्र एक दिवस, सकाळी राजा, बगिच्यात फेरफटका मारायला पोहचला आणि त्याला धक्काच बसला.

'शिपाई ऽऽ आपली सोन्याची सफरचंदं नाहीशी कशी झाली? कोण आलं होतं इथे? चोवीस तास पहारा ठेवा. काहीही करून चोराला माझ्यासमोर हजर करा,' रागारागात राजा आपल्या महालात निघून गेला. प्रधानजींनी चोवीस तास पहारा ठेवला. पण, काही उपयोग झाला नाही. रोज दुपारी झाडावर सोन्याची सफरचंदं धरायची. मात्र तो चोर रात्रीच सफरचंदं चोरत असल्यामुळे दुसऱ्या दिवशी सकाळी एकही सफरचंदं शिल्लक रहात नव्हतं.

राजा हतबुद्ध झाला. काही उपाय सुचत नव्हता. शेवटी त्यानं इमेश, हिमेश, हेमंथा या तीन राजपुत्रांना आपल्या शयनकक्षात बोलावून घेतलं.

'माझ्या तरुण राजपुत्रांनो, तुम्हाला माहीतच आहे की, आपली सोन्याची सफरचंदं रोज रात्री नाहिशी होत आहेत. आपण चोराला पकडण्यासाठी अक्षरशः आकाशपाताळ एक केलं परंतु, काही उपयोग झाला नाही,' राजा म्हणाला.

'त्यावर आम्ही आपली काय मदत करू शकतो, तात?' इमेशनं विचारलं. 'आम्ही आमच्याकडून होतील तेवढे प्रयत्न करू तात,' हिमेश म्हणाला. 'मला तर खात्री वाटते की, मी चोराला पकडून आपल्यासमोर हजर करेन तात,' हेमंथा म्हणाला.

'छान, माझी तुम्हा सगळ्यांकडून हीच अपेक्षा होती. पण, एक अट आहे. जो चोराला पकडू शकणार नाही, त्याला मात्र आपल्या राज्याचा त्याग करून, परराज्यात आपलं बस्तान हलवावं लागले. कबूल?' राजानं विचारलं. 'कबूल तात कबूल! पण, तशी वेळच येणार नाही. आम्ही रात्रभर डोळ्यांत तेल घालून पहारा करू,' इमेश, हिमेश आणि हेमंथा म्हणाले.

दुपारी नेहमीप्रमाणे सोन्याची सफरचंदं झाडावर लगडली. आज इमेशची पहाऱ्याची पाळी होती. रात्री भूक लागली तर काही खाता यावं, या हेतूनं इमेशला राजआचाऱ्याने थोडी मिठाई दिली. इमेश बराच वेळ ताटकळत बसला. शेवटी त्यानं मिठाईचा डबा उघडला. इतक्यात एक छोटासा उंदीर तिथे आला.'दादा, तुझ्या मिठाईतला छोटासा तुकडा मला देशील?' त्यानं इमेशला विचारलं.

'कोण रे तू चिमुरडा? चल जा...काही मिळणार नाही खायला. चल जा,' इमेश खेकसला. मिठाई खाऊन सफरचंदाच्या झाडाखाली बसला. बसल्या बसल्या त्याला गाढ झोप लागली. जाग आली तेव्हा सूर्य डोक्यावर आलेला होता. सफरचंदं चोरीला गेली होती. इमेश राजमहालात गेला. खाली मान घालून, त्याने चोराला पकडू शकलो नाही, त्याबद्दल दिलगिरी व्यक्त केली. राजा भयंकर संतापला. त्याने इमेशला नगरीबाहेर हाकलायचे ठरविले. दुसऱ्या दिवशी हिमेशची पाळी होती. यालाही आचाऱ्याने मिठाई दिली. हिमेशने डबा उघडला. तोच उंदीर परत तिथे आला. त्याला काही खायला मागितलं. हिमेशनेही उंदराला हाकललं, मिठाई खाल्ली आणि झाडाखाली मस्त ताणून दिली. सकाळी झोपतून उठल्यावर पाहतो, तो सोन्याची सफरचंदं गायब! त्याने चोराला पाहिलंही नाही आणि पकडलंही नाही, हे सांगितल्यावर राजा संतापला. हिमेशलाही नगरीबाहेर हाकलायचं ठरविलं.

तिसऱ्या रात्री हेमंथाची गस्त होती. आचाऱ्याने दिलेली मिठाई नाकारून त्याने पोळीभाजी घेतली. उंदीर आला. हेमंथाला खायला मागू लागला. हेमंथाने थोडी पोळी त्याला खायला दिली. उंदीर तृप्त झाला. 'ही सफरचंदं कोण चोरतं, ते मला माहीत आहे. तू आता थोडा वेळ झोप. मध्यरात्री मी तुला उठवेन. तेव्हा एक सोनेरी पक्षी तुला दिसेल. त्याच्या चोचीत सोनेरी पिशवी दिसेल. एक एक करून, तो सारी सफरचंदं त्या पिशवीत टाकेल. त्याने सफरचंदं तोडायला सुरूवात केली की, त्याच्या मागून जाऊन त्याला पकड. साऱ्या गोष्टी चपळाईने झाल्या पाहिजेत. तो पक्षी सहजासहजी पकडता येण्यासारखा नाही,' उंदरानं सांगितलं.

मध्यरात्री उंदराने हेमंथाला उठवलं. त्यानं झाडाकडे पाहिलं, आश्चर्याने स्तिमित होऊन पहातच राहिला. सफरचंदाच्या झाडावर अत्यंत सुंदर पक्षी बसला होता. त्याची सर्व पिसं सोनेरी होती. अंगाचा रंग तांबुस सोनेरी होता. मान बाकदार आणि चोच निमुळती होती. एका फांदीवर त्याने सोनेरी पिशवी टांगली होती. आपल्या चोचीनं एकेक सफरचंदं तोडून, त्या थैलीत टाकत होता. तो ज्या जागेवर बसला होता, तिथे सोनेरी पिसांमुळे लख्ख प्रकाश पडला होता.

हेमंथा पावलांचा आवाज होऊ न देता त्या झाडावर चढला. पक्ष्याजवळ पोहचताच त्यानं पक्ष्याला पकडलं. मात्र, त्याच्या हातून स्वतःला सोडवून घेत तो पक्षी उंच आकाशात उडाला. मात्र सफरचंदाची थैली तशीच राहून गेली. हेमंथाच्या हातात पक्ष्याची दोन-तीन पिसं आली.

हेमंथा राजमहालात गेला आणि सारी हकीकत राजाला सांगितली. थैलीतली सफरचंदंही दाखवली. राजा खुष झाला. त्याला हेमंथाचा अभिमान वाटला. 'तात, मी चोराला पकडले खरे परंतु तुमच्यासमोर आणून उभे केले नाही. मी त्या पक्ष्याच्या शोधार्थ निघतो आणि तुमच्यासमोर उभे करतो.' हेमंथा सोनेरी पक्ष्याला शोधायला घोड्यावर स्वार होऊन निघाला.

३-४ दिवस प्रवास केल्यावर एका रस्त्यावर तीन पाट्या दिसल्या.'सरळ गेलात, तर मृत्यूला सामोरे जाल', 'डावीकडे गेलात, तर कधी परतू शकणार नाही'

'उजवीकडे गेलात तर पोलादी लांडगा तुम्हाला खाऊन टाकेल'

हेमंथा विचारात पडला,'काय करावं? मृत्यूला सामोरे? नाही नाही. कधी न परतणे? नाही नाही. पोलादी लांडग्यासाठी दुसरं खाद्य नेलं, तर आपण वाचू शकू? दुसरं खाद्य? कुठे शोधयचं?' हेमंथाने इकडे तिकडे शोधल्यावर, एक हरीण मरून पडलेलं त्याला दिसलं. त्याला घोड्यावर टाकून हेमंथा उजवीकडे गेला. त्याला लांडग्याचं गुरगुरणं ऐकू आलं. हेमंथा समोर, महाभयंकर पोलादी लांडगा येऊन उभा राहिला. हेमंथा मनातून घाबरला मात्र घोड्यावर ठेवलेलं मेलेलं हरीण त्याने लांडग्याच्या पुढ्यात टाकलं. 'मला खाऊ नकोस. माझ्याऐवजी हे मेलेलं हरीण खा,' हेमंथा म्हणाला. लांडग्यानं क्षणार्धात हरणाचा चट्टामट्टा केला.

'तू कुठे चालला आहेस?' त्यानं हेमंथाला विचारलं. हेमंथानं सोनेरी पक्ष्याविषयी सांगितलं.

'चल मी तुला मदत करतो. तुला एकट्याला तो सापडणार नाही.'

लांडग्यानं हेमंथाच्या घोड्याला आपल्या जंगलात सोडलं. हेमंथा, लांडग्यांच्या पाठीवर बसला. शेवटी एका राक्षसाच्या राज्यापाशी ते पोहचले.'हेमंथा, मी तुझ्यावर जादूचं पाणी शिंपडतो त्यामुळे, तू कोणाला दिसू शकणार नाहीस. या महालातली बरीच दालनं ओलांडल्यावर एक कारंजी येईल तिथेच, एका सोनेरी पिंजऱ्यात तो सोनेरी पक्षी आहे. त्याला हळूच काढून घे. मात्र त्याच्या पिंजऱ्याला हात लावलास तर, माझी जादू नाहीशी होऊन तू सगळ्यांना दिसशील. राक्षसाचे सेवक तुला पकडतील.'

हेमंथानं सारं मान्य केले. तो सोनेरी पक्ष्यापर्यंत पोहोचला. त्यानं सोनेरी पक्ष्याला अलगदपणे बाहेर काढलं. मात्र, त्याचा पिंजरा, हिरे-माणके, रत्नांनी मढला होता. त्यावर सोन्याच्या पत्र्याने सुरेख नक्षी काढली होती. हेमंथानं त्या पिंजऱ्याला स्पर्श केला आणि अचानक मोठ्याने घंटा वाजू लागल्या. सर्व बाजूंनी पहारेकरी धावत आले. त्यांनी हेमंथाला पकडून राक्षस राजासमोर उभं केलं.

'कोण आहेत तू? इथे येऊन, माझा सोनेरी पक्षी चोरण्याची हिंमत कशी झाली तुझी?' राक्षस राजानं विचारलं. हेमंथानं सर्व हकीकत सांगून टाकली.'ठीक आहे. मला सोनेरी केसांची राजकन्या आणून दे. मग मी तुला हा सोनेरी पक्षी देईन,' राजा म्हणाला. इकडे लांडगा हेमंथाची वाट पहात उभा होता. हेमंथावर तो खूप चिडला. पण, सोनेरी केसांच्या राजकन्येचा शोध घेऊन तो तिथल्या राक्षस राजाच्या महालापर्यंत गेला. महालातल्या सर्वात उंच मनोऱ्याजवळच्या दालनात सोनेरी केसांच्या राजकन्येला राक्षसराजाने कैद करून ठेवले होते. हेमंथा महालाच्या मागे गेला. तिथल्या एका झोपडीत एक म्हातारी आजी रहात होती. तिथे हेमंथाची विचारपूस केली.

'इथून अजून मागे एका वृक्षाजवळ एक सोनेरी काठी उभी असलेली दिसेल, तिच्यात या राक्षसराजाचा जीव आहे,' हेमंथा तातडीने तिथे पोहचला. त्याने ती काठी शोधून तिचे तुकडे केले. राक्षसराजा मरून पडला. सोनेरी केसांची राजकन्या आणि हेमंथा निघाले. लांडग्याच्या पाठीवर बसून सोनेरी पक्षी आणला. लांडग्याला सोनेरी केसाची राजकन्या बनवून, राजांच्या हाती सुपुर्द केली. खरी राजकन्या हेमंथाबरोबर थांबली. राजकन्येचं रूप टाकून लांडगा परत आला. सारे लांडग्याच्या पाठीवर बसून आपल्या राज्यात पोहचले. राज्यात आनंदी आनंद झाला. हेमंथा आणि राजकन्या यांचा शाही विवाह सोहळा थाटामाटात पार पडला. आता सोनेरी पक्षी मुक्तपणे तिथल्या बगिच्यात फिरू लागला.


## गुलदस्ता

**निशिकांत मायी /** ९८८११५२४३९



# चाफा बोलेना... चाफा चालेना...!

अन्य फुलांपेक्षा वेगळा सुगंध लाभलेले आणि प्रत्येक फुलांत निराळेपण निर्माण झालेले पाहावयाचे असेल तर अनेक जातींमध्ये विभागलेला चाफा ही वैशिष्ट्यपूर्ण वनस्पती ठरावी. हिरवा, कवठी, पिवळा आणि नागचाफा अशा विविध प्रकारांमधील चाफा वृक्ष, त्यांची पानं आणि पाकळ्याही विविध औषधी गुणधर्मधारित आहेत. या फुलांना एक विशिष्ट प्रकारचा सुगंध असतो. पांढरा चाफा पावसाळ्याच्या दिवसात चांगला बहरतो. पंचकोनी, लांबट आणि तपकिरी मखमली लव असलेली चाफ्याची पाने सौंदर्यप्रसाधनांमध्ये वापरली जातात. साबण, वंगण, सुवासिक तेल यासाठी या फुलांचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. चाफ्याच्या विविध प्रकारांत देवचाफा हा साधारणपणे एखाद्या पुरातन मंदिरानजीक दिमाखात उभा असतो. याची फुले पांढरी फुले त्यात मधोमध पिवळसर रंग अधिक शोभिवंत वाटतो. भारतासह सर्वत्र आढळून येणारे हे वृक्ष सुंदर व सुबक असले, तरी या झाडाचे खोड मात्र खडबडीत असते. देवचाफ्याची फुले आणि हार देवपूजेत वापरतात. चाफ्याला हिंदीत चंपा असे म्हणतात. देवचाफ्याची फांदी लावली तरी चांगली लागवड होते. देवचाफ्यानंतर चाफ्याचा भारतीय प्रकार सोनचाफा सुवर्णचंपक या नावानेही ओळखतात. याचे वैशिष्ट्य असे की, सोनचाफ्याची सोनेरी पिवळ्या रंगाची फुले दाट अशा पर्णसंभारात लपलेली असतात. पिवळा चाफ्याची फुले सोनचाफ्यापेक्षा थोडी लहान आणि रंगाने पिवळट पांढरी असतात. फळे परिपक्व झाल्यानंतर त्यातून लालसर रंगाच्या बिया जेव्हा बाहेर डोकावतात तेव्हा हे लालसर रंगाचे घोस आकर्षक दिसतात. सर्वात छोटा वृक्ष कवठी चाफ्याचा असतो. कवठ चाफ्याचे वैशिष्ट्य म्हणजे, याचे पांढरे शुभ्र फूल तिन्हीसांजेला उमलते आणि सकाळपर्यंत पाकळ्या गळूनही पडतात. मात्र, याच पोटजातीतील महापुष्प कवठी चाफ्याला भरपूर आणि मोठमोठी फुले बहरून येतात. मूळ श्रीलंकेतला नागचाफा मिझोराम प्रांताचा राज्यवृक्ष आहे तर सुवासिक फुले देणारी आणखी एक चाफ्याच्या प्रकारातील वेली म्हणजे हिरवा चाफा! चढण्यास आधार मिळाला नाही तर हा वेल आपसात पकडापकडी करीत एखाद्या झुडुपासारखा गोळा होऊन राहतो. हिरव्या चाफ्याची पाने दाट हिरवी, चकचकीत असतात. ती साधारणपणे पावसाळ्यात येतात. फूल पिकून पिवळे झाले की, तो सुगंध जास्तच दरवळतो. तांबड्या चाफ्याला गुलाबी, पांढऱ्या आणि पिवळ्या रंगांची छटा असलेली सुगंधी फुले उन्हाळा सुरू होताना येतात. चाफा प्रकारातला भुईचाफा हे थेट जमिनीतून उगवत असल्याने दुर्मिळ या प्रकारात मोडते. औषधी गुणधर्मांनी युक्त या चाफ्याचे झाड साधारणतः सहा ते आठ मीटर उंचीची असतात. पाने कायम हिरवीगार असून, ती टोकदार व चमकदार असतात. चाफ्याचे सर्वसामान्य नाव 'फ्रंगीपानी' असून पर्शियन नाव 'यास्मिन' आहे. चाफ्याच्या प्रजातीमध्ये झुडुपे किंवा लहान झाडेही आढळून येतात. झाडांवर ही फुले गुच्छांमध्ये वाढतात. चाफ्याचे बी गोलाकार असून एप्रिल ते सप्टेंबर या काळात चाफा फुलतो, बहरतो. मग कोण म्हणेल चाफा बोलेना...चाफा चालेना...!



## तरुण भारतचा अभिनव उपक्रम

# ज्ञानांजली!



**संतश्रेष्ठ** गजानन महाराज यांच्या चरित्राविषयी सविस्तर जाणून घेण्यासाठी श्रीगजानन महाराज अध्ययन समूह, नागपूरच्या सहकार्याने तरुण भारतच्या वतीने, 'ज्ञानांजली' हा अभिनव उपक्रम सुरू आहे. श्री गजानन विजय या ग्रंथावर आधारीत दहा प्रश्न दर शनिवारी आकांक्षा पुरवणीत प्रसिद्ध केले जातील. अचूक उत्तर निवडण्यासाठी चार पर्यायही दिले जातील. ज्ञानांजलीतील सर्व १० प्रश्नांची अचूक उत्तरं देणाऱ्या भाग्यवंत भक्तांची नामावली पुढच्या आकांक्षामध्ये प्रकाशित करू. ही प्रश्नावली तुम्हाला गूगल फॉर्म स्वरूपातच सोडवायची आहे. प्रिंट किंवा हस्तलिखीत स्वरुपात दै.तरुण भारत कार्यालयाकडे ती पाठवू नये. आपली ज्ञानसेवा श्रींच्या चरणी रुजू करण्याची ही सुवर्णसंधी आहे. प्रत्येक शनिवारी गूगल फॉर्म मिळविण्यासाठी 'तरुण भारत नागपूर' या आमच्या व्हॉट्स ॲप चॅनेलला फॉलो करा. अधिक माहितीसाठी सुरेखा देशपांडे ९८२२४४४२४५ या क्रमांकावर संपर्क करा.

### प्रश्नसंच क्र. ३६ चे भाग्यवान विजेते

अनुराधा कोळी, भाग्यश्री काशीकर, ज्योती भावसार, सीमा गुरव, कविता निकम, हेमा दवंडे, विजया कुमठेकर, गार्गी सरमोकादम, नयना महाजन, मीना वाघमारे, हरिभाऊ वानखेडे, उमेश कुळकर्णी, उज्वला फिरके, वैजयंती शास्त्री, स्मिता कुळकर्णी, सुहास खर्डीकर, सुषमा तारे, प्रसाद कावळे, प्रतिमा गोरे, आशा आवळे, अस्मिता तलाठी, उर्मिला तिवारी, अलका देशमुख, संपदा दीक्षित, अपर्णा भालेकर, विशाखा भालेराव, भाग्यश्री शर्मा, रवींद्र टोंगळे, भारती टोंगळे, राजेंद्र शानी, दीपाली मुर्तेकर, अतुल देवगडे, रवींद्र साधू, रेखा सराफ, सुषमा सोमठाणकर, राम कणीकर, शीतल ठाकरे, संध्या चावडीपांडे, सुनिता सोनारे आणि मेघा कुलकर्णी

## प्रश्नसंच - ३७

### योग्य पर्याय निवडा

१) **तुकाराम कोकाटेच्या थोरल्या मुलाचे नाव काय ?**
अ) पितांबर ब) उकीर्डा क) रामचंद्र ड) नारायण

२) **वऱ्हाडातील ब्राह्मण शुक्ल यजुर्वेदी भाविक कोण ?**
अ) गणेश खापर्डे ब) गणेश आप्पा क) गणेश सहस्त्रबुद्धे ड) व्यंकटराव देसाई

३) **श्रीदासगणू महाराजांनी कोणाच्या कृपेस परीस असे म्हटले आहे ?**
अ) गौरीपुत्रा ब) त्र्यंबकेश्वरा क) जगदंबा ड) पांडुरंगा

४) **श्रीदासगणू महाराजांनी 'आदर्श होवो भाविकाप्रत' असे कोणाला विनविले ?**
अ) गणपतीस ब) पांडुरंगास क) ईशास ड) जगदंबेस

५) **श्रीगजानन महाराजांनी कोणती विद्या मोक्षदात्री आहे असे म्हटले आहे ?**
अ) वेदविद्या ब) अध्यात्मविद्या क) परमार्थविद्या ड) परोपकारी विद्या

६) **बाळाभाऊंनी कवरांना काय करू नये असे सांगितले ?**
अ) रात्री प्रवास ब) प्रसादाचा इन्कार क) व्यतिपाती ड) घाईघाईत

७) **श्रीगजानन महाराजांच्या चरणतीर्थाने किती भक्तांचे रोगनिवारण झाले ?**
अ) एक ब) दोन क) तीन ड) चार

८) **सुखदेव हा कोणत्या गावाचा राहणारा होता ?**
अ) पळसखेड ब) कोंडोली क) अडगाव ड) बाळापूर

९) **टिळकांना कोणत्या कलमाखाली अटक झाली ?**
अ) १३६ ब) ४२० क) १४० ड) १२४

१०) **कोणाला पुत्रशोक झाला असुनही पुण्यतिथी जेवायला आले होते ?**
अ) लक्ष्मण जांजळ ब) बापट क) गणपतराव ड) माधव जोशी

**प्रश्नसंच ३६ उत्तरे**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) द्वार | २) हृदयात | ३) सविता | ४) कामकर्त्या | ५) पुष्पामुळे |
| ६) ध्येयविषय | ७) सुखद | ८) गंगास्नानाला | ९) हीन | १०) शंभर |

## Math Puzzle

Solve the following funny riddle

1) Name a 3D shape that looks the same as your favorite ice cream.

2) Name the shape that has no angles but is not a circle.

3) Where can you add 2 to 11 and get 1.

4) How can the circle have two sides?

## चालवा डोकं सोडवा कोडं

**शब्दाच्या शेवटी 'शी' हे अक्षर आले पाहिजे**

उंदरांच्या मैत्रीणी
डोक्याखाली घ्यायचे साधन
सहा पायांचा किटक
अंघोळ न केलेली व्यक्ती
अन्न न मिळालेला
स्वर्गातील अप्सरा
आईची बहीण
अधिक खाण्याची हाव असलेला
सारवासारव, मल्लिनाथी

## वारसा

**प्रवीण अविनाश योगी/** ७५०७४ ९३११२

# किल्लो रायगड



१६५६ साली रायगड शिवाजी महाराजांच्या ताब्यात आला तेव्हा त्याचं प्रचलित नाव रायरी असे होते. 'रायरी' हा 'रायगिरी'चा अपभ्रंश! १६५६ साली सप्टेंबर महिन्यात महाराजांनी आपल्या ताब्यातील किल्ल्यांची नावे संस्कृत वळणावर ठेवली, त्यात रायरीचे रायगड झाले. तरी राज्याभिषेकाच्या वेळी जगदीश्वर मंदिरावरील शिलालेखात 'रायगिरी' असाच उल्लेख आला आहे. वर्ष १६६७ पासून महाराजांनी आपली राजधानी राजगडावरून रायगडावर हलविण्यास सुरुवात केली. १६७० साली गडावर राजधानीस आवश्यक अशी बांधकामे करण्यास सुरुवात केली. महाराजांनी रायगड सारख्या अवघड जागी एक योजनाबद्ध असे नगरच बसविले. गडावर केलेली नगररचना त्यांच्या प्रतिभेतून साकार झालेली आहे. या सर्व गोष्टी अवशेष स्वरूपात का होईना आज जागेवर शिल्लक आहेत. रायगडाचा माथा जवळपास साडेतीन किलोमीटर लांब व दीड किलोमीटर रुंद आहे. रायगडाचा पसारा मोठा आहे. संपूर्ण रायगडाचे वर्णन एक किंवा दोन लेखात करणे अशक्य...

रायगड नगर रचना

१) लष्करी विभाग : जगदीश्वर मंदिराच्या पूर्वेला मंदिरापासून ते भवानी टोकापर्यंत हा गडाचा लष्करी भाग! यात शिबंदीसाठी एकूण सात बरॅक्स आहेत. मंदिरासमोरच एक बरॅक आहे आणि पूर्व-पश्चिम असलेल्या बरॅकची लांबी ५०० फूट आहे. दुसरी दक्षिणोत्तर आहे. काळ्या हौदाजवळ तीन बरॅक्स आहेत व पुढे भवानी टोकाकडे जाताना उजव्या हाताला दोन बरॅक, अशा एकूण सात बरॅकी या शिबंदीसाठी! सैनिकांसाठी बरॅक्स बांधणारे शिवाजी महाराज हे जगातील पहिले सत्ताधीश असावेत.

काळ्या हौदाच्या पूर्वेला बरॅक्स पासून दूर दोन उंचवट्यावर (निरगुडी) निवडुंगाची दाट झाडी आहे. आतमध्ये उध्वस्त स्थितीतील बांधकामे आहेत हीच गडाची 'दारू कोठारे'! आज्ञापत्र म्हणते,'दारूखाना घराजवळ घराचे वारियाखाले नसावा.' सदरेपासून सुमारास जागा पाहून भोवती निर्गुडी (निवडुंग) आदिकरून झाडाचे दाट कुसुं घालून बांधावा॥' हा लष्करी विभाग मुख्य वस्ती पासून एका बाजूला आहे. लष्करी भागासाठी पाण्याची सोय चांगली आहे. काळा हौद आहेच. भवानी टोकाजवळ एक तलाव व काही टाकी आहेत. जगदीश्वर मंदिराच्या दक्षिणेला दोन तलाव आहेत. बाराटाकी याच भागात येतात. जगदीश्वर मंदिराकडून बारा टाक्यांकडे जाऊ लागले की एक प्रचंड आकाराचा वाडा लागतो. हा लष्करी भागाला लागून असलेला सेनापतीचा वाडा होय.

गडावर धान्य कोठारे दोन ठिकाणी, एक बारा टाक्याजवळ व दुसरे टकमक टोकाजवळ! बाराटाक्यांजवळील धान्य कोठार हे लष्करी विभागासाठी!

२) प्रशासकीय विभाग : टॉमस निकल्स हा ईस्ट इंडिया कंपनीचा वकील १६७३ च्या मे महिन्यात रायगडावर आला होता. त्याच्या डायरीप्रमाणे बालेकिल्ल्यातील महाराजांचा वाडा (राजमंदिर) हिच गडाची मुख्य कचेरी (हेड ऑफिस) तेथे बसून महाराज सर्व राजकारभार करीत. त्यामुळे महाराजांचे वाड्याजवळच अतिमहत्त्वाच्या कचेऱ्या असणार. बालेकिल्ल्याच्या पश्चिमेला सहा दालने आहेत. या सहा महाराजांच्या खास कचेऱ्या! या सहा दालनांपैकी उत्तरेकडील दोन दालने स्वतंत्र आहेत. व दक्षिणेकडील चार दालने एका बोळाने जोडलेली आहेत. उत्तरेकडील जी दोन दालने स्वतंत्र आहेत. तसेच, बालेकिल्ल्याच्या दक्षिणेला खोलगट भागात पाच बांधकामे आहेत. या पण, महाराजांच्या खासकचेऱ्या!

बालेकिल्ल्यापासून जगदीश्वर मंदिराकडे जाऊ लागले की, ४० फूट रुंदीच्या रस्त्याच्या दुतर्फा ८५० फूट लांबीचे बांधकाम आहे. तेथे प्रत्येक बाजूस बावीस म्हणजे एकूण चव्वेचाळीस कचेऱ्या (प्रचलित बाजारपेठ) आहेत. बालेकिल्ल्यातील अकरा अधिक या चव्वेचाळीस अशा एकूण पंचावन्न कचेऱ्या, हा झाला गडाचा प्रशासकीय विभाग!

३) रायगड नगर : बालेकिल्ल्याकडून जगदीश्वर मंदिराकडे जाऊ लागलो की, डाव्या हाताला बरीच बांधकामे आहेत. सध्या ढासळल्यामुळे नुसते ढिगारे दिसत आहेत. तसेच, उजव्या हातालाही काही बांधकामे आहेत. यातील बहुतेक घरं उत्खनन करून साफसूफ केलेली आहेत. हे झाले रायगड नगर (रायगड सिटी)!

४) चाणक्यपुरी (अष्टप्रधानांचे वाडे) : बालेकिल्ल्याच्या कथित मेणा दरवाजाने बाहेर पडून डाव्या हाताने तसेच कुशावर्त तलावावरून बारा टाक्यापर्यंतच्या भागात एकूण आठ प्रशस्त वाडे आहेत. त्यातील काही वाडे उत्खनन करून साफ केलेले आहेत. त्यावरून त्यांच्या प्रशस्तपणाची कल्पना येते. प्रधानांच्या इतमामाला साजेसे हे अष्टप्रधानांचे वाडे आहेत. त्यातील 'कोणता वाडा कोणत्या प्रधानाचा' हे सांगणे कठीण आहे. ही झाली रायगड नगर रचना! टॉमस निकल्सच्या म्हणण्याप्रमाणे गडावर पाणी मुबलक होते. गडावर एकूण आठ मोठे तलाव व ७० ते ७५ टाकी एवढा पाणीसाठा होता. गडकिल्ल्यांविषयी पुढच्या भागात आणखी जाणून घेऊ.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शहरासह तालुक्यातील १६ ते १७ दुकानांना अंतोदय योजनेत समाविष्ट केल्याप्रकरणी उच्चारसरणीय चौकशी

सिल्लोड प्रतिनिधी : आर्थिक परिस्थिती बिकट असलेल्या कुटुंबांना लाभ देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने अंतोदय योजनेच्या माध्यमातून मोफत धान्य पुरवठा. मागील काळापासून सुरू केला आहे या योजनेत . तालुक्यातील धन दांडग्या लोकांना समाविष्ट करून. गोरगरिबांचा हिस्सा लुबाडण्याचे काम संबंधितांनी केले आहे सप्टेंबर २०२४ पासून सदर. गोंधळ सुरू असल्याचे . अंकुश पाटील यांनी तक्रारीत म्हटले आहे तहसील कार्यालयाचे पुरवठा निरीक्षक बळीराम मुंडे यांच्या सहकारी कर्मचाऱ्यांना यात. असल्याचे आपले हित जोपासण्याचे काम केले आहे.

गोरगरीब कुटुंबीयांचा घास हिरावून घेत. धन दांडग्यांच्या . घशात घालणाऱ्या पुरवठा विभागातील बहादरांनी. आपल्या कर्तबगारिने नवा आदर्श निर्माण केला आहे. या गंभीर बाबी संदर्भात वरिष्ठ पातळीवरून कोणती पावले उचलली जातात. हे पाहणे याबाबत उत्सुकता सिंगेला पोहोचली आहे.

## बालकलाकार सांगताहेत, बाल दिन का खास आहे

बाल दिन म्हणजे सळसळत्या भावना, कुतूहल आणि भविष्याला आकार देणारी अफाट ऊर्जा यांचा आनंद सोहळा आहे. हा असा दिवस आहे, जेव्हा हवेत हास्य भरलेले असते, निरागसता हास्य फुलवते आणि प्रत्येक क्षणात नवीन स्वप्न आणि शोधाचे स्वप्न असते. यावर्षी, सोनी सबवरील सुभान खान, एकांश कथोरिया, आएशा विंधारा, परी भट्टी आणि रोशन वालकर हे गुणी बाल-कलाकार आपण हा खास दिवस कसा साजरा करणार हे शेअर करत आहेत. आपल्या चाहत्यांसाठी ते काय संदेश देत आहेत पाहू या.'गाथा शिव परिवार की - गणेश कार्तिकेय' मालिकेत कार्तिकेयाची भूमिका करणारा सुभान खान म्हणतो, बाल दिनी हा विचार प्रकर्षाने मनात येतो की, प्रत्येक मुलात काही तरी खास असतं.

## सोनी सबवर एकेन बाबू सुरू

८०च्या दशकातील गाजर खाणाऱ्या गुप्तचरापासून ते आजकालच्या मालिकांमधील चाणाक्ष, भावनांची छटा दाखवणाऱ्या डिटेक्टिव्हज पर्यंत गेल्या काही दशकांत भारतीय टेलिव्हिजनवर गुन्ह्याची कोडी सोडविणारे अनेक गुप्तचर येऊन गेले. प्रत्येक दशकात रहस्य पडद्यावर ज्या प्रकारे उलगडते, त्याबाबत वेगळेपण दिसते. आणि आता, ही परंपरा पुढे नेत हिंदी जीईसी सोनी सब आपल्या प्रेक्षकांसाठी या प्रकारात डिटेक्टिव्ह कॉमेडी 'एकेन बाबू'च्या रूपात एक नवा ट्विस्ट घेऊन येत आहे. या मालिकेच्या केंद्रस्थानी अत्यंत तल्लख डोक्याचा, काहीसा विचित्र बंगाली गुप्तचर एकेन आहे. त्याच्या काहीशा गबाळ्या रूपामागे एक तल्लख मेंदू आहे. ही मुळची बंगाली मालिका असून बंगालमध्ये अत्यंत लोकप्रिय झाली आहे. सोनी सबवर या मालिकेच्या हिंदीत डब केलेल्या आवृत्तीची चाहते वाट बघत आहेत.

## 'ताठ कणा' - २८ नोव्हेंबर रोजी प्रेक्षकांच्या भेटीला

छत्रपती संभाजीनगर : जगप्रसिद्ध न्यूरोस्पाईन शल्यचिकित्सक डॉ. प्रेमानंद रामाणी यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासावर आधारित 'ताठ कणा' हा चित्रपट येत्या २८ नोव्हेंबर रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. माणसाला धैर्य त्याच्याच ताठ कण्यामुळे मिळते, या वि.वा. शिरवाडकरांच्या विचाराची प्रचिती देणारा हा चित्रपट जिद्द, संघर्ष आणि मानवतेच्या भावनेने सजलेला आहे. 'प्रज्ञा क्रिएशन्स'चे विजय मुडशिंगीकर आणि 'स्प्रिंग समर फिल्म्स'चे करण रावत या निर्मात्यांनी चित्रपटाची निर्मिती केली असून दिग्दर्शन गिरीश मोहिते यांनी केले आहे. पटकथा आणि संवाद लेखन श्रीकांत बोजेवार यांचे आहे. डॉ. रामाणी यांच्या भूमिकेत उमेश कामत मी, तर त्यांच्या सहचारिणीच्या भूमिकेत दीप्ती देवी दिसणार आहेत. इतर कलाकारांमध्ये सायली संजीव, सुयोग गोऱ्हे, अजित भुरे, शैलेश दातार यांचा समावेश आहे. चित्रपटाचे छायांकन कृष्णकुमार सोरेन, संकलन निलेश गावंड आणि संगीत अविनाश-विश्वजीत यांचे आहे. डॉक्टरांच्या चिकाटीचा, संशोधनातील संघर्षाचा आणि मानवतेच्या सेवाभावाचा प्रवास सांगणारा 'ताठ कणा' हा चित्रपट प्रेरणादायी ठरणार आहे.

# पालकमंत्री मेघनादिदि बोर्डीकर यांचा पालम शहरात नागरी सत्कार संपन्न



पालम (वा) दि.७ नोव्हेंबर रोजी पालम तहसील कार्यालयासमोर राज्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांचा पालम तालुका भाजपा पक्षाच्या वतीने भव्य नागरी सत्कार आयोजित करण्यात आला.भाजपचे ज्येष्ठ नेते गणेशराव रोकडे (दादा) यांच्या वतीने भव्य नागरी सत्कार आयोजित करण्यात आला होता.यावेळी मुख्य चौकात जेसीबी मधुन फुलांची उधळण पालक मंत्री यांच्यावर करण्यात आली सभास्थळापर्यंत मिरवणूक काढण्यात आली.यावेळी नागरी सत्कारा सोबतच जनसंवाद मेळावा संपन्न झाला.या कार्यक्रमाला भाजपा नेते सुरेशराव वरपुडकर,सतोष मुरकुटे,गणेशराव रोकडे दादा,सुरेशराव भुमरे, प्रेरणाताई वरपुडकर, डॉ खटिग, प्रभाकराव वाघिकर,भरत घनदाट, सुभाष कदम,अँड तादळे,विठ्ठलराव रबदाडे,लिबाजी टोले, लक्ष्मणराव रोकडे, शेळके, बालासाहेब रोकडे, गजानंन रोकडे यांच्या सह परभणी जिल्ह्यातील भाजपचे सर्व प्रमुख नेते, पदाधिकारी तसेच पालम शहरासह तालुक्यातील भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमात अनेकानी भाजपात प्रवेश केला व विविध नागरीकानी मागण्याचे निवेदन पालक मंत्री यांना देण्यात आले.

# नगरपालिका ताब्यासाठी कॉंग्रेसची रणनीती

### कन्नडमध्ये स्नेहमेळावा व आढावा बैठक उत्साहात




तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.०९ नोव्हेंबर - आगामी नगर परिषद, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कॉंग्रेसने तालुक्यातील संघटनबांधणीस गती देत दमदार तयारी सुरू केली आहे. शनिवारी (दि.८) दुपारी २ वाजता कन्नड शहरात दिवाळी स्नेहमेळावा व कार्यकर्त्यांची आढावा बैठक मोठ्या उत्साहात पार पडली.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष किरण पाटील डोणगावकर होते. प्रमुख उपस्थितीत खासदार कल्याण काळे, परभणीचे माजी खासदार तुकाराम रेंगे, माजी आमदार व प्रदेश सरचिटणीस नामदेव पवार यांनी सहभाग घेतला.

या वेळी मार्गदर्शन करताना खा. कल्याण काळे म्हणाले, कॉंग्रेस पक्ष ही विचारांची ताकद आहे. आपण सर्वांनी एकदिलाने, प्रामाणिकपणे आणि संघटित पद्धतीने काम केल्यास आगामी निवडणुकीत कन्नड नगरपालिकेवर कॉंग्रेसचा ताबा निश्चित आहे.

खा. तुकाराम रेगें यांनी सांगितले, कन्नडमध्ये कॉंग्रेस कार्यकर्त्यांमध्ये जबरदस्त ऊर्जा दिसत आहे. बूथ लेव्हलवर मतदारांशी सातत्याने संपर्क ठेवा, हीच विजयाची गुरुकिल्ली आहे.

माजी आमदार नामदेव पवार म्हणाले, पक्षाची ताकद म्हणजे कार्यकर्ते. प्रत्येक विभागात कार्यकर्त्यांनी जनसंपर्क वाढवून पक्षाचा झेंडा उंच ठेवावा. युतीपेक्षा संघटनावर विश्वास ठेवा आणि जनतेचा विश्वास संपादन करा.

बैठकीदरम्यान नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी रणनीती, बूथ कमिट्या, प्रचार मोहीम, तरुण व महिला कार्यकर्त्यांची भूमिका याबाबत सविस्तर चर्चा झाली. या वेळी माजी जिल्हा परिषद सदस्य धनराज बेडवाल, महिला आघाडीच्या अध्यक्षा सुमित्रा आव्हाळे, तालुकाध्यक्ष गणेश शिंदे, शहराध्यक्ष असद खान, मुजीब मेंबर, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार फरीन अब्दुल जावेद, सुलतान भाईजी, रफिक गनी, साहेबखान पठाण, याकुब शेख, अण्णासाहेब चव्हाण, दत्तू चव्हाण, मोगल वाघ, बाबा शेख यांची उपस्थिती होती.

या बैठकीत एमआयएमचे फकीर रंगरेज यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला. या नव्या प्रवेशामुळे स्थानिक कॉंग्रेस संघटनेला नवचैतन्य प्राप्त झाले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब पवार यांनी केले, तर सचिन पवार यांनी आभार मानले.

# गटविकास अधिकारी गायकवाड यांची फारोळा ग्रामपंचायत येथे शेतकरी कॅम्पला भेट



तथा वृत्तसेवा

बिडकीन दि.९ नोव्हेंबर जिल्हा अधिकारी छत्रपती संभाजीनगर यांच्या आदेशानुसार पैठण तालुक्यातील ग्रामपंचायत फारोळा कार्यालय येथे ग्रीस्टॅक ( फार्मर आयडी) दोन दिवस कॅम्प लावण्यात आला व बाकी असलेल्या शेतकरी यांचे फार्मर आयडि काढुण देण्यात आले.

कॅम्प चालू असता पैठण गटविकास अधिकारी मनोरमा गायकवाड ,बिडकीन महसूल मंडळ अधिकारी रविंद्र जोशी ग्राममहसुल अधिकारी चित्तेगाव काळे यांनी भेट दिली.

यावेळी .ग्रामपंचायत अधिकारी ए.एस.तुपे, तलाठी आर जी मोखेडे, सरपंच सलीम पठाण, गणेश गायकवाड, दिलीप गोरे,तेजस जाधव,संजय धुमाळ,रविंद्र पवार, मंगेश धुमाळ आदी शेतकऱ्यांची उपस्थिती होती .

# मोहिनी सुरज लोळगे यांना वाढता पाठिंबा



तभा वृत्तसेवा

पैठण दि ०९ :- भारतीय जनता पार्टीच्या पैठण नगराध्यक्ष पदाच्या संभाव्य उमेदवार सौ मोहिनी सुरज लोळगे यांनी डोअर टू डोअर प्रचारावर भर दिला असून त्यांना पैठणकरांचा मोठा पाठिंबा मिळत आहे.

पैठण नगर परिषदेवर जनतेतून निवडणून आलेले भाजपचे माजी नगराध्यक्ष सुरज लोळगे यांनी केलेल्या सुशासन कामामुळे ते आजही प्रसिद्ध असून त्यांच्या काळात गरिबांना मिळालेले घरकुल, कोविड काळात नागरिकांची घेतलेली काळजी,पैठण शहराला राज्यात स्वच्छतेत अव्वल स्थान, ओपन स्पेस विकास, अभ्यासिका, दर्जेदार रस्ते आणि विविध विकास झालेली कामे साक्ष देतात. यंदा पैठण नगराध्यक्ष पद हे महिला वर्गासाठी राखीव असल्याने सौ. मोहिनी सुरज लोळगे या भाजपा कडुन इच्छुक उमेदवार आहेत. माजी केंद्रीयमंत्री रावासाहेब पाटील दानवे यांच्या प्रमुख उपस्थित झालेल्या पक्षाच्या मेळाव्यात त्यांनी सर्व्हेत नगराध्यक्ष पदासाठी लोळगेच अव्वल असल्याचे सांगितल्याने मोहिनी लोळगे यांना संभाव्य उमेदवार म्हणून बघितले जात आहे. तसेच लोळगे यांना प्रचारादरम्यान वाढता पाठिंबा मिळत आहे.

# व्हिएतनामची 'विनफास्ट' कंपनी महाराष्ट्रात इलेक्ट्रिक वाहन निर्मिती प्रकल्प उभारण्यास उत्सुक



छत्रपती संभाजीनगर -

महाराष्ट्र राज्याच्या औद्योगिक विकासाच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. व्हिएतनाममधील प्रसिद्ध इलेक्ट्रिक वाहन उत्पादक कंपनी विनफास्ट लवकरच महाराष्ट्रात आपला इलेक्ट्रिक वाहन निर्मिती प्रकल्प सुरू करण्याच्या तयारीत आहे.

विनफास्ट आशियाचे कार्यकारी अध्यक्ष फॅम सॅन चौ यांनी नुकतीच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सौजन्यभेट घेतली. या भेटीत राज्यात इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रात गुंतवणूक करण्याच्या आणि दीर्घकालीन औद्योगिक भागीदारी स्थापन करण्याच्या शक्यता चर्चिल्या गेल्या.

विनफास्ट कंपनीने अलीकडेच भारतात तामिळनाडूमध्ये आपला पहिला उत्पादन प्रकल्प सुरू केला आहे. त्यानंतर कंपनीने महाराष्ट्रातील औद्योगिक वातावरण, धोरणात्मक स्थान आणि सक्षम पायाभूत सुविधा लक्षात घेऊन राज्यात गुंतवणुकीचा विचार सुरू केला आहे.

या प्रकल्पासाठी बिडकीन डीएमआयसी औद्योगिक क्षेत्राला प्राधान्य मिळण्याची शक्यता आहे. बिडकीन ऊखखउ ने आपल्या अधिकृत सोशल मीडिया माध्यमांवर विनफास्ट कंपनीच्या या निर्णयाचे स्वागत करत, महाराष्ट्रात नव्या औद्योगिक संधी निर्माण होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला आहे.

उद्योग विभाग, महाराष्ट्र शासन राज्यात हरित ऊर्जा, इलेक्ट्रिक वाहन निर्मिती आणि शाश्वत औद्योगिक विकासाला प्रोत्साहन देण्याच्या दिशेने सातत्याने प्रयत्नशील आहे. विनफास्टसारख्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीच्या सहभागामुळे महाराष्ट्र 'ई-मोबिलिटी हब' बनण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल पुढे टाकत आहे.

# देवगिरी आयटीआयमध्ये सिएसआर अंतर्गत अत्याधुनिक प्रयोगशाळांचा विकास

छत्रपती संभाजीनगर : महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट औद्योगिक प्रशिक्षण संस्था पुरस्कार प्राप्त देवगिरी शासकीय आयटीआयने उद्योग सहकार्याच्या माध्यमातून अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारून कौशल्य विकासाच्या क्षेत्रात नवा आदर्श निर्माण केला आहे. संस्थेत २८ व्यवसायांतून १८६० विद्यार्थी तसेच अल्पकालीन अभ्यासक्रमांतून ४८० विद्यार्थी प्रशिक्षण घेत असून, स्थानिक उद्योगांसाठी कुशल मनुष्यबळ तयार करण्यात ही संस्था आघाडीवर आहे.

अलिकडेच विविध नामांकित कंपन्यांनी उडठ अंतर्गत प्रयोगशाळा विकसित केल्या आहेत. यामध्ये सिमेन्सची उत्पादन प्रयोगशाळा, खउखउख ॠेंपवरींळेपची इलेक्ट्रिक व्हेईकल प्रयोगशाळा, टोयोटा-मारुती-महिंद्राच्या वाहन दुरुस्ती प्रयोगशाळा, गरींरिची प्लंबिंग-इलेक्ट्रिकल प्रयोगशाळा, ढछड ॠेंपवरींळेपची सौरऊर्जा प्रयोगशाळा, डरळपीं ॠेलरळपची बांधकाम प्रयोगशाळा आणि ऊ-चरींची संगणक प्रयोगशाळा यांचा समावेश आहे. या प्रयोगशाळांमुळे दरवर्षी हजारो विद्यार्थ्यांना उद्योगमान्य प्रत्यक्ष प्रशिक्षण मिळत आहे.

संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत उपसंचालक प्रदीप दुर्गे आणि त्यांच्या टीमच्या कार्याचे विशेष कौतुक करण्यात आले. दुर्गे म्हणाले,

आधुनिक प्रयोगशाळांमुळे विद्यार्थ्यांच्या रोजगारक्षमतेत मोठी वाढ झाली आहे. उद्योगांचे सहकार्य हे युवकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. देवगिरी आयटीआयने सर्व उद्योगांना उडठ अंतर्गत प्रयोगशाळा विकासासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले आहे. यामुळे उद्योगांना कुशल मनुष्यबळ उपलब्ध होईल आणि प्रदेशाच्या औद्योगिक प्रगतीस नवी गती मिळेल.

# प्रथमेश मिसाळ यांचा राज्यस्तरीय अँथलेटिक्स स्पर्धेसाठी पात्र झाल्या बद्दल भव्य सत्कार



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.९ नोव्हेंबर : जिल्हा क्रिडा अधिकारी छत्रपती संभाजीनगर,बीड,जालना, हिगोली,विभागीय अँथलेटिक्स स्पर्धेमध्ये १४ वर्षाखालील १०० मीटर अंतर १२.८३ सेकंदात पार करुन मराठवाडा विभागातून दुसरा क्रमांक कै.बाबुरावजी काळे स्कूलचा विद्यार्थी प्रथमेस विजय मिसाळ सोयगाव याने पटकवला असून त्यांचा सोहणी सी.एस.सी सेंटर या ठिकाणी त्यांचे भव्य सत्कार करण्यात आला. त्याच्या या यशाने सोयगाव करांचे नाव राज्यभर झळकले आहे.या यशाबदल सोयगाव करांकडून कौतूकास्पद ठिक ठिकाणी अभिनंदन होत आहे. सोयगाव शहरातील सोहणी सी.एस.सी सेंटर येथे ह.भ.प.जितेंद्र पंडित महाराज,भाजपा जिल्हा सरचिटणिस सुनिल गव्हाडे,प्रा.कमलेश काळे,कृषीभूषण अरूण सोहणी,खरेदी विक्री संघाचे संचालक मंगेश सोहणी,संदिप सुरडकर,महेश मानकर,विजय गव्हाड आदींसह मान्यावराकडून सत्कार करण्यात आला.

## जाहीर समन्स

**मा.दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर गंगापुर यांचे न्यायालयात**

नियमित दिवाणी दावा न. १२८/२०२२

बेबी भाऊसाहेब महाले व इतर
विरुध्द
शांताबाई धनाजी कोळसे ग इतर

प्रकरण - वाटणी, साबी, जाहीर ठराव व मनाई हुकूम बाबत.

प्रति,

१) शांताबाई धनाजी कोळसे, ३) वेणुबाई धनाजी कोळसे, ६) सौ. विमलबाई कारभारी रोकडे, ७/अ) रत्नमाला भ्र. राजकुमार माघाडे ८) संजय तुकाराम शेळके, सर्व रा.माजरी, ता. गंगापुर जिऔरंगाबाद

ज्याअर्थी वादी नं. १) श्रीमती देवी भाऊसाहेब महाले, रा.गुटुब आखडा, पोस्ट राहुरी, ता. राहुरी जि.अहमदनगर व वादी नं २) जनाबाई दादासाहेब मोरे, रा.भगुर, ता. वैजापुर जि. औरंगाबाद ह.मु. बिडकीन, ता.पैठण जि.औरंगाबाद मो.नं. ८५५४९२९०५५ यांनी या न्यायालयामध्ये वाटणी, ताबा, जाहीर ठराव व मनाई हुकुम बाबत दावा सादर केला असून सदरचा दावा या न्यायालयामध्ये प्रलंबित असल्याने व सदरचे दाव्यामध्ये तुमचेवर समन्सची बजावणी होवू न शकल्याने

त्याअर्थी तुम्हांस या जाहीर समन्सव्दारे सुचित करण्यात येते की, सदरील प्रकरणामध्ये तुमची उपस्थिती नोंदविणे कामी पुढील तारीख ६/१/२०२६ या न्यायालयामध्ये ठेवण्यात आलेली आहे आणि म्हणून प्रस्तुतचे दाव्या मध्ये दि. ६/१/२०२६ रोजी तुम्ही स्वतः अथवा तुमचे प्रतिनिधी मार्फत या न्यायालयामध्ये सकाळी १०:३० वाजता हजर होवून तुमचे लेखी उत्तर सादर करावे. दि. ६/१/२०२६ रोजी न्यायालयात तुम्ही उपस्थित न झाल्यास नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी, म्हणून सदरचे जाहीर समन्रा आज दि. ७/११/२०२५ रोजी या न्यायालयाचे शिक्यानिशी व माझे सहिनिशी देण्यात येत आहे

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. श्री.आर.एन. पाठक न्यायाधिशसाहेब ६ वे सहदिवाणी न्यायालय, गंगापुर,**

किरकोळ दिवाणी अर्ज ७५८/२०२५

अर्जदार : नामदेव धोंडीबा ढोले, वय ७२ वर्षे, धंदा सेवानिवृत्त रा. ए-१७, अरिहंत नगर, सिंधी कॉलनी, तुळजा भवानी मंदिर जवळ, छ. संभाजीनगर, आणि प्लॉट क्र. ११४, दत्त मंदिर जवळ, सुर्या लॉन्स, बीड बायपास.

अरूनोद्य कॉलोनी, सातारा परिसर, छत्रपती संभाजीनगर.

// विरुद्ध //

गैरअर्जदार : निरंक

विषय : भारतीय उत्तराधिकारी कायदा १९५६ व बॉम्बे रेग्युलेशन तखखख चे कलम २ प्रमाणे वारसप्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात अॅड. एच. एल. ठोके, छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत वारस प्रमाणपत्र मिलण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांची पत्नी नामे राधाबाई नामदेव ढोले यांचे वृध्दपकाळाने दिनांक १७/०९/२०२५ रोजी राहत्या घरी अरिहंत नगर, सिंधी कॉलनी, छत्रपती संभाजीनगर येथे निधन झाले आहे. अर्जदार नात्याने मयताचे पती आहे. मयत राधाबाई नामदेव ढोले व अर्जदार यांना अपत्य नाही. मयत राधाबाई नामदेव ढोले चांनी त्यांच्या हयातीमध्ये मृत्युपत्र केले नव्हते. मयत मयत राधाबाई नामदेव ढोले यांच्या नावे मौजे गळनिंब, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर येथे गट नं. ३७ मध्ये १ हेक्टर ६० आर शेतजमीन आहे.

अर्जदार भारतीय संचारण निगम लि. (बीएसएनएल) या संस्थेतुन सेवा निवृत्त झाले असुन, त्याचे वय ७२ वर्षे असुन, सदर पहिल्या पत्नीचे मृत्युसमई वय ६९ वर्षे होते. अर्जदाराच्या मयत पत्नी राधाबाई नामदेव ढोले यांच्या नावे सन १९९५ साली सदर जमीन घेतली असुन, त्यांच्या मालकी, ताब्यात आहे. मयत राधाबाई नामदेव ढोले ह्या गृहीणी होत्या. म्हणुन मयताच्या नावे शेतजमीन गट क्र. ३७ क्षेत्र १ हेक्टर ६० आर, मौजे गळनिंब, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर च्या ७/१२ च्या उत्ताऱ्यावर अर्जदाराचे वारसा आधारे नाव नोंदविण्यासाठी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज सादर केला आहे. अर्जदार मयत राधाबाई नामदेव ढोले यांचे एकमेव वारस आहे. अर्जदाराशिवाय मयतास इतर कोणीही वारसदार नाहीत. अर्जदार यांची पत्नी मयत झाल्याने तिच्या नावे असलेली सदर मिळकत अर्जदाराच्या नावे करण्यासाठी वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे अर्जदारास वारस प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाचाही उजर आक्षेप असेल तर, अशांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आपला लेखी उजर, आक्षेप या न्यायालयात नोंदवावा मुदतीतनंतर कोणा उजर आक्षेप न आल्यास अर्जदारास वारस प्रमाणपत्र देण्यास पुढील कार्यवाही करण्यात येईल व मुदतीनंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही. प्रकरणाची पुढील सुनावणी दिनांक १२/१२/२०२५ रोजी ठेवली आहे.

करिता आज दिनांक ०७/११/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले आहे.

क. लिपीक — सहाय्यक अधीक्षक
न्यायालय अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर

# इटोली गावच्या विकासासाठी कमी पडणार नाही मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते इटोली येथे राज्यस्तरीय मॅरेथॉन स्पर्धा, नागरी सत्कार व विकासकामांचे लोकार्पण

### भव्य उत्साहात पार पडला सोहळा; ट्रिपल इंजिन सरकारसाठी भाजपाच्या उमेदवारांना साथ द्या - मेघना बोर्डीकर



जिंतूर / प्रतिनिधी : जिंतूर तालुक्यातील इटोली पंचकोशी परिसर शनिवारी (दि. ८ नोव्हेंबर) विकास, क्रीडा आणि सामाजिक उत्साहाने उजळून निघाला. सकाळपासून राज्यस्तरीय मॅरेथॉन स्पर्धा, भव्य नागरी सत्कार सोहळा आणि विविध विकासकामांच्या लोकार्पणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. राज्याच्या राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मा. मेघना बोर्डीकर यांच्या शुभहस्ते या विकासकामांचे लोकार्पण करण्यात आले.

सकाळी १० वाजता राज्यस्तरीय मॅरेथॉन स्पर्धेला प्रारंभ झाला. स्पर्धेत सहभागी खेळाडूंनी दमदार कामगिरी करत परिसरातील क्रीडाप्रेमींना मंत्रमुग्ध केले. विजेत्यांना पारितोषिक, मानपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. यानंतर बसस्थानक परिसरात नागरी सत्कार सोहळा पार पडला.

आडगाव बाजार सर्कल परिसरातील सर्व गाव, वाडी, तांडा आणि वस्ती येथील नागरिकांसह सामाजिक, राजकीय, धार्मिक संस्था तसेच विविध संघटनांच्या वतीने राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. तब्बल दोन तास चाललेल्या या कार्यक्रमात मान्यवरांनी आपली मनोगते व्यक्त केली.

या प्रसंगी बोलताना मंत्री बोर्डीकर म्हणाल्या, राज्यात डबल इंजिन सरकार कार्यरत आहे. आता स्थानिक स्वराज्य संस्थांवरही भाजपाचा झेंडा फडकवून ट्रिपल इंजिन सरकार घडवायचे आहे. त्यामुळे विकासाची गंगा सर्व स्तरांपर्यंत पोहोचेल. त्यासाठी नागरिकांनी नगरपरिषद, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत निवडणुकीत भाजपाच्या उमेदवारांच्या पाठीशी ठामपणे उभे राहावे.

दरम्यान, इटोली ग्रामपंचायत आणि समता फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नेत्र तपासणी व मोफत शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला ग्रामस्थांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमास मा. रमेशचंद्र दरगड (अध्यक्ष, व्यापारी महासंघ जिंतूर), संजय गांधी योजनेचे तालुकाध्यक्ष डॉक्टर पंडितराव दराडे भाजप तालुका अध्यक्ष गोविंद भाऊ थिटे रवी सर भोगावकर श्रीनि वास घुगे सरपंच डिग्रसमाजी जि.प. सदस्य सौ. अरुणा काळे, अविनाश काळे, नानासाहेब राऊत, सुंदरराव चव्हाण (उपसभापती, कृ.उ.बा.स. जिंतूर), गंगाधर तरटे सचिन आडे जामकर अजित भोबे पाटील माथलेकर डॉक्टर देवराव कराळे मीनाताई कराळे नंदाताई निंबाळकर प्रदीप राव दाभाडे सरपंच आडगाव रोहन गायकवाड गंगाधर तरटे आप्पाआदी मान्यवर उपस्थित होते.

राज्यमंत्री बोर्डीकर यांनी इटोली परिसरातील सुरू असलेल्या विकासकामांची पाहणी करून ती वेळेत पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. ग्रामस्थांच्या एकजुटीचे कौतुक करत त्यांनी विकासात सक्रिय सहभाग ठेवण्याचे आवाहन केले.

ग्रामपंचायत इटोली चे सरपंच संगीता ताई जगदीश राव घुगे यांच्या पुढाकारामुळे आणि सर्व ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे हा सोहळा शिस्तबद्ध व उत्साहात पार पडला. शेवटी उपस्थित मान्यवरांनी ग्रामस्थांचे अभिनंदन करत भविष्यातही अशा उपक्रमांत सक्रिय सहभागाची अपेक्षा व्यक्त केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जगदीश राव घुगे पाटील यांनी केले यांनी केले.

## प्रासंगिक

# कथा लष्करी ड्रोन्सची, व्यथा त्यांच्या ऑपरेटर्सची

**कर्नल अभय बाळकृष्ण पटवर्धन (नि.)**

पहलगाम भ्याड हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने ऑपरेशन सिंदूर चालवलं. या आधी रशिया-युक्रेन, इस्रायल-हमास, हिजबुल्ला आणि इस्रायल-इराण युद्धांमध्ये मानवरहित विमान, अनमॅन्ड एरियल व्हेईकल, यूएव्ही, ड्रोन्सचा प्रचंड मोठा वापर झाला आणि होतो आहे. इस्रायल, इराण, हमास-हिजबुल्लाकडून दिवसाला प्रत्येकी २५०-३०० ड्रोन्स तर रशिया-युक्रेनकडून युद्धाच्या सुरुवातीला दररोज अंदाजे १००० आणि नंतर दररोज अंदाजे २० ते २५ हजारांवर ड्रोन्स वापरात आणले गेले. भारताला यापुढे या नवीन प्रणालींचा सामना करावा लागणार आहे. यासाठी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मुंबईत विकसित करण्यात येत असलेले व्हर्टिकल टेक ऑफ आणि लॅण्डिंग ड्रोन्स, जीपीएस, इंटर ड्रोन कम्युनिकेशन सिस्टिम किंवा केंद्रिकृत नियंत्रण प्रणालींवर अवलंबून न राहता समन्वित झुंडींमध्ये उडू शकतील. या ड्रोन्समध्ये ऑन-बोर्ड कॅमेऱ्यांद्वारे मिळविलेली बेअरिंग ओन्ली मापक संबंधित लक्ष्य रचना निश्चित करतील. अशा ड्रोन झुंडींमध्ये स्वायत्तता राखणे अत्यावश्यक असल्यामुळे झुंडीतील प्रत्येक ड्रोन आपली, त्याची माहिती किंवा कृती काय असावी, हे ठरवणाऱ्या मानवी-केंद्रिकृत संगणकावर अवलंबून राहण्याऐवजी स्वतःच्या ऑन-बोर्ड सेन्सर्सद्वारे मोजता येणाऱ्या चलांवर आधारित स्वतःच्या क्रिया ठरवू शकतील.

वरील तीनही युद्धे आणि ऑपरेशन सिंदूरमध्ये प्रमुख भूमिका निभावणाऱ्या ड्रोन्समुळेच ८० टक्के संसाधन, जीव-वित्तहानी झाली आहे. ड्रोनचे कॅमेरे कामिकाझे हल्ल्यांचे मार्गदर्शन करून युद्धभूमीतील डग आऊट्स, कार आणि सैनिकांवर थेट आत्मघाती प्रहार करतात. ड्रोन हल्ल्यात बचावलेला सैनिक, ड्रोन उडवणारे ऑपरेटर्स आणि सतत भोवताली होत असलेल्या ड्रोन्स आवाजाच्या भीतीच्या सावटाखालील युद्धभूमीवर जगणाऱ्यांच्या अनुभवांवरून हे प्रत्ययाला येते की ड्रोन युद्धातील एक निर्णायक शस्त्र झाले आहे. वरून आकाशातून आपली शिकार होते आहे किंवा कोणी करणार आहे, या सतत उद्भवणाऱ्या भावनेला मानस शास्त्रज्ञ 'ड्रोनफोबिया' म्हणतात. त्यानुसार बदलता काळ व रणनीती अंतर्गत सतत ड्रोन हल्ल्यांच्या भीतीखाली वावरणाऱ्या, लाँच करणाऱ्या सैनिकावर त्यामुळे निर्माण होणाऱ्या फोबियाचे काय परिणाम होतात त्याच्या अनुभवांचे विश्लेषण करण्याचा हा प्रांजळ प्रयत्न.

ड्रोन ऑपरेटर्ससाठी टेक्निकल बॅक ग्राऊंड आणि शत्रू स्थानांवर हल्ले करण्याचं प्रशिक्षण आवश्यक असतं. तो नकाशा, कॅमेरे आणि इतर सेन्सर्सचा वापर करून माहिती गोळा करतो आणि सैन्याच्या मोहिमेशी संबंधित निर्णय घेतो. ड्रोन ऑपरेटर्सना ड्रोन्समधील अत्याधुनिक तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित स्वयंचलित प्रणालीचा वापर करता येणे जरुरी आहे. यासाठी त्यांना सतत सरावाद्वारे ड्रोन उडवून शत्रूवर मारा करण्याचं कौशल्य आत्मसात करावं लागतं. लष्करी ड्रोन ऑपरेटरची भूमिका अतिशय महत्त्वाची असल्यामुळे त्याला ड्रोन शोधणं, ओळखणं आणि त्यावर उपाययोजना करण्यासाठी अल्गोरिदम लागू करता येणं आवश्यक असत. युद्धजन्य परिस्थितीत हे गुंतागुंतीचं होतं. कारण तुम्हाला शत्रूकडून काय अपेक्षा करावी, हे माहीत नसतं. भारतीय लष्कराने युद्धात ड्रोनचा पहिला वापर ऑपरेशन सिंदूरमध्ये केला. त्यामुळे ड्रोन हल्ले व उड्डाणाचे आपल्या सैनिकांचे अनुभव मर्यादित असले, तरी ते वरील तीन युद्धात सामील झालेल्या परदेशी सैनिकी अनुभवांच्या धर्तीवरच आहेत. ऑपरेशन सिंदूरमध्ये सहभागी ड्रोनच्या थेट हल्ल्यातून बचावलेल्या 'एक्स' या भारतीय ड्रोन कमांडरनुसार हल्ल्याकरिता येणाऱ्या ड्रोनचा एक विवक्षित प्रकारचा पण कान बधिर करणारा खरखरीत आवाज, सतत, कुठूनही, सगळीकडून एकाच वेळी येतो आहे असे वाटते. उघड्यावर असताना, आकाशातून आपल्या अंगावर पोझिशनकडे येणाऱ्या आर्टिलरी शेलचा येतो तसाच हा आवाज असतो. दुसरे म्हणजे, स्वतःवर येणाऱ्या आत्मघातकी ड्रोनचा स्फोट ऐकू येत नाही. फक्त आधी कानात एक माशीसारखा गुणगुणणारा, मेंदू बधिर करणारा आवाज ऐकू येतो आणि नंतर गुडुप्प अंधार होऊन सर्व काही शांत होते. उघड्यावर कार्यरत असताना ड्रोनच्या माऱ्यात आलेल्या काहींचे केवळ पाय-हात-डोळेच गंभीररीत्या जखमी होतात. पण काही दुर्दैवी सैनिक हुतात्माही होतात.

या ड्रोन ऑपरेटरनुसार त्याच्या युनिटने पाक क्षेत्रातून त्यांच्याकडे येणारे एक अवजड वाहन रडारवर पाहिले आणि त्यांनी ते वाहन ड्रोनहल्ला करून नष्ट केले. या हल्ल्याची पुष्टी आणि शत्रू नुकसानीचे चित्रीकरण करण्यासाठी त्यांनी लगेच दुसरा ड्रोन लाँच केला. ड्रोनचे उड्डाण आणि परत येतानाचे आवाज ड्रोन ऑपरेटर्स-क्रूंना नेहमीच ऐकू येत असल्यामुळे कालांतराने ते त्याकडे दुर्लक्ष करतात, पण यावेळी या नेहमीच्या आवाज-कल्लोळांनी त्या ड्रोन ऑपरेटरला फसवलं. शेवटच्या क्षणी त्याच्या लक्षात आले की, यावेळी येणारा आवाज काही वेगळाच आहे. पण तोपर्यंत खूप उशीर झाला होता. शत्रू ड्रोनमधील स्फोटकांनी त्याचे डोळे व हात फाडले आणि तो आंधळा झाला.

दुसऱ्या एक 'वाय' या भारतीय सैनिकानुसार, वर आकाशातून येणारी ड्रोनची भीती फार भयानक असते. त्याच्या युनिटला राजस्थान सीमेवरील एका डग आऊटमधील एका इन्फंट्री ड्रोन युनिटच्या बदल्यात जाण्याचा आदेश देण्यात आला. ते ड्रोन युनिट अगदी सीमेवर (बँग ऑन फ्रंट, आय बॉल टू आय बॉल) सक्रिय तैनात होते. ते लोक तेथे पोहोचायच्या आधी वाटेत असतानाच त्यांना एक संदेश आला की, 'समोरच्या रस्त्यावर काही स्लीपर ड्रोन्स दिसताहेत.' इराण आणि तुर्कस्तानमध्ये निर्माण झालेले हे स्लीपर ड्रोन्स नेहमी कमी शक्तीच्या मोडमध्ये उड्डाण करतात आणि उड्डाण केल्यानंतर कोणतंही लक्ष्य टप्प्यात येईपर्यंत ते काहीच करत नाही. मात्र, कुठलेही लक्ष दिसता क्षणीच ते त्यावर तुटून पडतात. त्या दिवशी त्यावेळी त्या सीमा क्षेत्रात पाकिस्तानचे



४५० वर आक्रमक, आत्मघातकी, स्लीपर ड्रोन्स उडत होते. पाक लष्कर फक्त नागरी ठिकाणांवर हल्ले करत. कारण भारतीय लष्करी पोस्टवरील हल्ल्यात त्यांचे नुकसान होण्याची संभावना खूपच जास्त असते, हे बाजूच्या गावांत उठलेले आगीचे लोळ उजागर करत होते. थोड्याच वेळात त्या ठिकाणच्या आकाशात तुर्की व इराणी ड्रोन्सचा एक थवा दिसू लागला. कमांडर वायला उड्डाणाच्या पिक्युलियर फ्लाईंग नॉईझवरून शत्रू ड्रोन्स ओळखण्याचे खासकरून हल्ला ड्रोन्सचा मंद, गुरगुरणारा, विवक्षित आवाज ओळखण्याचे प्रशिक्षण देण्यात आले होते. ड्रोन दिसताच कमांडर वायने रेडियोवर मदतीचा धावा केला. उत्तरात त्याला, नजीकच्या झुडुपात पोझिशन घेत कुमक (बॅक-अप) पोहोचण्याची वाट पाहण्याचे आदेश मिळालेत. बॅक-अप आला, त्याच वेळी पहिल्या ड्रोनच्या पाठोपाठ दुसरा शत्रू ड्रोनही आला. पाकिस्तानी एकाच्या पाठोपाठ दुसरा ड्रोन या रशियन युक्तीचा अवलंब करीत होते. त्याच्या मदतीसाठी आलेल्या बॅक-अपला तो दुसरा ड्रोन दिसला आणि त्या ड्रोननेदेखील या सर्वांना पाहिले. ड्रोनला चकवणं फार कठीण असतं. त्या ड्रोनमध्ये इम्प्रोवाईझ्ड एक्स्प्लोझिव्ह डिव्हाईस होती हे त्यांना नंतर कळलं. ते लोक त्या ड्रोनच्या नजरेत आल्याचे ड्रोनच्या बदलत्या आवाजावरून कळून आले आणि त्या सर्वांना वाटले की हा त्यांचा शेवट आहे. पण त्या ड्रोनने मारलेली सूरकांडी (डाईव्ह) त्यांच्या समोरच्या झुडपात पडल्यामुळे ते सर्व काही किरकोळ जखमांसहित तेथून सहीसलामत बाहेर पडू शकले. कमांडर वाय ऑपरेशन सिंदूर संपल्यावर हॉस्पिटलमध्ये आणि तेथून निघाल्यावर लांब वैद्यकीय रजेवर गेला. मात्र त्याला फ्लाईंग ड्रोन्सच्या त्रासदायक आठवणी, डान्सिंग ईमेजेस आणि सतत कानात गुंजणारे आवाज आजही त्रस्त करताहेत. त्याच्यानुसार 'हा आवाज विचित्र आहे. बऱ्याचदा मला कळत नाही की माझ्या कानाजवळ डास गुणगुणतो आहे की खरंच ड्रोन उडतो आहे. माशीचं घोंगावणंदेखील माझ्यासाठी त्रासदायक असतं.' कमांडर वायनुसार 'ड्रोन हल्ला होण्याआधी तुम्हाला असह्य वाटते. खरंच हल्ला होणार आहे की नाही हे माहीत नसते आणि कोणीही त्याबद्दल खात्री देऊ शकत नाही. कधी कधी हल्ल्याची अशी अपेक्षा (अँटिसिपेशन) आणखी वाईट असते. कारण त्यामुळे तुम्ही सतत हल्ल्याच्या भीतीखाली जगत असता. कोणताही इशारा न मिळता ड्रोनचे स्फोट होतात. ड्रोनचा आवाज आधी ऐकू येतो, पण तो ड्रोन पुढे कुठे जाणार आहे, हे तुम्हाला माहीत नसते. तो ड्रोन तुमच्या जागेच्या संदर्भात उजवी किंवा डावीकडे अथवा पुढे-मागे जाऊ शकतो किंवा तुमच्याकडेही येऊ शकतो.'

वर उल्लेखलेला 'ड्रोनोफोबिया' म्हणजे सतत ड्रोन हल्ल्याच्या भीतीमध्ये जगणे होय. इस्रायली मानसशास्त्रज्ञ स्वेतलाना शेवचेन्को, ड्रोन युद्धात झालेल्या मानसिक आघातांशी सामना कसा करायचा, याचा अभ्यास करणाऱ्या थेरपिस्ट आहेत. त्यांच्यानुसार अशा लोकांसाठी ड्रोनचा आवाज, तुमच्या शरीराला प्रतिक्रिया देण्यास भाग पाडून शरीरात एक अनियंत्रित तणाव निर्माण करतो. असा रुग्ण मोटारसायकल किंवा तत्सम इतर कोणत्याही वाहनाचा आवाज किंवा कुठलाही गुंजारव ऐकतो तेव्हाही त्याच्यात असाच तणाव निर्माण होतो. मानसिकदृष्ट्या त्याच्या कानात सतत एक त्रासदायक मंद गुंजन होत असते. युद्धात नागरिक व सैनिक दोघेही सतत ड्रोनच्या गुंगवणाऱ्या आवाजाखाली दिवस काढत असतात. या आजारात रुग्णाला महायुद्धातील 'शेल शॉक'मुळे व्हायचा तसा अर्धांग वायू होणे, स्मृती कमी होणे किंवा स्मृतिभ्रंश होण्याची संभावना अधिक असतात. सध्या अशी परिस्थिती आहे की, पाकिस्तान, इस्रायल, युक्रेन, रशिया किंवा इराणच्या सतत ड्रोन हल्ला होत असलेल्या क्षेत्रातील लहान-मोठे जबरदस्त मानसिक धक्क्याने पीडित असल्यामुळे कोणताही आवाज त्यांना खूप घाबरवतो. बाहेर असताना त्यांना असे आवाज ऐकू येताच ते घरात धावतात. माझ्या माहितीनुसार, अजूनपर्यंत तरी भारतात कोणालाही ड्रोनोफोबिया झाल्याचे ऐकिवात नाही.

ड्रोन वॉरफेयर आजमितीला युद्धातील सर्वांत प्रभावशाली हत्यार (मोस्ट पोटंट वेपन) झाले आहे, हे वर उल्लेखित युद्धांमधून उजागर झाले आहे. रशियाचे युक्रेनवर दर रोज दर १५ मिनिटांनी १५० हून अधिक एकेरी ड्रोन हल्ले होताहेत. त्याच्या उत्तरात युक्रेनची ड्रोन लॉन्चिंग स्पीड, ६०-७० ड्रोन्सचीच आहे. इराणने इस्रायलवर दोन तासांत १२०० ड्रोन्स पाठवले होते. ऑपरेशन सिंदूरवेळी पाकिस्तानने भारतावर एका रात्रीत ५०० वर ड्रोन्सचा मारा केला होता. ड्रोनची भीती केवळ आघाडीच्या लढाऊ सैनिकांपुरती मर्यादित नाही, हे रशिया-युक्रेन युद्धात सिद्ध झाले आहे. ड्रोन ऑपरेटर्स जेव्हा ड्रोन्सद्वारे कुठेही पार्क केलेल्या कार-बस किंवा सुपरमार्केटवर हल्ला करतात तेव्हा ते भावनाशून्य बनतात/असतात. पुंड लष्करी भाषेत (स्लँग मिलिटरी लँग्वेज) याचे वर्णन 'ह्युमन सफारी-मानवी पर्यटन मोहीम' असे केले जाते. तुम्ही फिरायला जाता तसेच हे ड्रोन ऑपरेटर्स ड्रोन्सना खूप गर्दीच्या ठिकाणांवर नेऊन स्फोटक हल्ला करतात. युद्धग्रस्त राष्ट्रांमधील सैनिक आता मनाला येईल तसे कुठेही जाऊ शकत नाहीत. कारण ते राहतात त्या ठिकाणांवरील सर्वदूर आकाश ड्रोन्सने भरलेले असते. त्या शहरांचे रक्षण करणारे सैनिकही झोपतात, शक्य असल्यास जेवतात, बंकरबाहेर पाऊलही टाकतात, पण सदैव ड्रोनद्वारे येत असलेल्या मृत्यूच्या छायेत वावरतात. शत्रू सैनिकांना घाबरवण्यासाठी रशिया-युक्रेनमधील निवासी इमारतींवर हल्ला करणाऱ्या ड्रोन्सवर सायरन बसवतो. दुसऱ्या महायुद्धात रशियावर हल्ला करणाऱ्या जर्मन 'स्टुका डायव्ह बॉम्बर्स'वर वाऱ्याच्या झोताने वाजणारे सायरन्स असतात; त्याचीच ही नक्कल आहे. त्यावेळी रशियन सैनिक व नागरिकांवर झालेल्या प्रचंड मानसिक आघातांसारखाच आघात आता युक्रेनच्या सैनिक व नागरिकांवर होतो आहे. आगामी काळात जे राष्ट्र आपलं ऐकत नाही, विरोध करतं त्याचा नाश करण्यासाठी किंवा मानसिक खच्चीकरण करण्यासाठी त्यांच्यावर असे हजारो ड्रोन्स सोडले जातील.

लष्करी किंवा संवेदनशील ऑपरेशन्समध्ये सामील होणाऱ्या ड्रोन ऑपरेटर्सवर ड्रोन्सचे अनेक परिणाम होतात. ड्रोन ऑपरेटरना मानसिक आरोग्याच्या गंभीर समस्यांना सामोरे जावे लागू शकते. कारण ते दूरवरून काम करत असले, तरी प्रत्यक्षात सदैव युद्धभूमीचं भयाण वास्तव अनुभवत असतात. ड्रोन ऑपरेटर्सच्या मानसिक आरोग्यावर होणाऱ्या नकारात्मक परिणामात- १) सतत हिंसक दृश्यांचा संपर्क, दुसऱ्याच्या जीवन-मरणाचे निर्णय घेणे आणि त्यामुळे येणाऱ्या मानसिक विरक्तीमुळे ड्रोन ऑपरेटर्सना मानसिक ताण आणि नैराश्याचा सामना करावा लागतो. २) युद्धात प्रत्यक्ष सहभागी सैनिकांप्रमाणेच ड्रोन ऑपरेटर्सना कारवाईनंतर बसणारा मानसिक धक्का (पोस्ट ट्रॉमॅटिक स्ट्रेस डिसऑर्डर) बसू शकतो. प्रत्यक्ष कारवाईच्या ठिकाणापासून ते हजारो मैल दूर असले, तरी स्क्रीनवर घडणाऱ्या भयानक घटना त्यांच्या मानसिकतेवर खोल परिणाम करू शकतात. ३) कामाचा प्रचंड भार (हेवी वर्क लोड), सतत टेहळणी (सर्व्हेलन्स) करण्याची, निर्णय (डिसिजन) घेण्याची व नाश (डिस्ट्रक्शन) करण्याची आवश्यकता आणि ड्रोन उडवणाऱ्या प्रशिक्षितांची कमतरता (डेफिशियन्सी) यामुळे सांप्रत, ऑपरेटर्सना मानसिक थकवा (मेंटल फटिग) आणि नैराश्य-औदासीन्य (बर्न आऊट) यांचा सामना करावा लागतो. ४) ड्रोन ऑपरेटर्सना अनेकदा नैतिकदृष्ट्या गुंतागुंतीचे निर्णय घ्यावे लागत असल्यामुळे मानसिक अपराधाची (मेंटल गिल्ट) भावना निर्माण होऊ शकते. ५) कामाचे दडपण, स्वरूपामुळे कौटुंबिक जीवनावर परिणाम होऊन वैयक्तिक आणि कौटुंबिक समस्या निर्माण होऊ शकतात. ऑपरेशन सिंदूरनंतर ड्रोन आणि ड्रोन युद्ध भारताच्या लष्करी आयामात सामील झाले. त्या ऑपरेशननंतरच लष्कराला जाणीव झाली की यापुढे ड्रोन शाश्वत असणार आहेत. युद्धात झालेली उत्क्रांती आहे. यापुढे ड्रोन मानवी सैनिकांच्या युद्धाचा आधारस्तंभ असतील आणि जितक्या लवकर आपण ते स्वीकारू तेवढे आपल्यासाठी चांगले असेल. भविष्यात चीन व तुर्कस्तान पाकिस्तानला शेकडो ड्रोन्सची मोठी खेप देणार आहे आणि या पुढेही देतच राहतील. त्यामुळे जरी भारताने अजून खऱ्या अर्थाने ड्रोन युद्ध अनुभवलेले नसले, तरी त्याला याचा अनुभव घ्यावा लागेल; तो दिवसही फार दूर नाही.

९४२२१४९८७६

## रविवारची पत्रे

### तरुण भारतचा सामूहिक तुळशी विवाह, एक सुखद अनुभव



आपल्या संस्कृतीमध्ये व सर्वच समाजामध्ये दीपावलीनंतर कार्तिक एकादशीपासून (यावर्षी २ नोव्हेंबरपासून ) कार्तिक पौर्णिमेपर्यंत (५ नोव्हेंबरपर्यंत ) घरोघरी तुळशी विवाह करण्याची पुरातन परंपरा आहे. तुळशीचे आरोग्य व पर्यावरण शुद्धीच्या दृष्टीने महत्त्व लक्षात घेऊन धार्मिक, सामाजिक परंपरेने तुळशी विवाहाचे विशेष आयोजन केले जाते. तुळशी विवाहानंतरच कुटुंबातील विवाहयोग्य मुला, मुलींचे विवाह प्रारंभ होतात. यावर्षीचा तुळशी विवाह विशेष होता.

तरुण भारत नागपूरने शताब्दी वर्षानिमित्त विशेष उपक्रमांचे आयोजन केले. ज्यात तुळशी रोपांचे वितरण, मंदिर स्वच्छता, बीज अंकुरे अंकुरेनिमित्त बियांचे समाजामधून एकत्रीकरण व वाटप, सामूहिक तुळशी विवाह याचा समावेश होता. मी तरुण भारतचा बालपणापासून वाचक तर आहेच शिवाय वार्षिक वर्गणीदार असल्याने वार्षिक वर्गणी घेण्यासाठी बुलढाणा येथून कैलास खांडेभराड व धाडचे प्रतिनिधी रामदास सनांसे आले होते. साहजिकच चहापान व तरुण भारत उपक्रमांबद्दल चर्चा झाली. यावर्षी सामूहिक तुळशी विवाह व त्यासाठी तरुण भारतकडून विवाह साहित्य व सुंदर सुबक छोटेसे तुळशी वृंदावन असलेली किट सर्वदूर निःशुल्क वितरित करण्यात आली. सर्व माहिती वेळोवेळी तरुण भारतमधून येतच होती. किटसाठी आगोदर नोंदणीचेही सूचित केले होते. आम्ही धाडकर (जि. बुलढाणा ) मात्र नोंदणी करण्याचे विसरलो. तरुण भारतचे बुलढाणा जिल्हा प्रतिनीधी नितीन शिरसाठ यांना फोन करून किटबाबत विचारणा केली असता स्वाभाविकच नोंदणी केली आहे का? असा प्रश्न आला. नोंदणी केलेली नाही मात्र किट द्याच असा आग्रह केला. किट शेष राहिल्या तर नक्कीच देऊ असे आश्वासक उत्तर आले. विशेष म्हणजे पाठपुरावा केला व आम्हाला तीन किट मिळाल्या.

तसे धाड हे ग्रामीण भागातील परंतु बुलढाणा तालुक्यातील सर्वांत मोठे गाव. पश्चिम विदर्भाचे शेवटचे टोक. येथून पुढे ८ किमी वर मराठवाडा सुरू होतो. विशेष म्हणजे १९३२ मधे येथे रा. स्व. संघाची शाखा सुरू झालेली व आजही उत्तम शाखा, येथूनच ग्रामीण भागात संघ विस्तार झाला. धाडला दि. २ ला पहिल्या सामूहिक तुळशी विवाहाचे वृत्त व फोटो जेव्हा व्हायरल झाले तेव्हा मला ग्रामीण भागातून फोन यायला लागले व आम्हालाही किट पाठवा. आम्हीही सामूहिक तुळशी विवाहाचे आयोजन करतो. उपक्रमच असा होता की, प्रतिसाद मिळणारच होता. आम्ही धाडकरांनी स्थानिक प्रतिनिधी रामदास सनांसे, अनिल कुटे, सचिन जोशी, सुभाष जाधव, विद्या जोशी, दीपाली खडके, जया जोशी, पल्लवी देशपांडे, प्रिया मालवे, मनीषा जोशी, भाग्यश्री जोशी व सर्व सहकारी महिला मंडळ यांनी योजनापूर्वक भेटी घेऊन सर्व संकल्पना मांडली. खूपच छान प्रतिसाद मिळाला. एकूण तीन कार्यक्रम झालेत.

सर्व महिला, पुरुष मंगल वेषात, सोबत तुळशीचे रोप असलेले वृंदावन, पूजा साहित्य, प्रसाद, पणत्या, घेऊन एकत्र जमले. पौरोहित्याचे प्रशिक्षण घेतलेल्या विद्या श्रीपाद जोशी यांनी पूजेचे आयोजन केले. बिछायत, रोषणाई, अक्षता, पणत्या सर्वच लग्न समारंभासारखे. विधिवत पूजा, मंगलाष्टके, आरती, सर्व सोपस्कार झाले. लग्न सोहळा प्रारंभ करण्यापूर्वी सर्व महिलांच्या उपस्थितीतच किट उघडण्याचे ठरल्याप्रमाणे किट उघडली. त्याचेही महिलांनी चित्रीकरण केले व तरुण भारतचे कौतुकही. तुळशी वृंदावन तर खूपच सुंदर व सुबक. असेच तुळशी वृंदावन मिळेल का? हवे तर शुल्क घ्या, अशीही चर्चा झाली. तीनही विवाह समारंभात प्रारंभीच सोबत असलेल्या पुस्तिकेतून तुळशीबद्दची माहिती, कथा व तरुण भारतच्या उपक्रमांची माहिती सांगितली गेली. परंपरागत पद्धतीने विवाह समारंभ पार पडल्यानंतर, प्रसाद वाटप, नंतर सामूहिक तुळशी विवाहाची गाणी, महिलांची फुगडी इ. कार्यक्रमही झालेत. कार्यक्रमानंतर अनेक महिलांनी, आहाला तरुण भारतकडून आलेली विवाह निमित्तची पुस्तिका तरी मिळेल का? असा आग्रह झाला. पुस्तिकेसाठी माझे सुपरिचित नागपूर तरुण भारतचे संचालक समीर गौतम व बुलढाणा जिल्हा पूर्व प्रचारक ललित शेंडे यांना फोन करून कृपया पुस्तिका पाठवाच असा आग्रह केला. समीर गौतम यांनी प्रबंध संचालक धनंजय बापट यांच्याशी फोनवर बोलणे करून दिले. तरुण भारत टीमने तर घरच्या समारंभासारखी धावपळ, परिश्रमपूर्वक किट तयार करणे व सर्वदूर वेळेत पोहचविले. यामुळेच एवढा मोठा व सामाजिक समरसतेने परिपूर्ण धार्मिक, आध्यात्मिक कार्यक्रम सुफल संपन्न झाला. यासाठी सर्व तरुण भारत परिवाराचे मनापासून खूप खूप आभार.

**डॉ. सुनील जोशी**/९४२३१४५०३५

आरोग्य भारती राष्ट्रीय महासचिव, धाड, जि. बुलढाणा

### अभिनंदन व धन्यवाद फुलारी साहेब!

कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक सुनील फुलारी यांनी फलटणच्या महिला डॉक्टर आत्महत्येप्रकरणी संबंधित पोलिस उपनिरीक्षक गोपाल बदने यांना सेवेतून बडतर्फ केल्याबद्दल त्यांचे कौतुक करावे तितके थोडेच आहे. साधारणतः निलंबित केल्यानंतर चौकशी सुरू असून, कारवाई केली जाईल, असे भासविले जाते. बडतर्फीचा निर्णय घेतल्यास आपल्याला विचारणा होईल आणि दबाव येईल, प्रसंगी आपल्यास नियमाप्रमाणे कारवाई का केली नाही, अशी विचारणा होईल, कदाचित कारवाईसुद्धा होऊ शकेल या सर्व विचारांना बाजूला सारून इतरांना धाक बसेल अशी धडक कारवाई त्वरित केली, याबद्दल फुलारी यांना धन्यवाद व अभिनंदन.

**कृ. र. गोखले**/९६७३९१३९२९

### उच्च शिक्षण आणि विद्यार्थ्यांचे भवितव्य

उच्च शिक्षण हे केवळ ज्ञान मिळविण्याचे माध्यम नाही, तर विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा पाया आहे. आजच्या स्पर्धात्मक, डिजिटल आणि जागतिकीकरणाच्या युगात फक्त विषय शिकणे पुरेसे नाही. विद्यार्थ्यांना सृजनशील विचार, तंत्रज्ञानाची सखोल समज, सामाजिक संवेदनशीलता आणि व्यावहारिक कौशल्ये शिकविणे आवश्यक आहे. भारतात १३०० पेक्षा जास्त विद्यापीठे आणि ५० हजारांहून अधिक महाविद्यालये आहेत, परंतु गुणवत्तेच्या बाबतीत आणि अभ्यासक्रमाच्या सुसंगततेच्या दृष्टीने उच्च शिक्षणासमोर अनेक आव्हाने उभी आहेत.

विद्यार्थ्यांचे भवितव्य यशस्वी करण्यासाठी शैक्षणिक संस्थांनी व्यावहारिक अनुभव, संशोधन, उद्योजकता प्रशिक्षण आणि नवोन्मेषक कौशल्ये शिकवायला हवीत. शिक्षकांचे मार्गदर्शन, डिजिटल साधने, उद्योगसंपर्क आणि विविध कौशल्यांचे प्रशिक्षण या बाबी विद्यार्थ्यांना सक्षम बनवतात. गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षण हे केवळ शैक्षणिक ज्ञानापुरते मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करते. त्यात व्यावहारिक कौशल्ये, संशोधन, नैतिक मूल्य, सामाजिक जबाबदारी आणि मानसिक स्वास्थ्य यांचा समावेश असतो. उदाहरणार्थ, आयआयटी, आयआयएम, काही खाजगी आणि सार्वजनिक विद्यापीठे या दृष्टिकोनातून जगात उत्कृष्ट मानली जातात. त्यांचे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना नवनवीन तंत्रज्ञान, डेटा ॲनालिटिक्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, पर्यावरणीयशास्त्र यासारख्या क्षेत्रात कौशल्य प्राप्त करून देतात. उच्च शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत विकासासोबतच समाजाच्या प्रगतीत मोठा हातभार लागतो. शिक्षित व्यक्ती समाजाच्या समस्यांवर सर्जनशील उपाय शोधतात, नवोन्मेषक संकल्पना मांडतात आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करतात. विद्यार्थ्यांचे भवितव्य सुधारण्यासाठी कौशल्याधारित शिक्षण आणि व्यावहारिक प्रशिक्षण अत्यंत गरजेचे आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांना शहरातील नामांकित महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेण्यासाठी अनेक अडचणी येतात. अशा परिस्थितीत शिष्यवृत्ती, ऑनलाईन शिक्षण आणि हायब्रिड शिक्षण पद्धतींचा उपयोग करून विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. डिजिटल इंडिया अभियानामुळे ऑनलाईन शिक्षणाला चालना मिळाली आहे. विद्यार्थ्यांचे भवितव्य रोजगाराच्या संधीशी घनिष्ठपणे जोडलेले आहे. जागतिक बाजारपेठेत स्पर्धा वाढत असल्यामुळे विद्यार्थ्यांनी तांत्रिक, सामाजिक आणि सर्जनशील कौशल्ये आत्मसात केली पाहिजेत. उद्योग क्षेत्र आणि शिक्षण संस्था यांच्यातील सहकार्य विद्यार्थ्यांना उद्योगासाठी तयार करण्यात महत्त्वपूर्ण ठरते. जगभरातील उच्च शिक्षण संस्थांचा अभ्यास केल्यास दिसते की, शिक्षणाचे स्वरूप फक्त परीक्षा-परीक्षा नाही तर सृजनशीलता, संशोधन आणि व्यावहारिक कौशल्यांवर भर दिला पाहिजे. भारतातील विद्यापीठे आणि महाविद्यालये या मार्गावर पुढे येत आहेत, परंतु अजून बऱ्याच सुधारणांची गरज आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता, नैतिक मूल्ये, टीमवर्क आणि समाजोपयोगी दृष्टिकोन विकसित करण्यावर भर द्यावा.

गुणवत्तापूर्ण शिक्षण, व्यावहारिक अनुभव, संशोधन, उद्योजकता प्रशिक्षण आणि डिजिटल साधनांचा योग्य वापर केल्यास विद्यार्थी स्वतःचे भवितव्य उज्ज्वल करू शकतात तसेच समाजाच्या विकासातही मोठे योगदान देऊ शकतात. त्यामुळे शैक्षणिक धोरण निर्धारणकर्ते, शिक्षक, पालक आणि समाजाने एकत्र येऊन विद्यार्थ्यांना सक्षम, जागरूक आणि समाजोपयोगी पद्धतीने घडवण्याचे कार्य करणे अत्यंत गरजेचे आहे.

**प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड**/९४२३३ ४५५४५

### मराठी माणसाची खरी श्रीमंती

कोण किर्लोस्कर? कोण गोविंद बल्लाळ देवल? कोण खाडिलकर? आपण सगळे मराठीच ना? मला मराठी असल्याचा अभिमान आहे! हे आपण फ्लेक्स करतो, मग हे वरचे प्रश्न का?



नाट्यसंगीताची वाटचाल हे संगीतमय नाटक इतक्यातच नागपूरला झाले आणि ते नाटक पाहिल्यावर खरंच असे वाटले की आपण किती नशीबवान आहोत की आपला जन्म मराठी घरात झाला. १८४३ मध्ये नाटकांची परंपरा सुरू झाली. मराठीतील पहिलं वहिलं नाटक - विष्णुदास भावे लिखित सीता स्वयंवर. त्यानंतर अण्णासाहेब किर्लोस्करांचे संगीत शाकुंतल, संगीत सौभद्र लोकांसमोर आली. किर्लोस्कर कंपनी ही पहिली नाटक कंपनी निर्माण झाली. हातात मोबाईल फोन नसल्यामुळे तेव्हा वृत्तपत्रे, नाटक, कीर्तन, साहित्य हीच माहिती गोळा करण्याची साधने होती. त्यातील नाटक म्हणजेच एक सोर्स ऑफ एन्टरटेन्मेंट पण. किर्लोस्कर युग संपल्यानंतर गोविंद बल्लाळ देवल यांचा युगारंभ झाला. संगीत शारदा हे बालविवाह या सामाजिक प्रथेवर आधारित तर दारूच्या व्यसनावरील टीका व एका स्त्रीचा संघर्ष हे एकच प्याला नाटकाने दाखवून दिले.

बालगंधर्व म्हणजेच नारायण श्रीपाद राजहंस यांनी स्त्री पार्टी (पुरुष कलाकार स्त्रीची भूमिका करीत कारण स्त्रीला रंगभूमीवर यायला प्रवेशबंदी होती) खूप गाजवली. संगीत मानापमान, संगीत सौभद्र, संगीत स्वयंवर ही काही त्यांची प्रसिद्ध नाटके. आणि असेच या क्षेत्रात अगणित मोठे लेखक व कलाकार होऊन गेले. चित्रपट, रेडिओ यांचे प्रमाण वाढले व नाटकाचा प्रभाव कमी झाला. वसंत कानेटकर, पु. ल. देशपांडे, वि. वा. शिरवाडकर म्हणजेच कुसुमाग्रज यांनी नाट्यलेखनाला नवी दिशा दिली. सुमारे २००० साली जुन्या नाटकांचे नव्याने प्रयोग सुरू झाले व नवीन संगीत नाटके जसे कट्यार काळजात घुसली हे प्रस्तुतीस आले. मोबाईलचा वापर वाढला, सिनेसृष्टी वाढली व हे नाटक सिनेमाच्या रूपात मोठ्या पडद्यावर आपल्याला पाहायला मिळाले. आत्ताच्या काळात नवीन नाटके भरपूर येत आहेत - संगीत नसले तरी काहीतरी विचार मांडणारी नाटके होय. पण इतक्या व्यापात, हातात ओटीटी प्लॅटफॉर्म्स असताना कोणाला नाटक पाहायचे आहे? बिना रिटेक्सनी बनलेली नाटके खरंच संपत आली का? आपण या गोष्टीचा विचार करायला पाहिजे व मराठी नाटक किंवा संगीताचा वारसा पुढे न्यायला पाहिजे. जरी आपण तानसेन नसू, तरी आपण कानसेनाचा वारसा नक्कीच पुढे नेऊ शकतो!

**सई प्रकाश भगत**/नागपूर

### आनंदाचे झाड

चैतन्य आणि साक्षी या नवदाम्पत्याने एक नियम केला आहे. काही सणवार किंवा सुटीची मोकळी संध्याकाळ असेल तेव्हा ओळखीच्या ज्येष्ठ एकटे राहणाऱ्या स्नेह्यांकडे सहज गप्पा मारायला म्हणून जायचे. तास दोन तास मस्त आरामात जातात. आपल्यापेक्षाही त्यांच्या मनातला आनंद स्पष्ट डोकावतो आणि पुढचे दिवस त्या आठवणीत मस्त जातात. जाताना साक्षी एखादी चटणी, लोणचे न्यायला विसरत नाही. त्यामुळे त्यांच्या आनंदात भर पडते. काय करू आणि काय नको असे यजमानांना होते. मनातले बोलायला काकूंना वाट मिळते. काहीसे संथ झालेले आयुष्य प्रवाही झाल्यासारखे वाटते. अनेक घरचे काकाही मनापासून गप्पात सामील होतात. गोष्ट किती छोटी, पण इतरांच्या आयुष्यात आनंद निर्माण करते.

वृषालीने मैत्रिणींना आपल्या गावी कोकणात आग्रहाने बोलावले. पूर्ण ट्रिपचे नियोजन केले. अनेक निसर्गरम्य स्थळांच्या भेटी घडवल्या. सगळ्या मैत्रिणी अगदी फुलपाखरासारख्या हलक्या होऊन, अनेक आनंदाचे क्षण वेचून आपापल्या दैनंदिन आयुष्यात नव्याने रमल्या. सगळ्यांनी तिच्याकडे जाताना एकमेकांसाठी छोट्या छोट्या भेटवस्तू आणल्या होत्या. भेट काय दिली यापेक्षा एकमेकांनी आठवण ठेवून आपल्यासाठी काहीतरी आणले याचा आनंद शब्दपलीकडचा होता.

घरचे घरकाम करणाऱ्या सुमनबाईंचा नातू दहावीत ८५ टक्क्यांनी पास झाला हे सांगता सांगताच त्यांनी जयाताईंच्या घरात प्रवेश केला. त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंदच सारं काही सांगत होता. त्यांच्या मागोमाग नातूही आज आला. जयाताईंनी लगेच त्याला भेट म्हणून खाऊसाठी पैसे आणि गोडधोड करून खाऊ घातले. 'बाई, तुमच्यासारखे लोक भेटायला पण नशीबच लागतं' सुमनबाई भारावल्या होत्या.

बोईसरला आम्ही जयूकडे खास आंब्याच्या मोसमात गेलो. रोजच्या मेनूसकट तिनी जय्यत प्लॅनिंग केले होते. सगळ्यांच्या गळाभेटी झाल्या. नंतर नीलिमाने सगळ्यांना स्वतः घडवलेले कानातले, गळ्यातले भेट दिले. ते सगळ्यांनी ताबडतोब घातले, फोटो काढले. तेव्हा तिच्या चेहऱ्यावर गिफ्ट देण्याचा आनंद सर्वात जास्त होता.

इंदिरा संत म्हणतात, असेच काही द्यावे घ्यावे, दिला एकदा ताजा मारवा, देता घेता त्यात मिसळला, गंध मनातील त्याहूनी हिरवा. अशा कितीतरी छोट्या गोष्टींनी आपले मन आनंदी होते. ते क्षण पकडून ठेवू शकत नाही पण आठवणीत नक्कीच ठेवू शकतो. म्हणूनच आपण प्रवासाला जातो आणि तेथून छोट्या मोठ्या वस्तू खरेदी करतो. ती वस्तू त्या वेळेची आठवण करून देते. मनुष्य कायमच आनंदी राहू शकत नाही. परंतु समाधानी राहू शकतोच ना? हा आनंद शोधताना कधी कधी दमछाक होते. प्रश्न मनात येतात पण कोणत्याही प्रश्नाचे उत्तर लगेच मिळायला हवे किंवा शोधायला हवे असा अट्टहास का ?

आनंद हा व्यक्तिसापेक्ष आहे. एखाद्याचा आनंद हा दुसऱ्याच्या दुःखाचे कारण होऊ शकते. जसे, स्पर्धेत विजेता एकच असतो. त्याला आनंद होणे स्वाभाविक आहे परंतु प्रतिस्पर्ध्याला त्याचेच दुःख होते. काही आनंद हे संपूर्ण जगाचे असतात. लहान बाळाचे हास्य आपली दिवसभराची मरगळ घालवते. सुनिता विल्यम्स आणि तिचे सहकारी पृथ्वीवर परतल्याचा आनंद हा प्रत्येकाचा होता. त्याची मोजदाद कशात होऊ शकत नाही. भारत क्रिकेट मॅच जिंकल्यावर चौकाचौकात दिवाळी साजरी होते. हा आनंद जात, पात, धर्म या पलीकडचा असतो. २०१३ मध्ये युनायटेड नेशन्स असेम्ब्लीने २० मार्च हा आंतरराष्ट्रीय आनंद दिन म्हणून साजरा करण्याची घोषणा केली. त्याप्रमाणे इंटरनॅशनल डे ऑफ हॅपिनेस साजरा करण्यात येतो. आपले दैनंदिन जीवनातले आनंद हे लौकिक असतात. ते काही काळपर्यंत आनंद देतीलही. परंतु भारतीय संस्कृतीत संतानी शाश्वत असे आनंदाचे झाड आपल्यासाठी लावले आहे. ते म्हणजे अखंड नामस्मरण, भजन, पूजन, ईशसेवा, मनुष्य सेवा, चांगले कर्म, प्रामाणिक कर्म अशा अनेक मार्गांवर चालल्यामुळे आपल्याला आनंदाची फळे चाखायला मिळणार हे नक्की. कुठलीही नकारात्मक शक्ती त्याला बाधा आणू शकणार नाही. म्हणूनच तुकाराम महाराज म्हणतात, 'आनंदाचे डोही, आनंद तरंग. आचार्य विनोबा भावे एक प्रार्थना म्हणत, 'माझ्या मना म्हण एकदा, की हे सर्व मंगल आहे, सुंदर आहे, कोमल आहे आणि तू हो तसा' ज्याच्या मनात सत्कर्माची भावना असते त्याला सर्व काही मंगल आणि पवित्र वाटते. म्हणून तर ज्ञानेश्वर माउली म्हणते 'जे खळांची व्यंकटी सांडो' आणि हे आनंदाचे झाड बहरत राहो.

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

## आजचे संघगीत-३७

रविवार, ९ नोव्हेंबर २०२५

### उठा राष्ट्रवीर हो

उठा राष्ट्रवीर हो
सज्ज व्हा, उठा चला, सशस्त्र व्हा, उठा चला ॥धृ.॥

युद्ध आज पेटले जवान चालले पुढे
मिळूनि सर्व शत्रुला क्षणांत चारु या खडे
एकसंघ होउनि लढू चला लढू चला
उठा उठा, चला चला ॥१॥

लाख संकटे जरी उभी समोर ठाकली
मान ताठ आमुची कुणापुढे न वाकली
थोर वंश आपुला महान मार्ग आपुला
उठा उठा, चला चला ॥२॥

वायुपुत्र होउनी धरू मुठीत भास्करा
होउनी अगस्तिही पिऊनि टाकु सागरा
मन्युबाळ होउनी रणात जिंकू मृत्युला
उठा उठा, चला चला ॥३॥

चंद्रगुप्त वीर तो फिरूनि आज आठवू
शूरता शिवाजिची नसानसांत साठवू
दिव्य ही परंपरा अखंड चालवू चला
उठा उठा, चला चला ॥४॥

यज्ञकुंड पेटले प्रचंड हे सभोवती
दुष्ट शत्रू मारुनी तयास देउ आहुती
देवभूमि ही अजिंक्य दाखवू जगा चला
उठा उठा, चला चला ॥५॥

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# महाराष्ट्र आशा व गटप्रवर्क फेडरेशन CITU च्या अधिवेशनाची रॅली व सभेने सुरुवात

## दोन दिवसीय अधिवेशनात राज्यभरातील २५० आशांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.८ नोव्हेंबर**

आशांना शासकिय कर्मचाऱ्यांना मिळणारे सर्व लाभ मिळाले पाहिजेत यासाठी आशा व गटप्रवर्क फेडरेशन उखढण सतत लढे आंदोलन करीत आहे. मागणी मान्य होई पर्यंत लढा चालु ठेवण्याचा निर्धार CITU चे राज्य महासचिव कॉ एच एम शेख यांनी केला आहे. शनिवारी दि ८ रोजी परळी येथील मोंढा मैदानावर झालेल्या सभेत ते बोलत होते.



महाराष्ट्र आशा व गटप्रवर्क फेडरेशन CITU चे ४ अधिवेशन परळी येथील प्रवचन सभामंडपात झाली. शनिवारी दि ८ रोजी सकाळी दहा वाजता प्रवचन सभामंडप येथुन आशा स्वंसेवीका ची रॅली काढण्यात आली. रॅली मधील आशांच्या हातात लालबावटयाचा झेंडा व मागण्यांच्या गगणभेदी घोषणानी परिसर दणाणून गेला होता. रॅली चा समारोप मोंढा मैदानावरील जाहीर सभेने झाला. यावेळी बोलताना कॉ एच एम शेख यांनी आरोग्य विभागातील महत्वाचा दुवा म्हणुन आशा स्वंसेवीका काम करीत आहेत. कोरोना सारख्या महामारीत प्रत्येक घरोघरी जाण्याचे काम आशांनी केले होते. त्यांना सेवेत कायम करुण शासकिय लाभ मिळाले पाहिजेत. यासह विविध प्रलंबित प्रश्ने सरकारनी सोडवावीत. आशा वर्कर्स यूनियनच्या राज्याध्यक्ष कॉ आनंदी आवघडे, सरचिटणीस कॉ पुष्पा पाटील, सिटु चे स्वगताध्यक्ष सय्यद हनीफ करीम उर्फ बहादुर भाई यांची समायोजित भाषणे झाली. यावेळी व्यासपीठावर माकप चे जेष्ठ नेते कॉ पी एस घाडगे, कॉ अशोक थोरात, कॉ सुवर्णा रेवले यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक सिटु चे जिल्हाध्यक्ष कॉ बी जी खाडे यांनी केले. सुत्रसंचलन बीड जिल्हा आशा वर्कर्स युनियन चे जिल्हा सचिव कॉ किरण सावजी यांनी तर आभारप्रदर्शन जिल्हाध्यक्ष कॉ शिवाजी कुरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आशा लांडगे, हेमा काळे, अनिता गिराम, छाया रणदिवे, सारिका मुंडे, अनिता चाटे, भाग्यश्री थावरे, उमा वाघमारे, भारती राख, सुवर्णमाला मुंडे, जालिंदर गिरी, शेख जावेद, प्रकाश वाघमारे, बाबासाहेब रोडे, शुभम काकडे आदींनी परिश्रम घेतले.

वैजनाथ मंदिर परिसरातील प्रवचन सभामंडप येथुन रॅलीला सुरुवात

वैजनाथ मंदिर, सेवालाल महाराज चौक, राणी लक्ष्मीबाई टॉवर मार्गे मोंढा मैदानावर रॅली चे रुपांतर सभेत झाले.

रॅलीत आशांनी दिलेल्या घोषणांनी परिसर दणाणून गेला.

सर्व आशांनी लाल साडी परिधान केल्याने वेगळेपण दिसत होते.भव्य रॅली व गगणभेदी घोषणेनी परिसर दणाणून गेला होता.

# अभूतपूर्व शेतकरी संवाद मेळावा ठरला परिवर्तनाची नांदी; शेतकऱ्यांचा उदंड प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.८ नोव्हेंबर**

देशात साडेसहा लाख गावे आहेत... संकल्प केला तर सर्व गावांत परिवर्तन घडू शकते. मला इथे येऊन स्वागत किंवा जयजयकार करून घ्यायचा नव्हता. मला इथे ग्लोबल विकास ट्रस्टने केलेले आदर्शवादी काम पहायचे होते. शेतकऱ्यांच्या जीवनात खरोखरच आर्थिक क्रांती घडू शकते हा आत्मविश्वास इथे आल्यानंतर मला आणि सर्वकाही पाहिल्यानंतर वाटतो आहे. जलसंवर्धन, नदी पुनरुज्जीवन, फळबाग लागवड, तुतीची शेती यावर त्यांच्यासोबत बसून एक अभ्यासपूर्ण मॉडेल बनवून त्याला देशभर लागू करायचे असल्याचे प्रतिपादन केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केले. ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने आयोजित भव्य शेतकरी संवाद मेळाव्यात बोलतांना केले. यावेळी कार्यक्रमास जलनायक मयंक गांधी, युपीएलचे विक्रम श्रॉफ, रवी झुनझुनवाला, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठाचे डॉ.इंद्रमणी त्रिपाठी, ग्लोबल विकास ट्रस्टचे संचालक डॉ.हरिश्चंद्र वंगे आदि मान्यवरांची उपस्थिती होती.

शेतकऱ्यांचे उत्पन्न एवढे वाढेल की देशातील एकही शेतकरी आत्महत्या करणार नाही. भारताचा कृषीमंत्री म्हणून मी आपल्या लढाईत सहभागी आहे. शेतकऱ्यांसाठी काम करणे हासुद्धा एक फार मोठा संघर्ष आहे. एक युद्ध गरिबीच्या विरोधात, एक युद्ध लाचारी आणि हतबलतेच्या विरोधात लढूया आणि येणाऱ्या भविष्यकाळात हातात हात घेऊन काम करूया. केंद्र आणि राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे असा विश्वास केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी उपस्थित हजारो शेतकऱ्यांना दिला. तर ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी म्हणाले की, ब्रिटिशांच्या काळात फोडा आणि राज्य करा अशी निती होती. आज देशाला स्वातंत्र्य मिळून कित्येक वर्षे झाली तरीही आपण विभागलेलेच आहोत.



पक्षात, प्रदेशात, जातीत अशा आपल्या विभागण्या झाल्या आहेत. आज आपल्याला शेतकरी म्हणून एकत्र यायला पाहिजे. ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टी झाली त्यात शेतकऱ्यांची पिके तर वाहून गेलीच मात्र मातीही वाहून गेल्याने त्यांची स्वप्नेही वाहून गेली. अगोदरच शेतकरी अस्मानी संकटांच्या गर्तेत असताना त्यात सुलतानी संकटेही त्याला सोडत नाहीत. शेतकऱ्यांना हमीभाव मिळत नसल्याने कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकरी संकटात आहे. एक रुपयाही उत्पन्न मिळत नसतांना तो जगतो कसा? हाच प्रश्न मला पडलेला असल्याचे त्यांनी म्हटले. सिरसाळा येथे ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मराठवाड्याच्या विविध भागांतून हजारो शेतकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे कार्यक्रमास उपस्थिती लावली. शेती संलग्न आस्थापनांचे विविध स्टॉल्सही कार्यक्रमस्थळी उभारण्यात आले होते. विविध गावांतील यशस्वी शेतकऱ्यांचा सन्मानही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

# बीडमध्ये एक्सिस ऑर्थोपेडिक हॉस्पिटलतर्फे पोटविकार तज्ञांची सेवा उपलब्ध

**– नागरिकांच्या आरोग्यासाठी विशेष उपक्रम**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ नोव्हेंबर**

वाढत्या पोटविकारांच्या पार्श्वभूमीवर, बीडमधील एक्सिस ऑर्थोपेडिक हॉस्पिटलने नागरिकांच्या आरोग्यासाठी एक महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे. या उपक्रमांतर्गत, प्रसिद्ध पोटविकार तज्ञ डॉ. अक्षय कुलकर्णी हे मंगळवार ११ नोव्हेंबर २०२५ रोजी २ ते ४ वाजेपर्यंत हॉस्पिटलमध्ये रुग्णांसाठी उपलब्ध असतील.

या विशेष उपक्रमाचा उद्देश लवकर निदान, तात्काळ उपचार आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना यावर भर देऊन पोटविकारांवरील प्रभावी उपाय नागरिकांना उपलब्ध करून देणे हा आहे. रुग्णांनी तपासणीसाठी पूर्वनोंदणी करणे आवश्यक असून, यामध्ये तज्ञांकडून सल्ला, तपासणी आणि योग्य उपचार मार्गदर्शन मिळणार आहे.

या उपक्रमाबाबत सैय्यद हसीब सरांचे एक्सिस ऑर्थोपेडिक हॉस्पिटल, माने पेट्रोल पंपाच्या मागे,नर्सरी रोड बीड तर्फे सर्व नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की त्यांनी या संधीचा लाभ घ्यावा आणि आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी. अधिक माहितीसाठी ९९२३०१०२०२ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.

# भाजपा अंबाजोगाई युवक शहराध्यक्षपदी अहेमद पप्पूवाले यांची नियुक्ती

## अंबाजोगाई शहरातून पप्पूवाले यांच्या निवडीचे स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.८ नोव्हेंबर**

केज विधानसभा मतदारसंघाच्या कार्यसम्राट आमदार सौ.नमिताताई मुंदडा यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देवून भारतीय जनता पार्टी अंबाजोगाई युवक शहराध्यक्षपदी अहेमद करीम पप्पूवाले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अंबाजोगाई शहरातून पप्पूवाले यांच्या निवडीचे स्वागत होत आहे.

केज विधानसभा मतदारसंघाच्या कार्यसम्राट आमदार सौ.नमिताताई मुंदडा यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देवून व भारतीय जनता पार्टी अंबाजोगाई शहराध्यक्ष संजय गंभीरे यांच्या प्रमुख उपस्थितीत अहेमद करीम पप्पूवाले यांची भारतीय जनता पार्टी अंबाजोगाई युवक शहराध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वी अहेमद पप्पुवाले यांनी युवा मोर्चा भारतीय जनता पार्टी अल्पसंख्यांक आघाडीचे शहराध्यक्ष यशस्वीरित्या भुषविले आहे. तर त्यांच्या सुविद्य पत्नी रजिया अहेमद पप्पुवाले या भारतीय जनता पार्टी, महिला मोर्चाच्या मंडळ अध्यक्ष आहेत. दोघेही पती-पत्नी एक कुशल संघटक म्हणून ओळखले जातात. अहेमद पप्पुवाले यांना देण्यात आलेल्या नियुक्तीपत्रात नमूद केले आहे की, आपण आजवर केलेल्या पक्षकार्याची नोंद घेऊन, आपल्या क्षमतेचा वापर पक्षकार्यासाठी पर्यायाने समाज कार्यासाठी अधिक व्हावा या उद्देशाने भारतीय जनता पार्टी, अंबाजोगाई शहर मंडळ कार्यकारिणीत युवक शहराध्यक्ष या पदावर आपली नियुक्ती करण्यात आली आहे, येत्या काळात पदाच्या माध्यमातून




सर्वांना सोबत घेवून पक्षवाढीसाठी सर्व स्तरावरून प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा व्यक्त करून पप्पूवाले यांना त्यांच्या नियुक्तीबद्दल अभिनंदन व पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. आपल्या निवडीबद्दल आमच्या प्रतिनिधीशी बोलताना अहेमद पप्पूवाले यांनी सांगितले आहे की, ९ वर्षांपूर्वी म्हणजे २९ नोव्हेंबर २०१६ रोजी मी माझ्या आयुष्यातील पहिल्या नगरपरिषद निवडणुकीच्या निकालाला सामोरे गेलो आणि त्यावेळी माझा पराभव झाला होता. त्यावेळेसचा निवडणुकीतला आनुभव घेऊन आणि पराभव स्विकारून भविष्यात सर्वसामान्य नागरिकांकरीता सामाजिक कार्य करण्याचा मनापासून निश्चय केला होता. कारण, त्या वेळेस झालेल्या पराभवापेक्षा मिळालेली मते, त्या जनतेचा मला मिळालेला उत्स्फूर्त पाठिंबा आणि विश्वास यातच मी निवडणुकीच्या पराभवापेक्षा काहीतरी जिंकल्याचा आनंद होत होता. वयाने लहान असल्यामुळे राजकीयदृष्ट्या झालेल्या पराजयाच्या दुःखापेक्षा खुप काही अनुभवयाला आले. खुप काही शिकण्यास ही मिळाले. यातून बोध घेऊन लोकांसाठी कार्य करण्याची ऊर्जा खऱ्या अर्थाने मला या आजच्या ९ वर्षांपूर्वीच्या दिवशीच मिळाली आणि त्या वेळेपासून स्वःताला समाज कार्यासाठी आजपर्यंत वाहून घेऊन घडेल तसे कार्य करण्याचा प्रयत्न करीत आहे. यावेळी आनेक सहकारी मित्रांची मोलाची साथ मदत मला मिळाली. या पुढेही आमच्या नेत्या पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे, कार्यसम्राट आमदार सौ.नमिताताई मुंदडा यांच्या नेतृत्त्वाखाली व माझे गुरूवर्य नंदकिशोर (काकाजी) मुंदडा, माझे नेते अक्षय भैय्या मुंदडा, भाजपा शहराध्यक्ष संजय भाऊ गंभीरे यांच्या मार्गदर्शनाखाली माझी अंबाजोगाई भाजपा युवक शहराध्यक्षपदी नियुक्ती केल्याबद्दल सर्व सन्माननीय मान्यवर नेत्यांचे मनःपूर्वक धन्यवाद व आभार.





बीड शहरातील सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स परिसरातील रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्यामुळे वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागते (छाया कृष्णा शिंदे)

# स्वातंत्र्य चळवळीत वंदे मातरम कोट्यावधी भारतीयांचा युद्धघोष-प्राचार्य डॉ.सुहास मोराळे



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ नोव्हेंबर**

येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व क्रीडा विभाग अंतर्गत दिनांक ७ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता महाविद्यालय परिसरात *वंदे मातरम या राष्ट्रीय गीताचे सामूहिक गायन* आयोजित करण्यात आले होते.या सामूहिक गायनाच्या प्रसंगी भारत मातेचे पूजन कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.सुहास मोराळे यांच्या हस्ते करण्यात आले. आले.महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणाले स्वातंत्र्य चळवळीत वंदे मातरम हे राष्ट्रीय गीत कोट्यावधी भारतीयांचे युद्धघोष होते. या गीताचे स्वातंत्र्य चळवळीतील ऐतिहासिक महत्त्व घेता राष्ट्रगीता प्रमाणेच या गीतालाही राष्ट्रगीत म्हणून दर्जा आहे. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे उपस्थित होते राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. राम गव्हाणे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे आभार प्राध्यापक राजपाल जाधव यांनी मानले विभागाच्या कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक दीपक देशपांडे, क्रीडा विभागाचे डॉ छत्रपती पांगरकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व विद्यार्थी, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक कर्मचारी यांनी वंदे मातरम या सामूहिक गीत गायन मध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून भारत मातेवरील प्रेम भारत माता की जय वंदे वंदे मातरम च्या घोषणा देऊन व्यक्त केले.

# रामतिर्थावर प.पू. दादा महाराज खडकीकर पुण्यतिथी निमित्त अखंड हरिनाम सप्ताह, शिवमहापुराणकथा व विविध कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ नोव्हेंबर**

बीड येथे रामतिर्थावर प.पू.महायोगी दादामहाराज खडकीकर यांच्या एकोणिसाव्या पुण्यतिथी निमित्त व श्री. विद्यागुरु खडकीकर यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताह व विविध धार्मिक कार्यक्रम सोहळा बुधवार दि.१२ नोव्हेंबर पासुन ते बुधवार १९ नोव्हेबर २०२५ पर्यंत आयोजित केला आहे.

यामध्ये गुरुचरित्र पारायण व श्री शिवमहापुराण कथा व कीर्तनाचे आयोजन असून दैनिक कार्यक्रमामध्ये पहाटे ४ ते ५ काकडा, ५ ते ६ श्रीविष्णूसहस्रनाम, सकाळी ६ ते ७ योगशिबिर, सकाळी ८ ते ११ ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी ८ ते ११ गुरुचरित्र पारायण, ११ ते १२ श्रींच्या समाधीला अभिषेक व आरती, दुपारी २ ते ५ शिवमहापुराणकथा, सायंकाळी ६ ते ८ हरिपाठ व आरती, रात्री ११ नंतर हरिजागर होईल. शिवमहापुराण कथाप्रवक्ते हभप भागवताचार्य अनिल महाराज जोशी माजलगांवकर यांच्या अमृतवाणीतून सात दिवस भागवत कथा दररोज दुपारी २ ते ५ वा. होईल. या सोहळ्याची सुरुवात भव्य शोभायात्रेने बुधवार दि.१२ नोंव्हेंबर रोजी सकाळी ११:३० वा. विठ्ठल मंदिर ते कथास्थळापर्यंत होईल.

दररोज रात्रौ ९ ते ११ या वेळेत खालीलप्रमाणे कीर्तनाचे कार्यक्रम होतील. दैनिक योगशिबिर दररोज सकाळी ६ ते ७ वा एस.आर. ढोरमारे, डॉ.काकाडे, उबाळे व सहकारी यांच्या मार्गदर्शनाखाली होईल. बुधवार दि.१२ नोव्हेंबर रोजी हभप. राधाबाई साळुंके. गुरुवार दि.१३ रोजी हभप मोहन महाराज खरमाटे, शुक्रवार दि.१४ रोजी हभप सुर्यकांत महाराज पुरुषोत्तमपुरीकर. शनिवार दि.१५ रोजी रामेश्वर बाहेती व सहकारी गेवराईकर यांचे सुंदरकांड रा.८ ते ११वा. रविवार दि. १६ रोजी हभप सुधाकर राऊत, हिवरशिंगा सोमवार दि.१७ रोजी बालकीर्तनकार हभप सोहम सातपुते. मंगळवार दि.१८ रोजी हभप अनिल महाराज जोशी यांची कीर्तनसेवा होईल.

सप्ताहाची समाप्ती बुधवार दि.१९ नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वा श्रीं च्या समाधीस महारुद्राभिषेक होऊन सकाळी ११:३० ते १:३० या वेळी हभप ज्ञानेश्वर महाराज माऊली माजलगांवकर यांचे अमृततुल्य काल्याचे कीर्तन होऊन त्यानंतर महाप्रसाद दु.२ ते ५ या वेळेत होईल. तरी सर्व भाविक भक्तांनी शिवमहापुराणकथा, कीर्तन, श्रवण व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन प.पू.महायोगी दादामहाराज खडकीकर साधकभक्त परिवारातर्फे श्री. विद्यागुरु खडकीकर महाराज यांनी केले आहे.

# सुंदर बोंदर माजलगाव नगरपरिषदेचे नवे मुख्याधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.८ नोव्हेंबर**



माजलगाव नगरपालिके त मुख्याधिकाऱ्यांच्या वारंवार बदलांमुळे प्रशासनात अस्थिरता निर्माण झाली होती. भ्रष्टाचाराच्या आरोपावरून माजी मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण निलंबित झाल्यानंतर, वडवणी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी पोपट निगळ यांनी माजलगाव नगरपरिषदेचा अतिरिक्त कार्यभार स्वीकारला.

अल्पावधीतच त्यांनी पारदर्शक व प्रामाणिक कारभार करून नागरिकांची मने जिंकली. मात्र, राज्य शासनाच्या नवीन बदली आदेशा नुसार पोपट निगळ यांची बदली धारूर नगर परिषद येथे करण्यात आली आहे. त्यांच्या जागी सुंदर बोंदर यांची माजलगाव नगरपालिकेचे नवनियुक्त मुख्याधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

# केज येथे भव्य ग्रामीण कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन

## ग्रामीण भागातील सर्वात मोठे कृषी प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी पर्वणी!

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.८ नोव्हेंबर**

तालुक्यातील कृषिधन,शिंजीर मिल्क ण्ड ग्रो प्रोडयुसर कंपनी केज यांच्या वतीने दि.७ ते ९ हे तीन दिवशीय कृषी प्रदर्शन विठाई मंगलकार्यालय येथे सुरू झाले. कृषी प्रदर्शनाची सुरुवात शालेय विद्यार्थी यांच्या शोभायात्रा काढून झाली.कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन खा. बजरंग सोनवणे, हवामान तज्ञ पंजाबराव डक, तालुका कृषी अधिकारी सागर पठाडे, पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे,विकास मिरगणे,हनुमंत भोसले,यांच्या हस्ते व शेतकऱ्यांच्या उपस्थितीत भव्य कृषी प्रदर्शनाचे फीत कापून उद्घाटन झाले. केज येथे भव्य ग्रामीण कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन झाले.उद्घाटक खा .बजरंग सोनवणे म्हणाले ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी ही एक पर्वणी आहे शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरून उत्पादन वाढवता येईल. शेतकऱ्यांनी या कृषी प्रदर्शनास भेट देऊन तंत्रज्ञान अवगत करावे कृषी प्रदर्शन आयोजक कंपनीचे अभिनंदन करून केले. हवामान अभ्यासक पंजाबराव डक म्हणाले. शेतकऱ्यांनी हवामानाच्या अंदाजानुसार आपलं पीक व्यवस्थापन करावे. तंत्रज्ञाना शिवाय शेतीला पर्याय उरलेला नाही. कमी खर्चात अधिक उत्पन्न



घेण्यासाठी अभ्यासपूर्ण शेती करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. यावेळी उपस्थित त्यांनी प्रदर्शनाची पाहणी करून शुभेच्छा दिल्या.

आज आणि उद्या दोन दिवस हे कृषी प्रदर्शन सर्वांसाठी खुले राहणार आहेजिल्हयातील सर्व शेतकरी बांधव, महिला बचत गट, शेतकरी गट, व्यवसायीक यांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन कंपनीचे संचालक विशाल चौरे यांनी केले. या प्रदर्शनात महाराष्ट्रातील शेतीशी निगडीत आधुनिक तंत्रज्ञान , पाणी व्यवस्थापन , पिक व्यवस्थापन या क्षेत्रात काम करणाऱ्या कंपन्या सहभागी झाल्या आहेत. केज तालुक्यात पहिल्यांदाच कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आल्याने अनेक शेतकऱ्यांनी,शेतकरी गटांनी कृषी प्रदर्शनास भेटी दिल्या.मध्ये शिंजीर मिल्क ण्ड ग्रो प्रोडयुसर कंपनीने पुढाकार घेत या कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. यामुळे केज तालुक्यातील तसेच बीड जिल्हयातील शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान समजून घेण्यासाठी येत आहेत प्रदर्शनामध्ये प्रगत शेती मशिनरी , आधुनिक साधने ,सुधारीत बीयाणे, खते ,किटक नाशके ,दुग्धव्यवसाय या विषयी थेट प्रात्यक्षीके आहेत. हे प्रदर्शन शेतकरी, व्यापारी, विक्रेते, वैज्ञानिक, विदयार्थी यांच्यासाठी एक व्यासपीठ म्हणुन उपलब्ध आहे. यामुळे आपल्या जिल्हयातील तसेच मराठवाडयातील शेतीतील व शेतीपुरक व्यवसायातील उत्पादनासाठी निश्चीतच मदत होईल. असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.हे कृषी प्रदर्शन मराठवाडयातील पारंपारीक शेतीचे देखावे हे या कृषी प्रदर्शनाचे खास आकर्षण ठरले आहे. पहिल्या कृषी प्रदर्शनात शेतकरी, महिला बचत गट, व्यावसायिक विद्यार्थी यांनी भेटी दिल्या.

CMYK

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## बुद्धाच्या विज्ञानवादी धम्मानेच माणसाचा उद्धार : भिक्षुनी आर्यामेताजी

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.९ नोव्हेंबर -**
केज रोडवरील तेलेवाडी पाटी येथील बुद्धसृष्टी विपश्यना केंद्रात कार्तिक पौर्णिमेच्या निमित्ताने भिक्षुनी आर्यामेताजी यांच्या प्रेरणादायी धम्मदेसनेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात तथागत गौतम बुद्ध आणि विश्वरत्न, बोधिसत्व प्रज्ञासूर्य महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण, अगरबत्ती व मेणबत्ती प्रज्वलन करून त्रिशरण पंचशील व बुद्धवंदनेने करण्यात आली.या वेळी आर्यामेताजी म्हणाल्या, बौद्ध धम्मातील पंचांग प्रणाम आणि ध्यानधारणा या सर्व गोष्टी विज्ञानवादी आहेत. माणसाच्या उद्धाराचा खरा मार्ग म्हणजे तथागत गौतम बुद्धांचा धम्म होय. त्या पुढे म्हणाल्या, १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथील दीक्षाभूमीवर डॉ. आंबेडकरांनी दिलेला धम्म हा मानवमुक्तीचा मार्ग आहे. सर्व बौद्ध उपासक व उपासिकांनी बौद्ध आचारसंहितेचे पालन करून धम्ममार्गावर चालावे. यावेळी भिक्षुनी आर्यामेताजी यांनी सतिश टोणगे यांना 'बुद्धवादी विचारवंत-बौद्ध जीवन संस्कार' हे पुस्तक भेट दिले.

या कार्यक्रमाला सतिश टोणगे, अविनाश घोडके तसेचउ पासक व उपासिक होते.



## संक्षिप्त वृत्त...



### तुळजापूर येथे राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाची बैठक संपन्न

**तुळजापूर, दि.९ नोव्हेंबर -**
आगामी नगरपालिकेच्या निवडणुकीसाठीची रणनीती, संघटनात्मक बांधणी आणि स्थानिक जनसंपर्क मोहिमेबाबत सविस्तर चर्चा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बैठकीत करण्यात आली. पक्ष नगरपालिकेच्या निवडणुका पूर्ण ताकदीने लढविणार असून निष्ठावान कार्यकर्त्यांना न्याय मिळेल, अशी भावना जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी व्यक्त केली. या बैठकीस महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे अध्यक्ष जीवनराव गोरे प्रमुख उपस्थित होते. बैठकीस तालुकाध्यक्ष धैर्यशील पाटील, धनंजय पाटील, दिलीप मगर, अनिल शिंदे, तोफिक शेख, अमर चोपदार, विवेक शिंदे, शरद जगदाळे, अक्षय कदम यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### शस्त्रांग मार्शल आर्ट असोसिएशनच्या अध्यक्षपदी सुनिल नागणे

**धाराशिव, दि.९ नोव्हेंबर -**
धाराशिव जिल्हा शस्त्रांग मार्शल आर्ट असोसिएशनच्या अध्यक्षपदी सुनिल नागणे (तुळजापूर) तर सचिवपदी



संतोष दत्ता कदम (कळंब) यांची निवड करण्यात आली आहे. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. सोपानराव शेजवळ यांनी नूतन पदाधिकाऱ्यांना निवडीची पत्रे प्रदान केली. शस्त्रांग मार्शल आर्ट खेळाचा प्रचार-प्रसार करणे, जिल्हा, विभाग व राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन करणे तसेच मुलींसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिरे घेण्याचा मानस नवनियुक्त अध्यक्ष सुनिल नागणे यांनी व्यक्त केला. ग्रामीण आणि शहरी भागातील शालेय विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देऊन उत्कृष्ट खेळाडू घडविण्याचे उद्दिष्ट त्यांनी सांगितले. या निवडीबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरणाळे यांच्यासह धाराशिव जिल्ह्यातील क्रीडा, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



### लोहाऱ्याचे असलम भाई सय्यद यांना 'उद्योजकरत्न' पुरस्कार

**लोहारा, दि.९ नोव्हेंबर -**
उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून समाजासमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण करणारे क्लासिक डेव्हलपर्स चे सर्वेसर्वा असलम भाई सय्यद यांना ईगल फाउंडेशन तर्फे राष्ट्रीय स्तरावरील 'उद्योजकरत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आला. हा सन्मान सोहळा सांगली जिल्ह्यातील आष्टा येथे दि.९ नोव्हेंबर रोजी पार पडला. या वेळी माजी ग्रामविकास मंत्री आ. अण्णासाहेब डांगे, पद्मश्री दादा इदाते, सुरेश वाडकर, विलासराव कोळेकर, प्रा.डॉ. महेश मोटे आदी मान्यवर उपस्थित होते. सय्यद यांनी रोजगारनिर्मिती, सामाजिक दायित्व व स्थानिक युवकांना उद्योगक्षेत्राकडे वळविण्याच्या प्रयत्नांबद्दल हा पुरस्कार मिळविला. पुरस्कार स्वीकारताना त्यांनी सांगितले, हा सन्मान माझ्या कार्याला नवी प्रेरणा देणारा आहे; समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कार्य करत राहणे हीच खरी जबाबदारी आहे. मान्यवरांनी त्यांच्या सामाजिक जाण, व्यवसायिक प्रामाणिकपणा आणि योगदानाचे कौतुक केले.

# दिशा नागरी सहकारी पतसंस्थेतील २ कोटी ६३ लाखांची चोरी उघड

## कर्मचारीच निघाला चोर!

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ नोव्हेंबर -**
नळदुर्ग शहरातील दिशा नागरी सहकारी पतसंस्थेच्या तिजोरीतील तब्बल २ कोटी ६३ लाख ६३ हजार २७२ रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी चोरून नेल्याची थरारक घटना दि. ८ नोव्हेंबरच्या मध्यरात्री घडली. या घटनेने नळदुर्गसह परिसरात खळबळ उडाली होती. परंतु पोलिसांनी अवघ्या काही तासांतच या मोठ्या चोरीचा गुन्हा उघडकीस आणत मुख्य आरोपीसह तिघांना अटक केली आहे. धक्कादायक बाब म्हणजे या चोरीचा सूत्रधार पतसंस्थेतीलच लिपिक निघाला.

नळदुर्ग येथील दिशा नागरी सहकारी पतसंस्थेत दि.७ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ६ वाजता काम काज आटोपल्यानंतर संस्थेचे शटर बंद करण्यात आले होते. मात्र, रात्री २ वाजता चोरट्यांनी शटरचे लॉक चावीने उघडून आत प्रवेश केला आणि तिजोरीतील सोन्याचे दागिने व रोख रक्कम मिळून २ कोटी ६३ लाख ६३ हजार २७२ रुपयांचा मुद्देमाल लंपास केला.

सकाळी स्वच्छता करणाऱ्या महिलेने शटरचे कुलूप उघडे असल्याचे पाहून शाखा व्यवस्थापक उमेश जाधव यांना माहिती दिली. तपासात चोरी झाल्याचे समोर आले. घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलीस अधीक्षक रितु खोकर, उपविभागीय अधिकारी डॉ. निलेश देशमुख, स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक विनोद ईप्पजवार, नळदुर्ग ठाण्याचे निरीक्षक सचिन यादव आदी अधिकारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.

सिसिटिव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी संशयित राहुल राजेंद्र जाधव (लिपिक, दिशा पतसंस्था, रा. नळदुर्ग) याच्याकडे चौकशी केली. सुरुवातीला त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली, मात्र पोलिसी खाक्या दाखवल्यावर त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्यासोबत त्याचा मित्र सुशिल राठोड (रा. नळदुर्ग) आणि आणखी दोन अनोळखी साथीदारांचा या चोरीत सहभाग असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या आरोपींनी फक्त सहा ते सात मिनिटांतच चोरीची संपूर्ण कारवाई केली असल्याचे पोलिस



तपासात समोर आले आहे. या प्रकरणात सिसिटिव्ही कॅमेऱ्यांची भूमिका निर्णायक ठरली.

या गुन्ह्याबाबत शाखा व्यवस्थापक उमेश जाधव यांच्या फिर्यादीवरून आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास जिल्हा पोलीस अधीक्षक रितु खोकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक विनोद ईप्पजवार करीत आहेत. आणखी काही आरोपींचा सहभाग असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

या घटनेमुळे नागरिक व व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी शहरातील व्यापाऱ्यांना व संस्थांना सिसिटिव्ही कॅमेरे बसविण्याचे आवाहन केले असून, अशा घटनांना आळा बसण्यासाठी रात्रीच्या गस्तीत वाढ करण्यात आली आहे.

## नळदुर्ग नगरपालिकेत राजपुत समाजाचा भाजपकडे महिलांसाठी उमेदवारीचा आग्रह

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.९ नोव्हेंबर -**
नळदुर्ग नगरपालिकेच्या निवडणुकीत राजपुत समाजाच्या वतीने भाजपकडे प्रभाग क्र. २ आणि प्रभाग क्र. ३ मधील महिलांसाठी राखीव जागांवर समाजातील महिलांना उमेदवारी देण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत राजपुत समाजाचे शिष्टमंडळ लवकरच आमदार राणा जगजितसिंह पाटील यांची भेट घेणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

नळदुर्ग शहरातील राजकारणात राजपुत समाज नेहमीच सक्रीय राहिला आहे.

या समाजाचे दिवंगत कै. सित्तलसिंह हजारे यांनी नगराध्यक्ष म्हणून कार्य



केले असून, अनिल हजारे आणि सुधीर हजारे यांनी नगरसेवक म्हणून योगदान दिले आहे.

यंदाच्या निवडणुकीत राजपुत समाजाने प्रभाग क्र. २ मधून सुमन (काकी) ठाकुर तर प्रभाग क्र. ३ मधून निर्मला सुनिलसिंग हजारे यांना भाजपकडून उमेदवारी देण्यात यावी, अशी मागणी केली आहे.

दोन्हीही जागा महिलांसाठी राखीव आहेत.

दरम्यान, नळदुर्ग नगरपालिकेची निवडणूक दि.२ डिसेंबर रोजी होत असून, दि. १० नोव्हेंबरपासून उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. त्यामुळे इच्छुक उमेदवारांकडून विविध पक्षांमार्फत तिकीट मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू झाले आहेत.

राजपुत समाजातील सुमन (काकी) ठाकुर आणि निर्मला सुनिलसिंग हजारे या दोन्ही महिला सामाजिक कार्यात अग्रेसर आहेत. त्यांना भाजपकडून उमेदवारी मिळाल्यास पक्षाला निश्चितपणे याचा फायदा होऊ शकतो, असा विश्वास स्थानिक पातळीवर व्यक्त केला जात आहे.

## पवनऊर्जा प्रकल्पावर चोऱ्या वाढल्या; तपास संथगतीने सुरु!

### कंपन्यांवर आर्थिक ताण; काहींनी माघार घेण्याची तयारी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ नोव्हेंबर -**
धाराशिव जिल्ह्यात सध्या मोठ्या प्रमाणात पवनऊर्जा प्रकल्प उभारणीचे काम सुरू आहे. मात्र, या प्रकल्पस्थळांवरून चोऱ्यांच्या घटना वाढल्या असून अनेक गुन्ह्यांचा तपास संथगतीने सुरू आहे. त्यामुळे पवनऊर्जा कंपन्यांना मोठा आर्थिक फटका बसत असून काही कंपन्यांनी या भागातून माघार घेण्याची तयारी दर्शविली आहे.

धाराशिव जिल्हा हा निती आयोगाच्या आकांक्षित जिल्ह्यांच्या यादीतील तिसऱ्या क्रमांकाचा मागास जिल्हा असून, कायम दुष्काळी आणि डोंगराळ भौगोलिक रचनेमुळे शेतीतून मिळणारे उत्पन्न मर्यादित आहे. मात्र, अलीकडच्या संशोधनांनुसार जिल्हा पवनऊर्जा व सौरऊर्जेसाठी पोषक क्षेत्र असल्याचे स्पष्ट झाले आहे. परिणामी, जिल्ह्यातील सर्व आठ तालुक्यांत सुमारे १२ पवनऊर्जा कंपन्यांची प्रकल्पस्थळांवर कामे सुरू आहेत.

या प्रकल्पांमध्ये टॉवर, पंखे, तांबे तारा, केबल, वायरींग, तसेच अन्य सुटे भाग वापरले जातात. हे साहित्य शेतशिवार आणि माळरानावर साठवले जात असल्याने रात्रीच्या वेळी चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे.



मागील एप्रिल महिन्यात १२ लाख रुपयांच्या तांबे तारा चोरीला गेल्या होत्या. पोलिसांनी त्यावेळी तीन आरोपींना अटक करून चोरीत वापरलेली टाटा सुमो जप्त केली होती. तथापि, अजूनही अनेक गुन्ह्यांचा तपास विविध टप्प्यांवर अडकलेला आहे.

एका पवनऊर्जा कंपनीच्या आकडेवारीनुसार, जून २०२५ पर्यंत ४१ चोरीच्या घटना नोंदल्या गेल्या असून, या कंपनीचे दोन कोटी रुपयांहून अधिक किंमतीचे साहित्य चोरीला गेले आहे. ही आकडेवारी फक्त एका कंपनीची असून, जिल्ह्यात तब्बल १२ कंपन्या काम करीत असल्याने चोरीचे प्रमाण आणखी मोठे असण्याची शक्यता आहे.

याशिवाय प्रकल्पस्थळांवरून तसेच गोडावूनमधूनही चोरीच्या घटना घडत आहेत.

काही ठिकाणी सुरक्षा रक्षकांना मारहाण, दगडफेक आणि साहित्याचे नुकसान अशा घटनांमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे या कंपन्यांची सुरक्षिततेबाबतची चिंता वाढली आहे.

प्रकल्प राबवणाऱ्या कंपन्यांकडून पोलिस यंत्रणेला वारंवार कळविण्यात येत असले तरी तपासाची गती मंद असल्यामुळे उद्योग क्षेत्रातून नाराजी व्यक्त केली जात आहे.

## परंडा नगर पालिकेत नगराध्यक्ष शिवसेनेचा होणार : आ. तानाजी सावंत

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.९ नोव्हेंबर -**
नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित बैठकीत माजी मंत्री तथा आमदार प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी विरोधकांवर जोरदार हल्ला चढवला. विशेषतः त्यांनी माजी आमदार राहुल मोटे यांचे नाव न घेता मॅनेजमेंटच्या राजकारणावर टीका केली, तर भाजपाचे ज्येष्ठ नेते सुजितसिंह ठाकूर यांना थेट आव्हान देत स्थानिक हा मुद्दा उपस्थित केला.



माझ्या विरोधात उभे रहा सौदागर यांचे मा.आ. ठाकूर यांना चॅलेंज...

या बैठकीत माजी नगराध्यक्ष जाकीर सौदागर यांनी देखील राष्ट्रवादी काँग्रेसच्या जुन्या नेतृत्वावर नाराजी व्यक्त करत भूतकाळातील कटू अनुभव कथन केले. ते म्हणाले, मी चार वेळा राष्ट्रवादीकडून निवडणूक लढलो, पण नेत्यांनी कधीच माझी काळजी घेतली नाही. विरोधक कायम 'मॅनेज' असायचे, त्यामुळे आम्हालाच त्रास सहन करावा लागायचा.

शहरातील विरोधक आता एकत्र येऊन विजयाचे गणित मांडत आहेत, परंतु हे गणित मतदार जनतेमुळे चुकणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सावंत म्हणाले, परंड्यातील जनता सर्व जाती-धर्मांची माणसं आमच्यासोबत आहेत. आमच्या विरोधात इतर उमेदवार उभे करण्याऐवजी माजी आमदारांनीच स्वतः समोर यावे. यावेळी सौदागर यांनीही ठाकूर यांना थेट 'ओपन चॅलेंज' दिल्याने आगामी निवडणुकीत मोठी चुरस पाहावयास मिळणार आहे. विधानसभेला देखील माझ्यासोबत विश्वासघात झाला, असे सांगत सावंत यांनी पुढे म्हटले, नगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर आमच्याविरोधात सर्व विरोधक एकत्र आले आहेत. आम्ही महायुती म्हणून एकसंध राहण्याचा प्रयत्न केला, पण विरोधक आधीच आमच्याविरोधात एकवटले. त्यामुळे आता आम्ही 'एकला चलो रे' म्हणत शिवसेना (शिंदे गट) एकटी लढणार आहे.

तानाजी सावंत यांनी पुढे सांगितले की, जाकीर सौदागर यांनी विधानसभेच्या निवडणुकीत भरपूर मेहनत घेतली. आता त्या मेहनतीची परतफेड मी करणार आहे. शिवसेनेचे किमान २० नगरसेवक विजयी व्हावेत यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने एकदिलाने कामाला लागा. विरोधकांचे डिपॉझिट जप्त झाले पाहिजे.

ही सभा जाकीर सौदागर यांच्या घरासमोरील मैदानात पार पडली. या मेळाव्याला मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनी उपस्थिती लावली होती. माजी नगरसेवक, उद्योगपती, तसेच विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाला साबेर सौदागर, बापू बनसोडे, राजाभाऊ शेळके, रत्नकांत पापा शिंदे, वाजिद दखनी, गणेश राशनकर, मसरत काझी, सरफराज कुरेशी, संजय घाडगे, धनाजी जाधव, राजेंद्र जाधव, इरफान शेख, वैभव पवार, जावेद पठाण, बच्चन गायकवाड, राजकुमार माने, बब्बू जिनेरी यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

## सिंदफळ येथे महिलेची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.९ नोव्हेंबर -**
तुळजापूर तालुक्यातील सिंदफळ गावात एका तरुणीने प्रियकराकडून होणाऱ्या त्रासाला कंटाळून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी तुळजापूर पोलिसांनी संबंधित तरुणाविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा नोंदविला आहे.

मयत तरुणीचे नाव मयुरी अनिल पवार (वय २८, रा. सिंदफळ, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) असे असून, तिने दि.६ नोव्हेंबर रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास आपल्या राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली.

## खामसवाडीच्या कन्यांचा क्रीडा क्षेत्रात झळाळता यश

### लातूर विभागात पहिला क्रमांक; राज्यस्तरीय स्पर्धेत करणार नेतृत्व

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.९ नोव्हेंबर -**
राज्याच्या क्रीडा विभागामार्फत घेण्यात आलेल्या विभागीय क्रीडा स्पर्धेत कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील जिल्हा परिषद शाळेच्या पाच विद्यार्थिनींनी उज्वल यश संपादन केले आहे.

ट्रिपल जंप या प्रकारात सई सुनील शेळके ही विद्यार्थिनी विभागात दुसरी आली असून ती लातूर विभागाचे नेतृत्व करणार आहे. तर ४४०० मीटर रिले या क्रीडा प्रकारात खामसवाडीच्या जिल्हा परिषद शाळेच्या मुलींनी धाराशिव जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत लातूर विभागात प्रथम क्रमांक पटकावला.



या विजयी संघात सानवी विशाल शेळके, सई सुनील शेळके, अमृता शांतलिंग लोखंडे आणि दीपिका विठ्ठल जोशी या खेळाडूंचा समावेश आहे. या मुलींचा संघ आता चिपळूण येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत लातूर विभागाचे नेतृत्व करणार आहे.

या यशाबद्दल गावातून तसेच सर्व स्तरातून विद्यार्थिनींवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. क्रीडा शिक्षक गणेश करंजकर यांच्यासह सर्व यशस्वी विद्यार्थिनींचे गावचे सरपंच अमोल पाटील, उपसरपंच दयानंद पाटील, गटशिक्षणाधिकारी धर्मराज काळमाते, मुख्याध्यापक पवार सर व शालेय समिती अध्यक्ष राम शेळके यांनी अभिनंदन केले.

**जाहीर प्रगटन**
**श्री.एन.पी. कापुरे, अतिरिक्त सह जिल्हा न्यायाधीश व अतिरिक्त सत्र न्यायाधीश परभणी यांचे न्यायालयात**
**मोटार अपघात दावा अर्ज क्र. ३७८/२०२४**
**दिपाली भ्र. तुकाराम कदम व ईतर विरुध्द अरविंद शिवाजी बुरंगे व ईतर**
या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की गैरअर्जदार क्र. ०१. अरविंद पिता शिवाजी बुरांगे, वय ४५ वर्ष धंदा व्यापार रा. बोरंगवाडी जवळा ता. सांगोला जि. सोलापुर विरुध्द अर्जदार दिपाली भ्र. तुकाराम कदम, वय २३, व्यवसाय-घरकाम रा. एरंडेश्वर ता. पुर्णा जि. परभणी व ईतर यांनी त्यांचे पती नामे तुकाराम पिता बबनराव कदम यांचा झालेल्या मृत्यूची व त्या अपघाताची नुकसान भरपाई मिळावी म्हणुन दावा अर्ज दाखल केलेला आहे.
आपणास या पुर्वी वारंवार समन्स नोटीस पाठविण्यात आली होती. परंतु आपण मिळुन न आल्यामुळे सदरची समन्स नोटीस या न्यायालयास न बजावणीकरता बेलीफ रिपोर्ट सह बिनातामील परत आलेली आहे.
तरी या जाहीर प्रगटनाद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, आपण स्वतः अथवा वकीला मार्फत दिनांक २८.११.२०२५ पुर्वी पर्यंत या न्यायालयात हजर रहावे नसता आपले गैरहजेरीत आपणास काही एक सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन आपणाविरुध्द योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
**आज दिनांक ३१.१०.२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**
आदेशान्वये
स्वाक्षरित/- क. लिपीक
स्वाक्षरित/- अधिक्षक
जिल्हा न्यायालय, परभणी.

**जाहीर प्रगटन**
**श्री.एन.पी. कापुरे, अतिरिक्त सह जिल्हा न्यायाधीश व अतिरिक्त सत्र न्यायाधीश परभणी यांचे न्यायालयात**
**मोटार अपघात दावा अर्ज क्र. २७/२०२५**
**अविनाश रावसाहेब कदम विरुध्द अरविंद शिवाजी बुरंगे व ईतर**
या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की गैरअर्जदार क्र. ०१ अरविंद पिता शिवाजी बुरांगे, वय ४५ वर्ष धंदा व्यापार रा. बोरंगवाडी जवळा ता. सांगोला जि. सोलापुर विरुध्द अर्जदार अविनाश पिता रावसाहेब कदम, वय २७ व्यवसाय-कुली रा. एरंडेश्वर ता. पुर्णा जि. परभणी यांनी त्यांचे स्वतःच्या झालेल्या अपघाताची नुकसान भरपाई मिळावी म्हणुन दावा अर्ज दाखल केलेला आहे.
आपणास या पुर्वी वारंवार समन्स नोटीस पाठविण्यात आली होती. परंतु आपण मिळुन न आल्यामुळे सदरची समन्स नोटीस या न्यायालयास न बजावणीकरता बेलीफ रिपोर्ट सह बिनातामील परत आलेली आहे.
तरी या जाहीर प्रगटनाद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, आपण स्वतः अथवा वकीला मार्फत दिनांक २८.११.२०२५ पुर्वी पर्यंत या न्यायालयात हजर रहावे नसता आपले गैरहजेरीत आपणास काही एक सांगावयाचे नाही असे गृहीत धरून आपणाविरूद्ध योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
**आज दिनांक २७.१०.२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**
आदेशान्वये
स्वाक्षरित/- क. लिपीक
स्वाक्षरित/- अधिक्षक
जिल्हा न्यायालय, परभणी.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# दत्तशिखर ते शेख फरीद दरगाह मार्गावर अपघातांची मालिका सुरूच



**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. ९ नोव्हेंबर-**

केंद्र व राज्य सरकार यांच्या विविध योजनेंतर्गत प्रत्येक गावात 'गाव तिथे रस्ता' याप्रमाणे शहरांना रस्त्याच्या माध्यमातून गावांना जोडण्यात आले. परंतु, अलीकडच्या काळात माहूर तालुक्यातील लाखों भाविकांचे श्रद्धास्थान

तिर्थक्षेत्र दत्तशिखर ते हजारों पर्यटकांचे धबधबा पर्यटनस्थळ असलेल्या वझरा शेख फरीद दरगाह या उंच खोल अवघड घाटवळण रस्त्यावरील डांबर उडून मोठमोठे खड्डे पडले असून अक्षरशः दुरवस्था झाली आहे. याठिकाणी सतत होणारे अपघातांची जणू मालिकाच सुरू असून, अपघातांमध्ये अनेकांचा जीव गेला, अवयव निकामी झाले, या गंभीर परिस्थितीची दखल घेत सामाजिक कार्यकर्ते मनोज मुकुंद कीर्तने यांनी माहुर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपविभागीय अभियंत्यांना निवेदन देत महिनाभरात हा अरुंद रस्त्याचे रुंदीकरण करून वाहतुकीसाठी योग्य करावा अथवा वर्षभरापासून उद्घाटन होऊनही अद्याप काम सुरू न झालेला नवीन डांबरी रस्त्याचे काम तातडीने सुरू करावे, अन्यथा लोकशाही मार्गाने आमरण उपोषणाला बसणार असल्याचा कडक इशारा दिला आहे.

या ठिकाणी जाण्यासाठी एकमेव मार्ग असलेल्या दत्तशिखर ते वझरा शेख फरीद या रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने भाविकांस पर्यटकांना प्रवासासाठी हा रस्ता अतिशय जीवघेणा ठरतोय.

या रस्त्यावर ठिकठिकाणी प्रचंड खोल खड्डे व चररेषा पडले असून दगड-खडी बाहेर आल्याने दुचाकी व चारचाकी वाहनांना संतुलन ठेवणे कठीण झाले आहे. अनेक वळणांवर दगडसरी व झाडे कोसळण्याचा धोका कायम असून स्थानिक व पर्यटकांना जाण्यासाठी सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या रस्त्यावर जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

दररोज हजारो भाविकांसह पर्यटकांची ये- जा असलेला दत्तशिखर ते वझरा शेख फरीद घाट रस्ता भाविकांसह पर्यटकांसाठी धोकादायक झालेला असून, रस्त्यावर पडलेले मोठमोठे खड्डे,तसेच पावसामुळे रस्ता निसरडा झाल्यामुळे अनेक वेळा वाहनांचे अपघात झाले असून, अनेकांचा जीव गेला असून अनेक गंभीर जखमी झाले आहेत. सध्या सदरील घाट रस्ता हा अपघात प्रवण क्षेत्र म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. या अवघड घाटवळणावरील अरुंद रस्त्यावरून वाहने चालविताना वाहनधारकांना मोठी कसरत करावी लागत आहे. त्यातही बस, टेम्पो, ट्रक अशी मोठी वाहने आल्यास वाहतूक कोंडी होऊन घाटातच वाहनांच्या मोठ्या रांगा लागत आहेत.

महत्वाचे म्हणजे दररोज हजारो लोकांची बाजारपेठ व दवाखान्यासाठी माहूर या ठिकाणी ये जा आहे.माहूर या तालुक्याच्या ठिकाणाला अनेक गावच्या लोकांना हा एकमेव मार्ग आहे.हा रस्ता केवळ दुरुस्ती नाही तर, लोकांच्या जीवित्वाचा आणि या भागातील संवेदनशीलतेचा विषय आहे. हा रस्ता एक महिन्यात दुरुस्त करा अशी मागणी किर्तने यांनी केली असून,ही मागणी प्रशासन गंभीरपणे घेते की वेळकाढूपना करते,हे पाहणे जनहिताच्या दृष्टीने महत्वाचे ठरणार आहे.

# देगलूमध्ये दारू दुकानाच्या आवारात एकाचा खून

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. ९ नोव्हेंबर-**

शहरात आज (९ नोव्हेंबर रोजी) सकाळी घडलेल्या भीषण घटनेने शहर हादरले आहे. अंबिका ऑईल मीलच्या मागील बाजूस असलेल्या देशी दारू दुकानाच्या आवारात किरकोळ वादातून एका व्यक्तीचा धारदार शस्त्राने गळा चिरून खून करण्यात आला.

प्राथमिक माहितीनुसार, आरोपी शेख शादूल शेख सलीमसाब (वय ४५, रा. आनंदनगर, भायेगाव रोड, देगलूर) आणि मयत शेख निसार शेख बाबूमिया (रा. लाईन गल्ली, देगलूर) यांच्यात अर्वाच्य भाषेत शिविगाळ केल्याप्रकरणी वाद झाला. या वादात शादूल शेखने धारदार शस्त्राने निसारच्या गळ्यावर वार करून त्याचा जागीच खून केला. घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक मारुती मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली देगलूर पोलिस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून तपास सुरू केला असून, आरोपी शादूल शेख यास पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

## लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी शेतकरी भवन उभारणार: सभापती शिंदे

**लोहा-** महाराष्ट्रातील सर्व वर्गवारीनुसार कृषी उत्पन्न बाजार समितीला महाराष्ट्र शासनाच्या पणन महासंघा कडून संत तुकडोजी महाराज शेतकरी भवन उभारण्यासाठी बाजार समितीच्या वर्गवारी नुसार शासनानेच अनुदान देण्यात येणार होते ,त्यात लोहा कृषी उत्पन्न बाजार समिती ही ब वर्गवारीत आहे निधी घेण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीला स्वहिस्सा म्हणून ७६ लाख रुपये द्यावे लागणार होते. शासन अनुदान ७६ लाख बाजार समितीची वार्षिक आर्थिक परिस्थिती पाहता हा निधी घेण्याचा विचार केला नाही असे बोलताना सभापती विक्रांत पाटील शिंदे यांनी सांगितले. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून लवकरच शेतकरी भवन बाजार समितीच्या उत्पन्नातून उभारण्याचा मानस आहे . सभापती झाल्यानंतर कृषी उत्पन्न बाजार समितीचे आर्थिक उत्पन्न वाढवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला असून वर्षाला एक कोटी रुपयांच्या आर्थिक उत्पन्न होत आहे, कोणत्याही परिस्थितीत शेतकरी भवन उभारण्यात येणार असून शेतकरी बांधव, हमाल, मापारी ,व्यापारी यांच्या सर्वांगीणध हितासाठी बाजार समिती ही मराठवाड्यात मॉडेल बनवण्यासाठी सदैव कटिबद्ध आहे. बाजार समिती उपसभापती अण्णासाहेब पाटील पवार, बाजार समितीचे सचिव आनंद पाटील घोरबांड सह सर्व कर्मचारी उपस्थित होते

## बरबडा गटातून मनोज मोरे यांना उमेदवारी मिळाल्यास भाजपाची ताकद वाढेल!


**नरसी** -स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा बिगुल वाजताच नायगाव तालुक्यातील बरबडा जिल्हा परिषद गटात राजकीय समीकरणांना वेग आला आहे. हा गट खुल्या प्रवर्गासाठी खुला झाल्याने इच्छुकांची लगबग सुरू झाली आहे. या गटात भारतीय जनता पक्षाचे नेते, खासदार अशोकराव चव्हाण यांचे विश्वासू व निष्ठावंत कार्यकर्ते मनोज पाटील मोरे टाकळीकर यांनी गावोगावी संपर्क दौऱ्यांना सुरुवात केली असून त्यांना स्थानिक पातळीवर उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. शिवारातील शेतकरी, तरुण, महिलावर्ग व ज्येष्ठ नागरिक यांच्या भेटीगाठी घेत त्यांनी भाजपचा झेंडा घराघरात पोहोचविण्याचा धडाका लावला आहे. मनोज पाटील मोरे हे अनेक वर्षांपासून पक्षनिष्ठ कार्यकर्ते असून ग्रामपातळीवर सामाजिक कार्य, शैक्षणिक उपक्रम आणि विकासाच्या चळवळींमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. त्यामुळे यावेळी स्थानिक निष्ठावंत कार्यकर्त्याला संधी द्या, अशी जोरदार मागणी बरबडा, वजीरगाव, टाकळी, कहाळा , सह परिसरातून होत आहे. दरम्यान, पक्षातील जाणकारांचे म्हणणे आहे की, जर मनोज पाटील मोरे टाकळीकर यांना भाजपची उमेदवारी मिळाली, तर ते या गटात पक्षाची ताकद वाढवतील आणि कार्यकर्त्यांमध्ये नवा आत्मविश्वास निर्माण करतील. असे राजकीय वर्तुळात सध्या चर्चेला उधाण आले असून बरबडा गटाची निवडणूक भाजपासाठी प्रतिष्ठेची ठरणार असल्याचे संकेत मिळत आहेत.



## मुख्याध्यापक माधवराव रेडेवाड फुले मित्र पुरस्काराने सन्मानित

**नांदेड**-महात्मा ज्योतिराव फुले, शिक्षक परिषद, महाराष्ट्र राज्य आयोजित १५ वी राज्यस्तरीय शिक्षण परिषद दि. २८/१०/२०२५ रोजी स्वा. वि. दा. सावरकर नाट्यगृह रत्नागिरी येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली. यावेळी राज्यभरातून विविध संवर्गातील पुरस्कारांचे मानकरी सहपरिवार मित्रमंडळीसोबत कार्यक्रमास उपस्थित होते. पूर्व ब्रिगेडीयर तथा माजी खासदार सुधीर सावंत, महात्मा फुले शिक्षक परिषदेचे संस्थापक अध्यक्ष व्यंकटराव जाधव यांच्या हस्ते नांदेड जिल्ह्यातील बरबडा जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक माधवराव विठ्ठलराव रेडेवाड यांना फुले मित्र पुरस्कार-२०२५ प्रदान करण्यात आला. विशेष म्हणजे याच शिक्षक परिषदेकडून याच वर्षी ५ सप्टेंबर रोजी नांदेड येथे राज्यस्तरीय शिक्षकरत्न पुरस्कार आणि रत्नागिरी येथे फुले मित्र अशा दुहेरी सन्मानासह गौरविण्यात आले. प्रामाणिक सेवेसह नोकरी कार्यक्षेत्राबाहेर जाऊन सामाजिक कार्य करण्याची मोठी तळमळ आहे. या दोन्ही पुरस्कारामुळे धडपड्या सर्वसमावेशक व्यक्तिमत्वाचा यथोचित सन्मान झाल्यामुळे सकल आदिवासी कोळी महादेव जमातीच्या वतीने महामोर्चाचे आयोजक दत्ता भाऊ सुरवसे आणि बाळासाहेब बळवंतराव तसेच मराठवाड्याचे नेते नागनाथ घिसेवाड यांचे हस्ते गौरवपत्र, सन्मानचिन्ह देवून सन्मानित करण्यात आले. शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात क्रियाशील असणारे रेडेवाड यांचा सौजन्यशील सुस्वभाव, सहकार्य वृत्ती, जिव्हाळ्याने जपलेले मित्र संग्रह अशा बहुरंगी गुणांमुळे अनेक पुरस्काराने गौरविण्यात येत आहे. पुरस्कार प्रदान समयी त्यांच्यासोबत मोटर वाहन निरीक्षक वसंत कलंबरकर, ज्ञानेश्वर मरकंटे, मारोती शिंदे, अजय चवरे, जाधव, चंद्रकांत लोखंडे, रवी सुरेवाड, कमलाकर शिंदे, गौश शहा, सुदाम पा.तोडे, अरूण भुसलवाड, गोविंद बंटेवाड, बालाजी कुंभरगावे, रामकिशन कुंभरगावे, गजानन पांपटवार, बालाजी पांपटवार यांची उपस्थित होते.

## मैनाबाई देशमुख डोंगरगावकर यांचे निधन



**उमरी**-शहरातील पत्रकार ,कृषी शास्त्रज्ञ अधिकारी व आडत आशोशियन व्यापारी या देशमुख घराण्यातील जेष्ट प्रतिष्टीत महिला श्रीमती मैनाबाई अमृतराव देशमुख डोंगरगावकर यांचे दि ८ नोव्हेंबर २०२५ रात्री ९:३० वा.वृद्धपकाळाने निधन झाले आहे त्या मृत्युसमयी ९१ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुली, तीन मुलं, नाती, नातू असा मोठा परिवार आहे. शहरातील आडत कृषी व्यावसायिक सूर्यकांत देशमुख, पत्रकार लक्ष्मीकांत देशमुख तथा कृषी विज्ञान केंद्र पोखर्णीचे वरिष्ठ शास्त्रज्ञ यांच्या त्या आई होत. त्याच्यांवर दि. ९ नोव्हेंबर रोजीच रविवारी दुपारी १:०० वा. त्यांच्या शेतात, तळेगाव रोड येथे करण्यात आला आहे.

# मांडवी जिल्हा परिषद गटातून शामला बद्दीवार भाजपाच्या प्रबळ उमेदवार

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ९ नोव्हेंबर-**

मांडवी जिल्हा परिषद गट (ओबीसी महिला राखीव) या जागेसाठी भारतीय जनता पक्षाच्या निष्ठावान, समाजाभिमुख व अनुभवी कार्यकर्त्या सौ. शामला रमेश बद्दीवार यांची उमेदवारी देण्यात यावी, अशी मागणी कार्यकर्त्यांमधून आणि स्थानिक जनतेकडून तीव्रपणे होत आहे. सौ. बद्दीवार या मौजे लिंगी (ता. किनवट) येथील रहिवासी असून, त्या सेवा निवृत्त अभियंता व गोल्ला समाजाचे जिल्हाध्यक्ष रमेश बद्दीवार यांच्या सौभाग्यवती आहेत. सौ. बद्दीवार या गेल्या दोन दशकांपासून किनवट तालुक्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी सातत्याने कार्यरत आहेत. या अणुषंगाने रमेश बद्दीवार व शामला बद्दीवार यांनी मांडवी जिल्हा परिषद गटातील संपुर्ण गावांना भेटी देऊन संपर्क वाढवला असुन याद्वारे त्यांना नागरीकांचा मोठे समर्थन प्राप्त होत आहेत. तसेच त्यांनी भाजपाच्या विविध योजना, अभियान व पक्षाच्या संकल्पना नागरीकां पर्यंत पोहचवले असुन त्यांनी भाजपाच्या विविध अभियानाचे यशस्वी आयोजन केले आहे. मांडवी गटात आदिवासी व तेलगु, मराठी व इतर भाषिक समाज मोठ्या प्रमाणात आहेत ज्यांचे संबध बद्दीवार यांचे शासकीय नोकरीत असतांना प्रस्तापित झालेले आहे. तर बंजारा समाजाशी देखिल बद्दीवार कुटुंबाचे सलोख्याचे संबध आहेत. हे समिकरण पाहता सौ. बद्दीवार यांची भाजपाच्या उमेदवारीवर दावा अत्यंत प्रबळ ठरतो याची पक्षश्रेष्ठीने देखिल नोंद घेतलेली आहे.



त्यांनी विविध महिला बचत गटांच्या अध्यक्षा म्हणून ग्रामीण भागातील महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याचे कार्य केले आहे. त्याचबरोबर परिसरातील हळदीकुंकू, बतकम्मा उत्सव, शारदा देवी उत्सव यांसारखे सांस्कृतिक उपक्रम महिलांच्या सहभागासह मोठ्या प्रमाणात आयोजित केले जातात.दरवर्षी श्रावण महिन्यात मांडवी ते उनकेश्वर या मार्गावर भव्य कावड यात्रा आयोजित करून धार्मिक आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश दिला जातो. तसेच भागवत कथा, सत्संग, धार्मिक प्रवचन यांसारख्या कार्यक्रमांतून समाजातील सर्व घटकांना जोडण्याचे कार्य त्या करीत आहेत. सौ. शामला बद्दीवार या दीर्घकाळापासून भारतीय जनता पक्षाशी निगडित असून, भाजपा तालुका उपाध्यक्ष म्हणून जबाबदारी पार पाडलेली आहे. त्यांनी १९९७ साली अपक्ष उमेदवार म्हणून पंचायत समिती मांडवी गणातून निवडणूक लढवली आणि विजयी ठरल्या. परंतु फेरमतमोजणीत त्या एक मताच्या फरकाने पराभव झाला, तर २००२ साली भाजपा तर्फे पंचायत समिती कोठारी (सी) येथे निवडणूक लढवली व दुसऱ्या क्रमांकावर राहिल्या. त्यांचा राजकीय अनुभव, संघटन कौशल्य आणि जनसंपर्क या सर्वांच्या आधारे त्यांना पक्षकार्यकर्त्यांत उत्तम प्रतिष्ठा लाभली आहे. रमेश बद्दीवार यांच्या शासकीय सेवेतून आणि सामाजिक कार्यातून बद्दीवार कुटुंबाने किनवट-माहूर परिसरातील सर्व समाजघटकांशी स्नेहाचे संबंध प्रस्थापित केले आहेत.

# पांचपिंपळीकर यांच्या विरुद्ध ठक्करवाड की भिलवंडे ?

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. ९ नोव्हेंबर-**

तालुक्यातील चार जिल्हा परिषद गटापैकी लोहगाव जि.प. सध्या चर्चेत असून कॉंग्रेसकडून दावेदार असलेल्या प्रा.शिवाजी पाटील पाचपिंपळीकर यांच्या विरुद्ध भाजपाकडून माजी जि. प. सदस्य लक्ष्मण ठक्करवाड की नायगाव तालुक्याचे रहिवाशी असलेले श्रावण पाटील भिलवंडे असा प्रश्न नरमन झाला आहे.

आगामी काळात होणाऱ्या जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांच्या बाबतीत बिलोली तालुक्यातील चार ही जिल्हा परिषद गटाचे आरक्षण जाहीर झाले आहे. त्यात सर्वात महत्वाचं म्हणजे लोहगाव जिल्हा परिषद गट हा सर्वसाधारण (ओपन) साठी सुटला आहे. हा जिल्हा परिषद गट हा भाजपचे जिल्हा सरचिटणीस तथा माजी जि.प. सदस्य लक्ष्मण ठक्करवाड यांचा घरचा मतदार संघ असून या गटाचे नेतृत्व त्यांनी यापूर्वी एकदा केले आहे.

आगामी जि. प. निवडणुकीत कॉंग्रेसकडून तालुका कॉंग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष तथा खा. रवींद्र चव्हाण यांचे विश्वासू प्रा. शिवाजी पाटील पाचपिंपळीकर यांची उमेदवारी जवळपास निश्चित आहे. लोहगाव मतदारसंघ यांचा ही घरचाच मतदारसंघ आहे. त्यामुळे इथे कॉंग्रेसचा दुसरा उमेदवार नसण्याची शक्यता आहे. त्यामुळे यांच्या विरुद्ध भाजपाकडून कोण उमेदवार राहणार या बाबत अटकळ बांधली जात आहेत. विशेष म्हणजे लक्ष्मण ठक्करवाड यांच्यासह भाजपाकडून भाजपचे राज्यकार्यकारणी सदस्य श्रावण पाटील भिलवंडे हे ही इच्छुक आहेत. त्यांच्याकडे एक सच्चा भाजपचा कार्यकर्ता व सामान्याशी नाळ जुळलेला कार्यकर्ता म्हणून पक्ष पाहतो तर माजी जि.प. सदस्य तथा या मतदारसंघाचा भूमिपुत्र लक्ष्मण ठक्करवाड या दोघांपैकी कोणाला उमेदवारी द्यावी या बाबत भाजपाला कसरत करावी लागणार आहे. सध्याची एकूणच परीस्थिती पाहता या मतदारसंघात मतदारांना नव्या चेहऱ्याची पसंती आहे. त्यामुळे या मतदारसंघांचे भूमिपुत्र असलेले आणि फ्रेश चेहरा, सामान्य जनतेशी नाळ असलेला आणि खासदारांचा विश्वासू चेहरा असलेले प्रा.शिवजी पाटील पाचपिंपळीकर यांच्या विरुद्ध भाजप ही नवीन चेहरा देणार का अशी चर्चा सध्या जोर धरू लागली आहे.

# नरसी गटातील तृष्णा मनोहर तोटरे यांना जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद!

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ९ नोव्हेंबर-**

आगामी काळातील होऊ इच्छिणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नायगांव तालुक्यातील शेळगांव गौरी चे सरपंच तथा प्राचार्य मनोहर तोटरे यांच्या सुविद्य पत्नी सौ.तृष्णा मनोहर तोटरे ह्या आरक्षण सोडती न्वये नरसी

जि प सर्कल हे मागासवर्गीय प्रवर्गातील महिलेला आरक्षीत झाले असुन. त्या अनुषंगाने नरसी जि.प. सर्कल मधील भाजपाच्या संभाव्य महिला उमेदवार म्हणून सौ. तृष्णा मनोहर तोटरे यांना जनतेकडून मिळत असलेला प्रतिसाद दिवसेंदिवस वाढत आहे. गावोगावी दौरे, लोकसंपर्क मोहिमा आणि संवादाच्या माध्यमातून सौ.तोटरे यांनी अल्पावधीतच जनतेच्या मनावर आपली ठस- ठशीत छाप उमटवली आहे.

नरसी जिल्हा परिषद गटातील ग्रामस्थ, महिला बचतगट, युवक मंडळे



आणि शेतकरी वर्ग यांच्या कडून सध्या सौ. तृष्णा मनोहर तोटरे यांच्या कार्य शैली बद्दल समाधान व्यक्त होत आहे. जनतेच्या प्रश्नांना संवेदनशीलपणे ऐकून घेणारी आणि त्यावर उपाय शोधणारी नेतृत्वशैली म्हणजेच सौ. तृष्णा तोटरे, असे मत स्थानिक नागरिकांनी व्यक्त केले आहे.

भाजपाच्या धोरणांशी बांधिलकी ठेवून विकासाचा अजेंडा पुढे नेण्याची तयारी त्यांनी दाखवली असून, त्यांच्या प्रामाणिक आणि सहज स्वभावामुळे प्रत्येक मतदारांशी आपुलकीच्या नात्याची घट्टविण जोडल्य गेली आहे. नायगांव तालुक्यातील नरसी सर्कल मधील विविध गावांमधील भेटीदरम्यान अबाल वृध्द महिलांनी, व नवमतदार तरुण यवुक व युवतींनी त्यांचे मनःपूर्वक स्वागत केले.

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नरसी जि प सर्कल मधील भाजपा च्या संभाव्य महिला उमेदवार सौ. तृष्णा तोटरे यावेळी म्हणाल्या की,मला आज जोजनतेचा हा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतोय ती एक माझ्यासाठी मोठी जबाबदारी आहे. नरसी सर्कल मधील प्रत्येक गावातील विकासाच्या प्रत्येक वाटचालीत सामान्य माणसाचा सहभाग राहील, हीच माझी भूमिका असल्याचे तृष्णा तोटरे यांनी सांगीतले.

# आष्टी गटाकडे लागले तालुक्याचे लक्ष, ईच्छुक उमेदवारांची धावपळ वाढली

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. ९ नोव्हेंबर-**

जिल्हा परिषद गटाचे आरक्षण जाहीर झाल्यापासून राजकीय वातावरण तापू लागले आहे. दीपावलीच्या शुभेच्छा देण्यासाठी अनेक इच्छुक उमेदवार बाजारपेठे मध्ये व्यापाऱ्यांशी संवाद साधून शुभेच्छा दिल्या असल्याचे दिसून आले तर ईच्छुक उमेदवारांनी भेटीगाठीवर भर देण्यास सुरुवात केली आहे. हदगाव तालुक्यातील आष्टी जिल्हा परिषद गटाकडे सर्वांचे लक्ष लागले असून तालुक्यात सध्या तरी आष्टी जिल्हा परिषद गटाची चर्चा चावडीवर रंगत असल्याचे समजते आष्टी जिल्हा परिषद गट हा शिवसेनेचा बालेकिल्ला असून तीन टर्न शिवसेनेचाच उमेदवार आला आहे. माजी खासदार सुभाष



वानखेडे यांच्या काळापासून शिवसेनेचीच चलती असल्याचे समजते परंतु यावेळेस राजकीय समीकरण बदलणार असल्याची चर्चा होत आहे. आष्टी जिल्हा परिषद गट हा ओबीसी पुरुष आरक्षित झाल्यामुळे अनेक ईच्छुक उमेदवार कामाला लागले आहे. ज्यात प्रामुख्याने रमेश घंटलवार, माधवराव पाटील देवसरकर , गणेश पवार, राजेश फुलारी यांच्या नावाची जोरदार चर्चा आष्टी जिल्हा परिषद गटाच्या माध्यमातून पूर्ण तालुक्यात होत आहे.

हदगाव तालुक्यातील प्रमुख जिल्हा परिषद गटांपैकी एक असलेला आष्टी जिल्हा परिषद गट पूर्वीपासून शिवसेनेचा बालेकिल्ला होता पण या वेळेस तडा जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. उद्धव बाळासाहेब ठाकरे गटा कडून रमेश घंटलवार इच्छुक आहे यांनी शिवसैनिक कडून तामसा जिल्हा परिषद सदस्य असताना प्रत्येक गावामध्ये समाज मंदिर पिण्याच्या पाण्याची सोय केल्यामुळे त्यामुळे तामसा परिसरामध्ये त्यांची पकड मजबूत आहे. ओबीसीचा नेता म्हणून त्यांना संबोधल्या जातात ते खासदार नागेश पाटील आष्टीकर यांचे विश्वासू कट्टर समर्थक आहेत त्यानंतर स्वाभिमानी संभाजी ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा स्वराज्य पक्षाचे राज्य उपाध्यक्ष माधवराव पाटील देवसरकर हे स्वराज्य पक्षाकडून इच्छुक आहे. स्वाभिमानी संभाजी ब्रिगेडच्या माध्यमातून तरुणाची फळी तयार करून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये त्यांनी ओळख निर्माण केली म्हणून त्यांना आष्टी जिल्हा परिषद गटातून निवडणूक लढवण्यासाठी आग्रह करीत आहेत म्हणून ते ही निवडणूक लढवीत असल्याचे त्यांनी सांगितले तर शिवसेना शिंदे गटाकडून पाथरड येथील रहिवासी गणेश पवार हे इच्छुक आहेत ते आमदार बाबुराव पाटील कदम यांचे कट्टर समर्थक व विश्वासू म्हणून त्यांची ओळख आहे त्याचबरोबर काँग्रेस पक्षाकडून राजवाडीचे राजेश फुलारी हे इच्छुक आहे त्यांनी या अगोदर उमरी पंचायत समिती गणातून निवडून आले आहेत व त्या गणाचा त्यांनी विकास केला असल्यामुळे पुन्हा एकदा आष्टी जिल्हा परिषद गट लढवण्यासाठी जनता आग्रह करीत आहेत. वंचित बहुजन आघाडी. राष्ट्रवादी काँग्रेस. प्रहार जनशक्ती पक्षाकडून उमेदवार देणार असल्याचे सांगितले एकंदरीत आष्टी जिल्हा परिषद गटामध्ये इच्छुकांची गर्दी झाली असून सर्वांच्या नजरा आष्टी जिल्हा परिषद गटाकडे लागल्या आहेत.

# एसजीजीएस महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्यांनी पूरग्रस्तांसाठी दिला तीन लाखाचा निधी

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ९ नोव्हेंबर-**

श्री गुरु गोविंदसिंगजी अभियांत्रिकी आणि तंत्रशास्त्र महाविद्यालय विष्णुपुरी नांदेड येथील प्राध्यापक, अधिकारी आणि कर्मचारी यांनी सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवुन अतिवृष्टिग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहायता निधीसाठी एकूण रुपये ३,२३,५०५/- (तीन लाख तेवीस हजार पाचशे पाच रुपये) इतकी आर्थिक मदत दिनांक ९ नोव्हेंबर २०२५ रोजी दिली आहे.



राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाल्यामुळे आजचा शेतकरी मोठ्या संकटात सापडला असल्यामुळे या संकटातून बाहेर पडण्यासाठी त्यांना मदत म्हणून श्री गुरु गोविंदसिंगजी अभियांत्रिकी महाविद्यालय विष्णुपुरी नांदेड येथील सर्व अध्यापक, अधिकारी , कर्मचारी आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदवुन मुख्यमंत्री सहायता निधीसाठी एकूण रुपये ३ लाख २३ हजार ५०० रक्कम सुपूर्द करण्यात आली. सदरील उपक्रम महाविद्यालयाचे संचालक डॉ. मनेश कोकरे त्यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ९ नोव्हेंबर २०२५ रोजी राबविण्यात आला या उपक्रमाबद्दल सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करण्सांयात आले.या उपक्रमात सर्व विभागातील कर्मचारी, प्राध्यापक तसेच गैरशिक्षक वर्गाचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

**श्री गुरु गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था, नांदेड**
(महाराष्ट्र शासन अनुदानित स्वायत्त संस्था) विष्णुपुरी, नांदेड, ४३१६०६, महाराष्ट्र
उत्कृष्टतंत्रज्ञानार्थंजनशक्तै शिक्षणं
DTE Code: 2020
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.एसजीजीएस आय ई टी/भांडार/निर्लेखित भंगार विक्री/२०२५-२६ दि.१०/११/२०२५

-: निरुपयोगी निर्लेखित भंगार सामान विक्री सूचना :-

संस्थेतील निर्लेखित सामान **"आहे त्या स्थितीत"** विक्रीस काढण्यात आले आहे. तरी इच्छुकांसाठी संस्थेच्या संकेतस्थळावर (www.sggs.ac.in) भांडार निर्लेखनासंबंधीच्या नियम व अटी दिल्या आहेत, त्यामध्ये दिलेल्या वेळेनुसार, सुचनेनुसार संस्थेत येऊन सदर सामान पाहावे. तदनंतरच संस्थेच्या संकेतस्थळावर upload केलेल्या दर भरण्यासाठीच्या दरपत्रक फॉर्मची प्रिंट घेऊन, पूर्ण भरून निविदा फी **(निविदा फी रु.१००० आणि अनामत रक्कम रु. १०,०००/- ऑनलाईन sbi collect द्वारे भरावी)** भरलेली पावती व भरलेला फॉर्म हे दोन्ही कागदपत्रे **दि. ११/११/२०२५ ते ०२/१२/२०२५ वेळ सायंकाळी ०५:०० पर्यंत** या कालावधीत संस्थेतील भांडार विभागास सादर करावे. दरपत्रके स्विकारण्याचा, रद्द करण्याचा आणि दरपत्रकातील योग्य किंमती न आल्यास विक्री रद्द करण्याचा अधिकार संस्थेने रोखून ठेवला आहे. नियम व अटी लागू.

**संचालक**

# कायदा व सुव्यवस्थेसाठी पोलिस अधीक्षकांच्या भेटी

## वसमत, कळमनुरीत विविध प्रभागात नागरिकांशी संवाद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ नोव्हेंबर**

हिंगोली शहरासह वसमत व कळमनुरी नगर पालिका निवडणुकीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे हे स्वत: मैदानात उतर-ले असून त्यांनी हिंगोली शहरातील विविध प्रभागांमध्ये भेटी देत नागरिकांशी संवाद साधला. निवडणुकीच्या कालावधीत अनुचीत प्रकार घडत असल्यास तातडीने पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन कोकाटे यांनी नागरिकांना केले आहे.

जिल्ह्यातील हिंगोली, वसमत आणि कळमनुरी नगर पालिकेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून या पार्श्वभूमीवर पोलिस अध-ीक्षक श्रीकृष्ण कोकाटे निवडणुक काळात कायदा व सुव्यवस्था कायम रहावी तसेच नागरिकांना निर्भय वातावरणात मतदान करता यावे यासाठी प्रशासन सज्ज झाल`आहे. तसेच मतदारांना प्रलोभने दाखविण्याचे प्रकार घडू नयेत यासाठीही पोलिस विभागाकडून गस्त घातली जात आहे. त्यासाठी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले, शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संदीप मोदे, सपोनि आनंद बनसोडे, सपोनि प्रेमलता जगताप, उपनिरीक्षक रा-हुल महिपाळे, गंधकवाड, श्रीधर वाघमारे, नागरे यांचे सह ८ पोलिस पेट्रोलिंग वाहने व क्युआरटी पथके हिंगोली शहरात तैनात करण्यात आले आहेत.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी शहरातील बियाणी नगर, रिसाला बाजार, रिसाला नाका, एनटीसी, जिजामाता नगर, निरंजनबाबा चौक, वंजारवाडा, मेहरा-जूलूम चौक, सिध्दार्थ नगर, खुशाल नगर, शिवराज नगर, नगर परिषद वसाहत, आजम कॉलनी, हनुमान नगर, गारमाळ, पोस्ट ऑफीस चौक, अंबिका टॉकीज परिसर, महात्मा गांधी चौक या भागात भेटी देऊन नागरिकांशी संवाद साधला. निवडणुका खुल्या व निर्भीड वाता-वरणात पार पाडण्यासाठी योग्य त्या सूचना दिल्या तसेच कोणत्याही मदतीसाठी हिंगोली पोलिस दल २४ तास सतर्क असल्याचे सांगितले. नागरिकांनीही यावेळी पोलिस अधीक्षक कोकाटे यांच्याशी मनमोकळा संवाद साधला.

यावेळी नागरिकांनी मांडलेल्या अडचणींची माहीती घेऊन त्यानुसार पोलिस बंदोबस्त ठेवण्याच्या सूचना हिंग-ोली शहर पोलिसांना दिल्या आहेत. यासोबतच शहरात येणाऱ्या सर्वच मार्गावर नाकाबंदी करून वाहनांची तप-ासणी करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या आहेत. रात्री १० नंतर विनाकारण फिरणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

# माजी आ. डॉ. संतोष टारफे भाजपच्या वाटेवर?



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ नोव्हेंबर**

काँग्रेसचे माजी आमदार डॉ संतोष टारफे यांनी शनिवारी भाजपचे आदिवासी विकास मंत्री डॉ अशोक उईक यांची भेट घेतली. यावेळी भाजप-चे स्थानिक नेतेही उपस्थित होते. डॉ संतोष टारफ` यांच्या भेटीमुळे ते भाजपच्या वाटेवर असल्याचे संकेत मिळत आहेत. त्यांच्या भाजपा प्रवेशामुळे कळमनुरीत भाजपची ताकद वाढणार आहे.

काँग्रेसचे कळमनुरी विधान सभेचे आमदार डॉ संतोष टारफे यांनी काँग्रेस मधील अंतर्गत कलहामुळे उबाठा शिवसेनेत प्रवेश केला. नुकत्याच झालेल्या विधान सभा निवडणुकीत शिंदे सेनेचे संतोष बांगर यांना कडवी झुंज दिली. या निवडणुकीत त्यांचा निसटता पराभव झाला होता. परंतु मागील काही काळापासून त्यांनी उबाठा शिवसेनेच्या कार्यक्रमाला तसेच आंदोलनाकडे पाठ फिरवली होती. उध्दव ठाकरे यांच्या मराठवाडा दौऱ्यातही त्यांची अन-ुपस्थिती जाणवली. त्यामुळे विविध चर्चांना उधान आले होते. शनिवारी भाजपचे आदिवासी विकास मंत्री डॉक्टर अशोक उईके यांचा हिंगोली दौरा होता.

भारतीय जनता पक्षाच्या बैठकीनंतर माजी आमदार डॉ संतोष टारफे यांनी आदिवासी विकास मंत्री डॉ अशोक उईके यांची भेट घेतली. यावेळी हिंग-ोली विधानसभेचे आमदार तानाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे आदींची प्रमुख उपस्थिती होती. माजी आमदार डॉ संतोष टारफे यांची भाजप नेत्यांशी झालेली बैठक ही चर्चेचा विषय बनली असून डॉ.टारफे हे आदिवासी नेते असून स्वच्छ आणि बेदाग चारित्र्य असलेले आमदार म्हणून त्यांची ओळख आहे. कळमनुरी शहरासह तालुक्यामध्ये आदिवासी समाज मोठ्या प्रमाणात असून डॉ टारफे यांचे या भागाम ध्ये चांगलेच वर्चस्व आहे. आगामी नगरपरिषद निवडणूक आणि जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीमध्ये डॉ टारफे यांच्या पक्षप्रवेशामुळे भारतीय जनता पक्षाला हिंगोली आणि कळमनुरी या दोन्हीही मतदारसंघांमध्ये मोठे बळ मिळणार आहे. शिंदे सेनेचे संतोष बांगर यांना नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत डॉ. टारफे यांनी कडवी झुंज दिली होती.

# महाविकास आघाडी तीनही निवडणुका ताकदीने लढविणार- दांडेगावकर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ नोव्हेंबर**



जिल्ह्यातील हिंगोली, वसमत आणि कळमनुरी नगरपालिका निवडणूकी संदर्भात महाविकास आघाडीच्या घटक पक्षांची शनिवारी वसमत येथे महाविकास आघाडीचे जिल्हा समन्वयक माजी सहकार मंत्री जयप्रकाश दांडेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी जिल्ह्यातील तीनही नगर पालिका निवडणुका महाविकास आघाडी संपूर्ण ताकदीने लढविणार असल्याचे माजी मंत्री दांडेगावकर यांनी सांगितले.

या बैठकीत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार), शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रम-ुख पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत निश्चय करण्यात आला की, होऊ घातलेल्या हिंगोली जिल्ह्या-तील तिन्ही नगरपालिका निवडणुकीत महाविकास आघाडीचे नगराध्यक्ष आणि नगरसेवक ताकदीने निवडून आणायचे.

या बैठकीला माजी आमदार डॉ.संतोष टारफे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष मुनीर पटेल, काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष सुरेशअप्पा सराफ, शिवसेना जिल्हाप्रमुख गोपू पाटील, संदेश देशमुख, ॲड.जकी कुरेशी, हाफीज, विनायकराव भिसे, विनायकराव देशमुख, बाळासाहेब मगर, ॲड.रवि शिंदे, सुनील काळे, डॉ.पार्डीकर,ॲड. ऋषिकेश देशम-ुख, मुजीब पठाण यांच्यासह महाविकास आघाडीच्या घटक पक्षाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.



**हिंगोली- सेनगाव तालुक्यातील सवना सर्कलमधील कार्यकर्त्यांनी माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर यांच्या नेतृत्वात शिंदे गट शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी परसराम कोंघे, प्रमोद नाईक, भागवत कोंघे, पांडुरंग मगर, सुधाकर नायक, पंडीत नायक, देविदास कांबळे, शिवा पाटील, राजु नायक, सुनील माहुरकर आदींची उपस्थिती होती. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### नामनिर्देशन पत्र दाखल करतांना उमेदवाराने नियमांचे पालन करावे- जिल्हा दंडाधिकारी

हिंगोली- राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्था सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी कार्यक्रम घोषित केला असून दि. ४ नोव्हेंबर, २०२५ पासून आदर्श आचार संहिता अंमलात आलेली आहे. हिंगोली जिल्ह्यातील नगर परिषदांची निवडणूक प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणार पार पाडण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळेस ताफ्यामध्ये तीनपेक्षा जास्त मोटारगाड्या, वाहने यांचा समावेश नसावा. तसेच नामनिर्देशन दाखल करताना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात पाच व्यक्ती उपस्थित राहतील. या व्यतिरिक्त कोणालाही निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात प्रवेश दिला जाणार नाही. निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळेस कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक, सभा घेणे, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे, वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणणे आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करण्यास जिल्हा दंडाधिकारी राहुल गुप्ता यांनी भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रतिबंध करण्याचे आदेश दिले आहेत. हे आदेश दि. ३ डिसेंबर, २०२५ पर्यंत लागू राहणार आहेत, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

### शासकीय परिसरात मिरवणुका, घोषणा, सभा आयोजनास निर्बंध

हिंगोली- जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, संस्था आणि शासकीय विश्रामगृहाच्या परिसरात मिरवणुका काढणे, घोषणा तसेच सभा घेण्यास निर्बंध घालण्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी राहुल गुप्ता यांनी निर्गमित केले आहेत. हे आदेश ३ डिसेंबरपर्यंत अंमलात राहणार आहेत. राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्था सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी कार्यक्रम घोषित केला असून दि. ४ नोव्हेंबर, २०२५ पासून आदर्श आचार संहिता अंमलात आलेली आहे. जिल्ह्यातील नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ ची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व मुक्त, न्याय वा-तावरणात पार पाडण्याच्या दृष्टिकोनातून जिल्ह्यातील निवडणूक होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था तसेच निवडणुकीवर प्रभाव पडणारे लगतचे ग्रामीण क्षेत्रातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, संस्था आणि शासकीय विश्रामगृहाच्या आवारामध्ये कोणत्याही राजकीय पक्षाने, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने किंवा त्यांच्या प्रतिनिधीने किंवा त्यांच्या हितचिंतकाने सभा घेणे, आवाराचा वापर राजकीय कामासाठी करणे किंवा रॅली काढणे, निवडणुकीसंदर्भातील पोस्टर्स, बॅनर्स, पॉम्प्लेट्स, कटआऊट, पेंटिंग्स, होर्डिंग्स लावणे, निवडणूक विषयक घोषवाक्य लिहिणे, आवारात निवडणूकविषयक घोषणा देणे किंवा मतदाराला प्रलोभन दाखविणे तसेच निवडणुकीच्या कामात बाधा निर्माण होईल, अशी कृती करण्यास निर्बंध घालण्यात आले आहे. भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत ३ डिसेंबरपर्यंत निर्बंध घालण्यात आले असल्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी श्री. गुप्ता यांनी दिले आहेत.

# माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ नोव्हेंबर**

औंढा नागनाथ शहरातील नागनाथ मंदिर कमान समोर रविवार (ता. ९) दुपारी दोन वाजता धनंजय मुंडे समर्थक ओबीसी जिल्हाध्यक्ष विकी देशमुख यांनी माजीमंत्री धनंजय मुंडे यांच्या फोटोला दुग्धाभिषेक केला.

धनंजय मुंडे यांच्यावर बिनबुडाचे आरोप काही लोक जाणून बुजून करत आहेत. औंढा नागनाथ शहरातील सकल ओबीसी समाज बांधवांनी धनंजय मुंडे यांच्या फोटोला दुग्धाभिषेक करण्यात आला. धनंजय मुंडे साहेब तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है ..! धनंजय मुंडे यांची बदनामी थांबवावी. असे देखील ओबीसी जिल्हाध्यक्ष विक्की देशमुख यांनी याप्रसंगी बोलताना सांगितले. यावेळी सकल ओबीसी बांधव व धनंजय मुंडे समर्थक उपस्थित होते.

# हिंगोलीतील राज्यस्तरीय धनुर्विद्या स्पर्धेत १०५५ खेळाडूंचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ नोव्हेंबर**

जिल्हा हौशी धनुर्विद्या संघटनेच्यावतीने येथील रामलीला मैदानावर राज्यस्तरीय धनुर्विद्या स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत राज्यभरातून सुमारे १०५५ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता.

या स्पर्धेचे उद्घाटन भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्याहस्ते करण्यात आले. तर प्रमुख पाहुणे म्हणून क्रिडाधिकारी आत्माराम बोथीकर, संघटनेचे अध्यक्ष रमेश गंगावणे, सचिव रंगराव साळुंके, माजी क्रिडाशिक्षक हिम्मतराव मोरे, शिव-ाजी इंगोले, मुख्याध्यापक डॉ प्रकाश अंभोरे यांच्यासह क्रिडापटू मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी बोलतांना आ. तान्हाजीराव मुटकुळे म्हणाले की, हिंगोलीत पहिल्यांदाच राज्यस्तरीय धनुर्विद्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. प्राचीन काळापासून धनुर्विद्येला मोठे महत्व आहे. एकाग्रता, सावधता आणि शरीरावरील नियंत्रण यासर्व गोष्टींचा समावेश या क्रिडा प्रकारात मोडतो. अत्यंत अवघड आणि दिलेले लक्ष्य साधण्यासाठी खेळाडूंना अहोरात्र परिश्रम करावे लागतात. आयोजकांनी अत्यंत चांगल्या प्रकारे नियोजन केल्यामुळे त्यांचे कौतुक करीत स्पर्धेत सहभाग घेणाऱ्या सर्व स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. तीन दिवस या स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेसाठी हौशी धनुर्विद्या संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.

# औंढा नागनाथ येथील नागनाथ मंदिरातील काकडा भजनाची सांगता




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८९ नोव्हेंबर**

औंढा नागनाथ येथील आठवे ज्योतिर्लिंग नागनाथ मंदिरामध्ये गेल्या एक महिन्यापासून काकडा भजन सुरू होते. या काकडा भजना-ची शनिवारी (ता.८) सांगता झाली. देवस्थ-ानचे अध्यक्ष तथा तहसीलदार हरीश गाडे वैजनाथ पवार व व्यवस्थापक सुरेंद्र डफळ यांच्या हस्ते मा. उपसचिव उत्तमराव देशमुख, कडूजी पाटील बाबाराव येळणे निळकंठ देव गिरीश इखे मुरलीधर वाकोडे तबलावादक म ारोती पाटील तर पेटीवादक नागनाथ पाटील, विनाधारक नागनाथ कुंभार, प्रल्हाद वाशिम कर, विश्वनाथ डोंगरे, प्रल्हाद देशमुख, लक्ष्म

बालाजी रेनके, बाबाराव दराडे, मारुती सोळंके, परसराम नागरे, तानाबाई रणखांबे, बालासाहेब शिंदे, डिगांबर सोनुने यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी देवस्थानचे अध-ीक्षक वैजनाथ पवार, व्यवस्थापक सुरेंद्र डफळ मुख्यपुजारी श्रीपाद भोपी, शेखर भोपी, रमेश क्षिरस-ागर, नागेश गोरे, राजू गोरे, दीपक कोळी कृष्णा पाटील, ना-गेश माने रामप्रसाद उदगीरे, प्रवीण जोशी गणेश उदगिरे, बबन सोनूने, नामदेव पाटील, संजय मोरे, देवा देशमुख सुरेखाताई शिंदे, नंदाबाई चोडेकर भगवान शिंदे, गणेश जगताप जगदेव दिंडे, मुकेश पडोळे, प्रवीण गोबाडे, मंचक सोळंके, पंडित देशमुख, वामन चव्हाण, प्रभाकर मानकर, संदीप इंगळे

# म्हाडा कॉलनीत दुषीत पाण्यामुळे आरोग्य धोक्यात

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ नोव्हेंबर**



शहरातील एनटीसी भागात बांधण्यात आलेल्या म्हाडाच्या घरांची पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन लीकेज झाल्यामुळे या पाईपमध्ये संडास आणि बाथरूमचे पाणी जात असल्यामुळे दुषीत पाणी येत आहे. दुषीत पाण्यामुळे या भागातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. लिकेजमुळे म्हाडाच्या घरासमोरच घाण पाणी साचत असल्यामुळे डासांचा प्रादुर्भावही होत असल्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. लहान मुलांना आजार होत आहेत. नगर पालिकेने तत्काळ पिण्याचे पाण्याची पाईपलाईन दूरूस्त करून द्यावी अशी मागणी येथील नागरिकांमधून होत आहे.